साप्ताहिक

# माणूस

चित्रवार्ता पुस्तक पुरवणीसह ▮ तीस ऑगस्ट ▮ एक रुपया

वाचनाची भूक दिवसेंदिवस वाढत असूनही आपण घरी दरमहा एक पुस्तक विकत घेऊ शकतो का ?

आपली इच्छा असूनही पुस्तक विकत घेणे आपल्याला शक्य होत नाही.

कारण एकच.

पुस्तकांच्या बेसुमार किंमती.

विक्री कमी म्हणून किंमत जास्त.

किंमत जास्त म्हणून विक्री कमी.

अशा एका चमत्कारिक कोंडीत आज प्रकाशनव्यवसाय अडकून पडलेला आहे.



**ही कोंडी फोडण्याचा एक लहानसा प्रयत्न ...**

# पॅपिलॉन पुस्तक योजना



योजनेचे स्वरूप

---

या योजनेत दरमहा एक पुस्तक याप्रमाणे एकूण पाच पुस्तके प्रकाशित होतील.

---

योजनेतील प्रत्येक पुस्तकाची दर्शनी किंमत सुमारे १५ ते २० रुपये राहील.


---

आज नोंदणीशुल्क दहा रुपये भरून पॅपिलॉन पुस्तकयोजनेत सहभागी होणाऱ्या व्यक्तीस मात्र यातील प्रत्येक पुस्तक दरमहा फक्त पाच रुपयात मिळू शकेल. पाठवणी, टपाल इ. खर्च मात्र ग्राहकाकडे राहील.

---

**दहा + पंचवीस = पाच दर्जेदार पुस्तके**

# योजनेसंबंधी आणखी थोडे



योजनेतील पहिले पुस्तक पॅपिलॉन हे ५ ऑक्टोबर ७५ ला प्रकाशित होईल.

---

पूर्वसूचना मिळाल्यावर ग्राहकाने विशिष्ट मुदतीत पाच रुपये भरून आपले पुस्तक कार्यालयातून घेऊन जावे किंवा ५ रुपये + टपाल–पाठवणीखर्च इतक्या रकमेची त्याला व्ही. पी. केली जाईल. ती त्याने सोडवून घ्यावी.

---

व्यक्तिगत ग्रंथसंग्रह हा योजनेचा मूळ हेतु असल्याने ग्रंथ–विक्रेत्यांना या योजनेत सहभागी होता येणार नाही.

---

ज्या ग्राहकास दरमहा पाच रुपये भरणे गैरसोयीचे वा त्रासाचे असेल अशांनी एकरकमी ३५ रुपये पाठवल्यास त्यांना ही पाचही पुस्तके वरीलप्रमाणे मिळू शकतील.


---

पैसे शक्यतो मनिऑर्डरने पाठवावेत. चेक असल्यास वटणावळ २ रुपये अधिक पाठवावे.

---

चेक, ड्राफ्ट, म. ऑ. राजहंस प्रकाशन या नावे पाठवावी. सोबत नाव, पत्ता संपूर्ण असावा.

---



योजनेची मुदत ३० सप्टेंबर १९७५ पर्यंत आहे.




पॅपिलॉन योजनेत
प्रकाशित होणारी
पाच दर्जेदार पुस्तके

अंदाजे मूल्य

## पॅपिलॉन

मूळ लेखक : हेन्री शॅरियर
अनुवाद : रवींन्द्र गुर्जर
रुपये वीस.

## हैद्राबाद मुक्तिसंग्रामातील अज्ञात कथा

अशोक परळीकर
रुपय पंधरा.

## संचित

पाश्चिमात्य लेखकांचा वेधक परिचय
शिवाय 'मी गॉर्की बोलतोय' | सुमती देवस्थळे
रुपये वीस.

## देवाघरचा पाऊस

रवींद्र पिंगे
रुपये पंधरा

## ?

सिनेकलावंतांची व्यक्तीचित्रे

**पॅपिलॉन पुस्तक योजना**

सुमारे ७५ ते १०० रुपये किंमतीची
एकूण ५ पुस्तके फक्त ३५ रुपयात.

राजहंस प्रकाशन पुणे

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०

दूरध्वनी : ४३४५९

साप्ताहिक

# माणूस

वर्ष : पंधरावे – अंक तेरावा

३० ऑगस्ट १९७५

मूल्य : एक रुपया

संपादक

श्री. ग. माजगावकर

□

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

□

वार्षिक वर्गणी

छत्तीस रुपये

सहामाही वर्गणी

वीस रुपये

परदेशची वर्गणी

पंचावन्न रुपये

□

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही.

□

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

□

**साप्ताहिक माणूस**

१०२५ सदाशिव पेठ

नागनाथ पाराजवळ

पुणे ४११ ०३०

दूरध्वनी : ४३४५९

छायाचित्र मांडणी : सुनिल कुरणे

## स. न. वि. वि.

मी ग्रामायनचा एक कार्यकर्ता आहे आणि आपल्या कॉलेजच्या राष्ट्रीय समाज-सेवा योजना पथकाच्या कार्यक्रमाप्रमाणे १४ ऑगस्ट १९७५ रोजी चरवीला (जि. ठाणे) गेलो होतो. त्या वेळी आढळून आलेल्या ह्या दोन गोष्टी देशाच्या परिस्थितीबद्दल बरेच काही सांगून जातील.

आपला विश्वासू

१९ ऑगस्ट

**य. भ. भिडे**

□ शेणवे ते चरवी एस. टी. बस नव्हती. पावसाळ्यात हे ह्या भागात नेहमीचेच. शेणवे हे ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्यांतील एक छोटेसे गाव. शहापूरहून एका बसने शेणव्यापर्यंत कसा तरी आलो आणि मग चरवीपर्यंत चार मैलांचे अंतर चालत निघालो.

त्या भागातील दोन माणसे भेटली. अंगावर फाटके कपडे आणि गाल व पोट खपाटीला गेलेली. डोक्यावर धान्याचे एक एक मोटकं होतं.

चौकशी करता कळलं ते कृष्णाच्या वाडीचे रोहणारे आणि शेणव्याजवळच्या एका गावातल्या सावकाराकडून ज्वारी घेऊन चालले होते.

त्यांच्याबरोबर तीन मैल चालता चालता बोलत होतो. एरंडीची लागवड, सरकारी आंबा योजना, पीकपाणी वगैरे वगैरे; परंतु वरचा धान्यप्रकार भलताच होता.

त्या दोन्ही आदिवासींनी शेणव्याजवळच्याच एका सावकाराकडून प्रत्येकी २० किलो ज्वारी घेतली होती.

तीही सावकाराच्या हातापाया पडून मिळाली होती. सावकाराचे किंवा त्याच्या गावाचे नाव सांगायला मात्र दोघेही तयार नव्हते.

नोव्हेंबरअखेर ह्या ज्वारीची परतफेड करायची ३० किलो भाताच्या स्वरूपात. लोक हे दरवर्षीच करतात. पुढच्या वर्षी गरज लागतेच म्हणून परतफेड करण्यात चुकारपणा होत नाही. चुकारपणा झाल्यास जमिनी गुंततात.

२० किलो ज्वारीची किंमत सुमारे रु. ४०. ३० किलो भाताची किंमत जवळजवळ रुपये साठ. चार महिन्यांत चाळीस रुपयांचे साठ रुपये परत करायचे. म्हणजे व्याजाचा दर दरसाल दरशेकडा १५०.

□ मुंबईला परत येण्यासाठी रात्री ८–२५ च्या लोकलने आसनगावहून निघालो. टिखाळचाला सात-आठ तरुण चढले. तांदुळाची १०–१२ बाचकी. प्रत्येकामध्ये साधारणत: २० किलो तांदूळ असावेत. एकाने दोन बाकांवरून बसलेल्या लोकांना उठवलं. सीटस् उघडली. त्यात तांदूळ भरला. मोठी विजेरी, नटस्-बोल्टस्, स्क्रू, चुका, हातोडा वगैरे सगळं सिद्ध होतंच. पुन्हा सर्व व्यवस्थित ठोकून शहदला गडी पांगले. बाजूच्या डब्यात बसले असावेत कदाचित. एखादाच मधल्या स्टेशनवर येऊन चक्कर मारून जायचा. मी माझ्या स्टेशनवर उतरल्यावर पोलिसांना अगर आर. पी. एफ. ना सांगावं म्हणून बघितलं.

नाद सोडला. म्हटलं, आपल्यालाच पोलिसस्टेशनवर जायला लागायचं आणि सकाळी ध्वजवंदनाला जायचं होतं. घरी परत आलो, आपल्या पळपुटेपणाची कीव करत. बाकी सगळ्यांना काय वाटलं असेल ? हे दररोजचेच आहे का ? संबंधित यंत्रणांना ह्या गोष्टीची अगोदरपासूनच माहिती असेल का ? ह्या देशाचे तरुण असे का वागतात ?

सारेच अनुत्तरित प्रश्न.

□

३०।३१ ऑगस्टला पुणे येथे ' ग्रामायन ' संस्थेचा तिसरा मेळावा भरत आहे. ' आदिवासींसाठी म. शासनाने जाहीर केलेली विकासयोजना ' हा या मेळाव्यातील प्रमुख चर्चाविषय आहे. या चर्चेसाठी तयार करण्यात आलेले हे टिपण. . . .

# महाराष्ट्रातील आदिवासी समाजाच्या समस्या आणि आदिवासी विकास–उपयोजना

प्रा. शरद कुलकर्णी

## सर्वसाधारण माहिती :

महाराष्ट्रातील आदिवासी समाजाची लोकसंख्या एकूण लोकसंख्येच्या ५·८६ टक्के आहे. १९७१ च्या शिरगणतीप्रमाणे मार्च १९७१ अखेरीस महाराष्ट्राची लोकसंख्या ५ कोटी ४ लक्ष १२ हजार होती. त्यापैकी आदिवासींची संख्या २९ लक्ष ५४ हजार होती. आदिवासी म्हणून कोणाची गणना केली जावी याविषयी एक यादी शिरगणती. प्रमुखांनी दिली होती. त्याप्रमाणे विदर्भ व मराठवाडा विभाग सोडून इतर सर्व विभागांसाठी १९ जमाती देण्यात आल्या होत्या, त्याशिवाय प्रत्येक जिल्ह्यासाठी स्वतंत्र यादी होती. मात्र या विशिष्ट विभागातील यादीतील जमातीचा मनुष्य दुसऱ्या विभागात आढळला तर त्याची गणना आदिवासी म्हणून करू नये अशा सूचना होत्या. त्यामुळे आदिवासी जमातींची गणना प्रत्यक्षापेक्षा काहीशी कमी झाली असण्याची शक्यता आहे.

महाराष्ट्रातील आदिवासींची वस्ती प्रामुख्याने धुळे, ठाणे व नासिक जिल्ह्यांत आहे. एकूण आदिवासींपैकी ५९·४६ टक्के आदिवासी या तीन जिल्ह्यांत आहेत. इतर आदिवासी चंद्रपूर, यवतमाळ, कुलाबा, अहमदनगर, जळगाव, अमरावती, नांदेड, पुणे व परभणी जिल्ह्यांत आहेत. बुलढाणा, अकोला, वर्धा, नागपूर व भंडारा जिल्ह्यांत आदिवासी नाहीत तर इतर रत्नागिरी. सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर, बीड व उस्मानाबाद जिल्ह्यांत त्यांची संख्या एकूण लोकसंख्येच्या अर्ध्या टक्क्यापेक्षाही कमी आहे. मात्र ही सर्व माहिती शिरगणती दिलेल्या यादीच्या मर्यादेतच खरी आहे. आदिवासी समाजाच्या गणनेच्या बाबतीत शिरगणतीतील पद्धतीत बदल होण्याची आवश्यकता आहे. (ही सर्व माहिती महाराष्ट्र शिरगणती अहवाल दोन अ वरून घेण्यात आली आहे.)

महाराष्ट्रातील आदिवासींच्या ४० च्या वर जमाती आहेत. मात्र यांपैकी भिल्ल, महादेवकोळी, गोंड, वारली, कोकणा, ठाक्कर, काथोडी व गाभित या प्रमुख असून त्यांची संख्या एकूण आदिवासींच्या ८६·६५ टक्के आहे. बहुसंख्य म्हणजे ९६ टक्के आदिवासी ग्रामीण भागात राहाणारे आहेत.

बहुसंख्य आदिवासी शेतकरी वा शेतमजूर म्हणून काम करतात. १९६१ च्या शिरगणतीप्रमाणे काम करणाऱ्या आदिवासी पुरुषांत ५५ टक्के शेतकरी व ३५ टक्के शेतमजूर होते. शेतकरी आदिवासी प्रामुख्याने लहान म्हणजे ७॥ एकरांपेक्षा कमी जमीन धारण करणारे आहेत सर्वसाधारण आदिवासी डोंगराळ भागात राहात असल्यामुळे ते कसत असलेली जमीन इतरांच्या जमिनीपेक्षा कमी सुपीक आहे असे म्हणता येईल.

आदिवासी समाजातील शिक्षणाचे प्रमाण इतर समाजाच्या तुलनेने अगदी कमी आहे. १९६१ सालच्या शिरगणतीप्रमाणे महाराष्ट्रातील साक्षरतेचे प्रमाण पुरुषांत ४२ टक्के व स्त्रियांत १७ टक्के होते. हे प्रमाण आदिवासींच्या बाबतीत पुरुषांत १२ टक्के व स्त्रियांत २ टक्के होते. माध्यमिक व त्यापुढील शिक्षण घेतलेल्या आदिवासींचे प्रमाण तर अगदीच अल्प होते.

आदिवासी समाजात अंधश्रद्धा व रूढी, तसेच व्यसने, विशेषत: दारू–यांचे प्रमाणदेखील इतर समाजापेक्षा तुलनेने अधिक आहे असे देखील त्या समाजाविषयी प्रसिद्ध झालेल्या माहितीवरून दिसून येते.

## समस्या :

आदिवासी समाजापुढील समस्या थोडक्यात अशी सांगता येतील.

**१. गरीबी :** बहुसंख्य आदिवासी एकूण समाजाच्या तळच्या २५ टक्के गटात येतील इतके गरीब आहेत. जमिनीचा पूर्ण अभाव किंवा अल्प व कमी दर्जाची जमीन, जमीन कसण्यासाठी लागणाऱ्या आधुनिक साधनांचा व कौशल्याचा अभाव व शेती, शेतमजुरी याव्यतिरिक्त इतर कामे नसणे ही या गरीबीची प्रमुख कारणे सांगता येतील.

**२. शोषण :** आदिवासींचे बिगर आदिवासी मोठ्या प्रमाणात शोषण करतात हे देखील आदिवासींच्या गरीबीचे एक मोठे कारण आहे. आदिवासींचे शोषण करणारे दोन वर्ग आहेत. अ) सावकार व व्यापारी ब) लहानसहान सरकारी नोकर. आदिवासी विभागात दळणवळणाच्या सोयी पुरेशा विकसित झालेल्या नसल्यामुळे त्यांना आपल्या वस्तू (उदा. भात, गवत, मोहाची फुले, चारोळ्या, लाकूडफाटा) त्या भागातील व्यापाऱ्यांना विकाव्या लागतात. व्यापारी त्या कमीत कमी भावात विकत घेतात. आदिवासींच्या अज्ञानामुळे वजनमापे व हिशोब यातदेखील लबाड्या केल्या जातात. अशाच लबाड्या त्यांना लागणाऱ्या वस्तू विकतानाही केल्या जातात. बहुसंख्य व्यापारीच सावकार आहेत. आदिवासी विभागातील सावकारी भयानक स्वरूपाची आहे. व्याजाचा दर ३०० ते १२०० टक्क्यांपर्यंत आहे. खोटे दस्तऐवज तयार करणे, कर्जदारांना मारहाण यांसारखे प्रकार सर्रास चालतात. या शोषणाविरुद्ध आदिवासींना संरक्षण मिळत नाही याची कारणे आदिवासींचे अज्ञान, असंघटितपणा, तसेच शोषण करणाऱ्यांचे सरकारी अधिकाऱ्यांशी असलेले सलोख्याचे संबंध ही सांगता येतील. आदिवासींना शोषणाविरुद्ध संघटित करणाऱ्या कार्यकर्त्यांना सरकारी अधिकारी अनेक प्रकारे त्रास देतात. कम्युनिस्ट, नक्षलवादी वगैरे शिक्के त्यांच्यावर व त्यांच्या कामावर मारले जातात.

लहानसहान कर्मचारी छोटया छोटया कामांसाठी आदिवासींच्या अज्ञानाचा फायदा घेतात.

**३. अज्ञान :** आदिवासी समाजात शिक्षणाचे प्रमाण अतिशय कमी आहे, याविषयीची माहिती वर देण्यात आली आहेच. गरीबीमुळे आदिवासी मुलांना शाळेत पाठवू शकत नाहीत. आदिवासी विभागात **आश्रमशाळा** हेच शिक्षणाचे योग्य साधन होईल. मात्र आश्रमशाळा या कल्पनेचा स्पष्ट पुर्नविचार झाला पाहिजे. त्याचबरोबर सुरुवातीला तरी आदिवासी मुलांना त्यांच्या बोलीभाषेतील शब्दच शिकवले पाहिजेत. आजची पाठयपुस्तके ज्या संस्कृतीच्या पार्श्वभूमीवर लिहिलेली आहेत तिचे ज्ञान नसल्यामुळे आदिवासी विद्यार्थ्यांना ती उपयुक्त नाहीत असे अनुसूचित जाती व जमातींचे आयुक्त यांनी म्हटले आहे व ते योग्यच आहे. लिहिणे व वाचणे, सोपे गणित जास्तीत जास्त आदिवासींना आल्याखेरीज त्यांचे शोषण थांबविणे, तसेच नवीन शेतीसुधारणा त्यांच्यापर्यंत नेणे शक्य होणार नाही.

**४. अंधश्रद्धा व व्यसनांचा प्रभाव :** आदिवासी समाजातील हे दोष जाण्यासाठी खास उपाययोजना करणे आवश्यक आहे. या कारणांमुळे देवी टोचून घेणे, इतर औषधोपचार, कुटुंबनियोजन यांसारख्या गोष्टींचा आदिवासी अवलंब करीत नाहीत. सावकार व व्यापारी आदिवासींच्या अंधश्रद्धांना व व्यसनांना खतपाणीच घालतात असा अनुभव आहे.

आदिवासींचे वर दिलेले प्रश्न सोडवायचे असतील तर आदिवासींना जमिनी मिळतील व त्या चांगल्या रीतीने कसता येतील अशी व्यवस्था झाली पाहिजे. त्यांचे शोषण थांबवले पाहिजे व शिक्षणाचा जास्तीत जास्त प्रसार करून त्यांच्यावरील अंधश्रद्धांचा पगडा कमी केला पाहिजे.

याबाबत एक गोष्ट सांगितली पाहिजे, ती म्हणजे ज्या विभागात आदिवासी राहतात ते विभागदेखील दळणवळण, पाटबंधारे, इतर सोयी व उद्योगधंदे या दृष्टीने मागासलेले आहेत. आदिवासी समाजाचा विकास करताना तो आदिवासी विभागांचा व व्यक्तींचा असा दोन्ही प्रकारांनी झाला पाहिजे. नुसत्या विभागाचा विकास झाला तर त्याचा फायदा इतर घेतील व आदिवासींचे शोषण वाढेल. नुसता व्यक्तींचा विकास झाला तर त्या स्थलांतर करून इतरत्र जातील व न जाणाऱ्या बहुसंख्य व्यक्ती मागासलेल्याच राहतील.

## सरकारी धोरण

सुदैवाने महाराष्ट्र सरकारला आदिवासींच्या प्रश्नांची जाण आहे, असे म्हणावे लागेल. आदिवासींच्या हस्तांतरित जमिनी त्यांना परत मिळाव्यात या दृष्टीने सरकारने जुलै १९७४ मध्ये एक वटहुकूम काढला व त्याचे विधेयक ऑगस्ट महिन्यात विधानसभा व परिषद यांमध्ये मंजूर होऊन ७ सप्टेंबर १९७४ रोजी त्याचे कायद्यात रूपांतर झाले. या कायद्यात आदिवासींच्या बेकायदेशीररीत्या हस्तांतरित झालेल्या जमिनी त्यांना परत मिळाव्यात अशी तरतूद आहे. (१९७४ चा कायदा क्रमांक ३७). या कायद्याची अंमलबजावणी चालू आहे. मात्र ती मंदगतीने होत आहे अशी अनेक कार्यकर्त्यांची तक्रार आहे.

ऑगस्ट १९७४ मध्ये महाराष्ट्र विधानसभा व परिषद यांत आदिवासींच्या कायदेशीररीत्या हस्तांतरित झालेल्या जमिनी त्यांना परत मिळाव्यात यासाठी दुसरे एक विधेयक मंजूर करण्यात आले. मात्र त्याला राष्ट्रपतींची संमती मिळावी असा खास प्रयत्न सरकारने केल्यामुळे ती संमती मिळून ते राजपत्रित होण्यास जून १९७५ उजाडला. अद्यापही त्या विधेयकाचे नियम व अंमलबजावणीची तारीख जाहीर व्हावयाची आहे.

श्री. शंकरराव चव्हाण मुख्य मंत्री झाल्यानंतर त्यांनी आपल्या, धोरणाविषयीच्या केलेल्या भाषणात आदिवासींना समान वागणूक व संरक्षण मिळेल, त्यांच्या विकासासाठी खास प्रयत्न केले जातील असे जाहीर आश्वासन दिले. (लोकराज्य, १ मार्च १९७५). त्या-अगोदरच महाराष्ट्र सरकारने आदिवासी उपयोजना (सब-प्लॅन) तयार करण्यासाठी एक मार्गदर्शक समिती स्थापन केली होती व त्या समितीच्या सल्ल्यानुसार ही आदिवासी उपयोजना तयार करण्यात आली आहे.

## उपयोजना

या उपयोजनेची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत :

१. सावकार व व्यापारी यांच्याकडून होणारी आदिवासींची पिळवळूक थांबवणे.

२. आदिवासींना शेतीसाठी अर्थपुरवठ्याच्या सोयी मिळवून देणे.

३. आदिवासी विभागात दळणवळणाच्या सोयी वाढविणे.

४. त्यांच्या शिक्षणाची गती वाढविणे. या योजनेवर व्यापक प्रमाणावर चर्चा व्हावी असे मार्गदर्शक समितीचे अध्यक्ष ना. चौधरी यांनी सांगितले आहे.

या योजनेवर ५ वर्षांत १५० ते १८० कोटी रुपये खर्च होतील असा अंदाज आहे. यापैकी १९·४० कोटी रुपये कृषिविकास, २०·१० कोटी रुपये सहकार व सामूहिक विकास, २३ कोटी रुपये पाटबंधारे व वीजपुरवठा, २० कोटी रुपये परिवहन व दळणवळण, ३१·३६ कोटी रुपये सामाजिक सेवा ( शिक्षणधरून ) ११·३४ कोटी रुपये विकासकेंद्रे व ५ कोटी रुपये प्रशासकीय यंत्रणा यावर खर्च होणार आहेत. सध्या त्यांची बेरीज १३० कोटी रुपये आहे.

वरील तरतुदी ५ वर्षांपुरत्या असल्या तरी त्या १५ वर्षांच्या एका दीर्घ योजनेचा भाग म्हणून मानल्या जातील व १५ वर्षांत आदिवासींना इतर लोकांच्या विकासस्तराजवळ आणण्याचा जास्तीत जास्त प्रयत्न केला जाईल.

या योजनेत पुढील गोष्टी करता येतील :

१. आदिवासींचे सर्व प्रकारचे शोषण थांबविण्यासाठी कायदे व इतर उपाययोजना.

२. आदिवासी विभागांच्या विकासाच्या योजना म्हणजे दळणवळण, वीजपुरवठा, दवाखाने इ. सोयी.

३. आदिवासींचे जीवनमान सुधारण्यासाठी योजना. यात शेतीसुधारणा, कर्जपुरवठा, विक्रीव्यवस्था यांचा समावेश होईल.

४. आदिवासी समाजाच्या विकासाच्या योजना. यात सामान्य शिक्षण, तांत्रिक शिक्षण वगैरेंचा समावेश होईल.

५. आदिवासी अर्थव्यवस्थेला स्थैर्य आणणाऱ्या योजना. यात आदिवासी विभागात लहानसहान उद्योगधंदे सुरू करणे, आदिवासींना तांत्रिक शिक्षण देऊन शेतीव्यतिरिक्त इतर रोजगार मिळवून देणे इ. चा समावेश होईल.

विकासाची पद्धत एकात्म क्षेत्रविकासपद्धती ( integrated area development approach ) अशी राहील व आश्रमशाळा हा विकासाचा मध्यबिंदू मानला जाईल.

अंमलबजावणीसाठी आदिवासी विभागाचे दोन विभाग पाडण्यात येतील.

पहिल्या विभागात ठाणे, नासिक, धुळे, कुलाबा, पुणे व अहमदनगर जिल्ह्यांतील सुमारे ३२३० खेड्यांचा समावेश होईल.

दुसऱ्या विभागात अमरावती, नागपूर, भंडारा, चंद्रपूर, यवतमाळ व नांदेड जिल्ह्यांतील ३५८६ खेड्यांचा समावेश होईल. दोन्ही विभागांसाठी वेगवेगळे आदिवासी आयुक्त नेमण्यात येतील.

आदिवासींच्या सर्वांगीण विकासासाठी एक नवीन यंत्रणा उभारण्यात येईल. ग्रामीण स्तरावरील तिचे स्वरूप सहकारी पत व विक्री-संस्थेसारखे असेल. सर्वसाधारणपणे २५,००० लोकसंख्येसाठी एक विकासकेंद्र असेल व एका केंद्रात वरील प्रकारच्या दोन संस्था असतील. सुमारे ३००० ते ५००० लोकवस्तीसाठी एक अशा या संस्थेच्या शाखा वा उपशाखा असतील. विकासकेंद्रासाठी एक सल्लागारसमिती व राज्यपातळीवर आदिवासी सल्लागारमंडळ असेल.

आदिवासींच्या विकासासाठी त्यांच्या तात्कालिक गरजा पुऱ्या करून व त्याशिवाय त्यांना आधुनिक तंत्र वापरावयास लावून त्या फायद्यातून साधनसामुग्री निर्माण करावी लागेल. त्या दृष्टीने विकासकेंद्राचा विचार करावा लागेल. या केंद्राचा प्रमुख, आदिवासी विकास अधिकारी असेल. या केंद्रात पुढील मुख्य सोयी पुरवल्या जातील.

१. शेतकी प्रात्यक्षिक केंद्र २. पत व विक्री सहकारी सोसायटी कार्यालय ३. जंगल व शेतमाल औद्योगिक प्रक्रियाकेंद्र ४. व्यावसायिक प्रशिक्षण प्रशाला ५. आरोग्यकेंद्र ६. बसस्टॉप ७ गोदाम ८. सामूहिक मनोरंजन ९. डाक-तार कार्यालय १०. पोलिस आउटपोस्ट ११. पाणी व वीजपुरवठाकेंद्र १२. विकासकेंद्र–कार्यालय १३. जमीनतपासणी–प्रयोगशाळा.

आदिवासी विकासासाठी उभारण्यात येणारी यंत्रणा. १ शेतीसाठी लागणारे अल्प, मध्यम व दीर्घ मुदतीच्या कर्जाचे वितरण करेल. २ अडचणीच्या काळात दैनंदिन गरजांसाठी मालाच्या स्वरूपात मदत होईल. ३. त्यांचा शेतीमाल व इतर माल ( गवत, लाकडे, मध इ.) योग्य किंमतीत खरेदी करेल. ४. सामाजिक गरजांसाठी अर्थ-सहाय्य करेल व शेतीला उपयुक्त असे तांत्रिक ज्ञान देण्याची सोय करील.

कर्ज देताना प्रत्येक सभासदाच्या संपूर्ण व्यवहारासंबंधीचे एक अंदाजपत्रक तयार केले जाईल. त्यात सभासदाच्या सर्व आर्थिक गरजांची पूर्ती करण्यासाठी लागणाऱ्या कर्जाची नोंद केली जाईल. तसेच सभासदाचे शेतकी व इतर उत्पन्न यांची देखील नोंद केली जाईल. या दोहोंवर कमाल मर्यादा ठरवली जाईल. सभासदांच्या सर्व व्यवहारांची नोंद पासबुकात केली जाईल. अशा रीतीने ही संस्था आदिवासींच्या जीवनाच्या सर्व अंगांना स्पर्श करणारी असेल.

आदिवासी विभागांच्या विकासासाठी पीकसंरक्षणयोजना, भूमी-सुधारयोजना, पशुसंवर्धनयोजना राबवण्यात येतील. शिक्षणाच्या प्रसारासाठी मोफत पाठ्यपुस्तके व गणवेश पुरविण्यात येतील. आदिवासी बोलीतून पाठ्यपुस्तके निर्माण केली जातील. आश्रमशाळांची संख्या वाढवली जाईल. त्याशिवाय सुसज्ज तांत्रिक शाळा सुरू केल्या जातील. वैद्यकीय सोयींसाठी प्राथमिक उपचारकेंद्रे व छोटी इस्पितळे उभारली जातील. दळणवळणाच्या साधनांचा विकास केला जाईल. शेतीसाठी व पिण्यासाठी पाणीपुरवठायोजना सुरू करण्यात येतील. विकासकेंद्रात व आजूबाजूच्या खेड्यांत वीजपुरवठा केला जाईल.

उपाययोजना राबविण्यासाठी उभारण्यात येणाऱ्या यंत्रणेत आदिवासी लाभार्थी व नेते यांच्याशी सल्लामसलत करण्याची व्यवस्था करण्यात येईल.

## मूल्यमापन

या उपाययोजनेची थोडक्यात रूपरेषा वर देण्यात आली आहे. ही योजना चांगली व महत्त्वाकांक्षी आहे याविषयी दुमत होणार नाही. मात्र त्याच वेळी ही योजना फार गुंतागुंतीची व राबविण्यास कठीण आहे असेही म्हणावे लागेल. आदिवासी सहकारी पत व विक्रीसंस्था प्रत्यक्षात कशा काम करतील यावर या योजनेचे यश अवलंबून राहणार आहे. या योजनेत काही गोष्टी स्पष्ट होत नाहीत.

१. या योजनेत आदिवासी भागात काम करणाऱ्या खाजगी संस्था व जंगल सहकारी सोसायट्या यांचे स्थान काय राहणार आहे हे स्पष्ट नाही.

२. आदिवासी विभागात अनेक बिनसरकारी संस्था शिक्षणाचे व इतर कार्य करीत आहेत. या संस्थांच्या बाबतीत सरकारी धोरण काय राहील हे स्पष्ट नाही. यापैकी अनेक संस्था चांगले कार्य करीत असून योजनेच्या अंमलबजावणीत त्यांचे सहकार्य घेतल्यास ती यशस्वी होण्यास मदत होईल असे वाटते.

३. आदिवासी सल्लागारमंडळाचे स्वरूप काय राहील हे स्पष्ट होणे आवश्यक आहे. या मंडळावर नुसते मंत्री, सरकारी अधिकारी व आमदार, खासदार असून भागणार नाही. कारण यापैकी बहुतेकांना इतर कामे भरपूर असल्यामुळे या कामाकडे पुरेसे लक्ष देता येत नाही. त्यासाठी आदिवासी प्रश्नांचा अभ्यास करणाऱ्या इतरही व्यक्ती असणे आवश्यक आहे.

४. आदिवासी समाजाचा सर्वांगीण व पुरेसा विकास व्हावयाचा असेल तर त्यासंबंधी अधिक संशोधन होणे आवश्यक आहे. १९३९ सालच्या सिमिंग्टन अहवालानंतर महाराष्ट्रातील आदिवासी जमातींचा अभ्यास झालेला नाही. तरी अशा प्रकारचा अभ्यास होणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने या उपाययोजनेत काहीही तरतूद करण्यात आलेली नाही. याबाबतीत त्रिपुरा सरकारने घेतलेला निर्णय अधिक योग्य वाटतो. त्रिपुरा सरकार आदिवासींच्या विकासाच्या योजना आखता व पार पाडता याव्यात म्हणून आदिवासी जीवनाचा सखोल अभ्यास करून विकासाचा कार्यक्रम ठरविणार आहे. (Economic Times, July 9, 1975) त्या दृष्टीने महाराष्ट्र सरकारनेदेखील संशोधनाची काही तरतूद करणे इष्ट आहे.

५. बहुसंख्य आदिवासींना शेतकरी म्हणूनच वसवावे लागेल. त्यादृष्टीने सरकारने आपले जंगलविषयक धोरण आखले पाहिजे. प्रत्यक्ष जंगलाखाली नसलेली व जंगले तयार होण्यास बराच काळ लागेल अशी जमीन आदिवासींना कसण्यास दिली पाहिजे. आज जे गैरकायदेशीररीत्या चालते व ज्यामुळे लाचलुचपतीला वाव मिळतो ते कायदेशीररीत्या झालेले चांगले. मात्र जमीन कसण्यासाठी लागणारी साधने विशेषतः अर्थपुरवठा दिल्याखेरीज नुसत्या जमीनवाटपाने आदिवासींची प्रगती होणार नाही हे देखील लक्षात ठेवले पाहिजे. जंगलविषयक धोरणाविषयी या योजनेत काही स्पष्ट योजना नाही.

ही योजना राबविण्यासाठी आदिवासींच्या विकासासाठी प्रयत्न करणाऱ्या सर्व संस्थांनी व व्यक्तींनी डोळस सहकार्य करण्याची आवश्यकता आहे. सरकारी योजना राबवणारी नोकरशाही कागदांच्या पसाऱ्यात गुंतून पडते. यातील कित्येकांचे आदिवासी हितसंबंधांना विरोध असणाऱ्यांशी निकटचे संबंध असतात, तर कित्येकांना आदिवासी मनोधारणेची ओळख नसते. अशा वेळी आदिवासींमध्ये काम करणारे कार्यकर्ते योजना राबविण्याच्या कामी प्रभावी मदत करू शकतील याची जाणीव कार्यकर्त्यांनी तसेच शासनाने ठेवणे आवश्यक आहे. □

# मुक्काम पुणे

**प्रकाश जोशी**

## □ ग्रंथाली

□ मॅजेस्टिकचा ललित हॉल. पाऊस पडतच असतो. तरी साहित्यप्रेमी मंडळी येतातच. 'ग्रंथाली' या अभिनव वाचक-चळवळीचे पुण्यातील केंद्र सुरू करण्यासाठी सभा बोलाविलेली असते. या चळवळीबाबत बरंच वाचलेलं असतं; पण त्यावरून निश्चित कल्पना आलेली नसते. चळवळीबाबत अनेक अपेक्षा, अनेक प्रश्न कुतूहल घेऊन मंडळी येतात.

ही चळवळ मुंबईत उभारणारे दिनकर गांगल, अशोक जैन, अरुण साधू, प्र. ना. परांजपे ही मंडळी मोठ्या उमेदीने आलेली असतात. बैठक औपचारिकरीत्या सुरू होण्यापूर्वीच गप्पातून ग्रंथालीच्या चर्चेला तोंड फुटलेलंच असतं.

मराठी वाचकाबाबत अनेक समज-गैरसमज पसरलेले आहेत. काही आरोपही आहेत. त्यातला महत्त्वाचा आरोप म्हणजे मराठी वाचक फुकटे आहेत. म्हणजे स्वतः कोणतेही पुस्तक विकत न घेता मित्राकडून उसने आणून, वाचनालयाचे सभासद होऊन आपली वाचनाची भूक ते भागवत असतात.

प्रकाशक म्हणतात मराठी पुस्तकांना पुरेसा वाचकच नाही. त्यामुळे किंमती जास्त ठेवाव्या लागतात; तर पुस्तकाच्या किंमती फार असल्यामुळे मध्यमवर्गीय वाचकाला ही पुस्तके परवडत नाहीत असा दुसरा दावा. म्हणजे जोपर्यंत वाचक वाढत नाहीत तोपर्यंत पुस्तकांच्या किंमती खाली येत नाहीत व जोपर्यंत किंमती खाली येत नाहीत तोपर्यंत पुस्तक विकत घेणारा वाचकवर्ग वाढत नाही असा हा शिवाशिवीचा खेळ. त्यातून मार्ग काढण्यासाठी वाचक-लेखकात प्रत्यक्ष संपर्क साधण्यासाठी 'ग्रंथाली'चा प्रपंच.

प्र. न. परांजपे या योजनेबाबतची माहिती देतात. मित्रामित्रांतील चर्चेतून तिचा मुंबईत कसा जन्म झाला, ती कशी वाढली, यापुढे कशी वाढावी याची अपेक्षा व्यक्त करतात.

ग्राहक-चळवळीशी जवळचे नाते सांगणारी 'ग्रंथाली' ही वाचकांची चळवळ हा एक प्रयोगच; परंतु त्यात मूलभूत फरक हा की ग्राहक चळवळ माल विकत घेऊन योग्य किंमतीस वितरण करते तर 'ग्रंथाली'त चांगल्या चोखंदळ वाचनाची आवड निर्माण व्हावी म्हणून चांगली निरनिराळ्या विषयांवरील पुस्तके निर्माण करण्याची योजना आहे.

'या चळवळीला व्यावसायिक प्रकाशकांचा विरोध होणार नाही का?'

'ही चळवळ व्यावसायिक प्रकाशकांविरुद्ध नाही. उलट त्यांच्या धंद्याला पोषकच आहे. कारण संघहीन वाचकवर्ग निर्माण होणार आहे. आता मॅजेस्टिकचे श्री. कोठावळे यांनी आपल्याला हा हॉल दिला. त्यातच या चळवळीचे व प्रकाशकांचे संबंध कसे राहतील ते स्पष्ट होते.' दिनकर गांगल उत्तर देतात.

चर्चा रंगू लागते. त्यातून एक स्पष्ट होते की ही चळवळ त्यात भाग घेणाऱ्यांच्या उत्साहावर, कार्यक्षमतेवर अवलंबून आहे. त्यात सर्वांचे सहकार्य अवलंबून आहे. जागरूक वाचकाला त्यात सामावून घेतले पाहिजे.

सध्या तरी २५ रुपये भरून सभासद करून घ्यावयाचे व मार्च ७६ अखेर तीन पुस्तके देण्याची योजना आहे. त्याच्या अनुभवावर आधारित ही चळवळ पुढे नेण्यात येईल.

या चळवळीत नवे आहेच काय? मराठी वाचकांची संख्या वाढली असली तरी प्रवृत्ती कुठं बदललीय? असं डॉ. भीमराव कुळकर्णी यांचं मत. ते म्हणतात, 'अपयश दिसत असताना ही चळवळ हातात घेताच कशाला?' त्यांच्या या प्रश्नावर उत्तर-प्रत्युत्तर यात रंगत चढते. सगळेच आपापली मतं मांडू लागतात. शेवटी श्री. दि. वि. गोखलेच या चर्चेला शांत करतात. 'हे पहा, ग्रंथाली ही एक चळवळ आहे. तो एक प्रयोग आहे आणि तो यशस्वी व्हावा असं प्रत्येकालाच वाटतंय. सध्या २५ रुपये भरून आपण वर्षभर वाट पाहू. ही चळवळ खरंच दमदार असेल तर वर्षभर टिकेल. पुढे वाढेल नाही तर संपेल. समोर बसलेली माणसं विश्वास ठेवण्यासारखी आहेत. तेव्हा २५ रुपये भरून तीन पुस्तकं घ्यायला काय हरकत आहे.' यावर घसरलेली चर्चा रुळावर येते. पुणे शाखेचे काम विजय कुवळेकर, दिलीप चावरे व सुधाकर वेलणकर यांच्यावर सोपविण्यात येते. प्रत्येकाने प्रत्येकी दहा सभासद आणण्याचे आवाहन करण्यात येऊन ग्रंथालीची पुण्यात मुहूर्तमेढ होते. □

## □ 'जायंटस वेलकम यू'

सावधान, पुण्यात जायंटस् येत आहेत. तसं घाबरायचं कारण नाही. कारण समाजसेवेचं व्रत घेतलेल्या व फावल्या वेळात एकत्र जमून मोठमोठ्या योजना आखणाऱ्या 'लायन्स, रोटरी' या सेवासंघटनेच्या पंक्तीत बसणारे हे जायंटस आहेत. फरक एवढाच आहे की लायन्स्-रोटरीयन्सचे मूळ चालक परदेशी



आहेत तर जायंटस ही भारतातील पहिली आंतरराष्ट्रीय सेवासंघटना आहे. नुकतीच स्थापन झालेली असल्यामुळे तिचे कामकाज, कामाचे स्वरूप याबाबत सध्या तरी आपण काय बोलणार? पण यात काही आजी संतुष्ट-असंतुष्ट 'लायन्स' असल्याने व एकंदर वर्गणीचे दर वगैरे पाहता हा प्रकार लायन्स रोटरी क्लबात आणखी एक भर ठरणार असे दिसते आहे; पण या जायंटसचा एक दावा आहे. ते म्हणतात, आमची ध्येये-योजना 'कॉंक्रीट' आहेत. त्यांचें काय होते यावर तुम्ही आपले मत ठरवा. आज देशापुढे सर्वात महत्वाचा प्रश्न जनसंख्येचा आहे असं या जायंटस लोकांचं मत आहे. त्यासाठी कुटुंबनियोजन योजनेला हातभार म्हणून गर्भपातकेंद्र उभारणे व जन्माला येऊ घातलेल्या वाढत्या लोकसंख्येला आळा घालणे असा व्यापक कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. दुसरी योजना आहे स्वस्तात घरे बांधणे. दोन्हीही योजना स्वागतार्ह आहेत. येत्या दोन वर्षात रोजी जन्माला येणाऱ्या ४० हजार मुलांचे जन्म रोखण्याचे उद्दिष्ट ठरविण्यात आले आहे. आता या 'कॉंक्रीट' योजनेच्या यशाबद्दल कोणाला शंका घेण्याचे कारण उरेल असे वाटत नाही. मोठमोठ्या बंगल्यांत, फ्लॅटस्‌मध्ये राहणारे जायंटस् स्वस्तात घरे कशी व कोणासाठी बांधणार? त्याबाबत अद्यापी विचारविनिमय चालू आहे. भारतात सध्या २७ ठिकाणी जायंटस्-संघटना असून २८ वी शाखा पुण्यात सुरू होत आहे. या भारतीय आंतरराष्ट्रीय संघटनेचे परदेशात शाखा उभारण्याचे प्रयत्न चालू झाले आहेत. तेव्हा आता 'जायंटस् वेलकम यू' असे बोर्डस् दिसले तरी घाबरण्याचे काही कारण नसावे. ◻

## ◻ सप्ताह नको ... वर्षच हवे .

पुण्यात वाहतूक-सप्ताह पाळण्यात आला. खरं म्हणजे पुण्यात 'वाहतूक-वर्ष' पाळायला हवे. हो. त्याशिवाय काही खरं नाही. कारण पुण्यातील रस्ते, त्यावरील पादचारी, निरनिराळी वाहनं यांना वाहतुकीचे नियम समजावून सांगायचे ही काय चेष्टा आहे? इमारतींच्या अंगाखांद्यांवर लडिवाळपणे पहुडलेले लहानमोठे रस्ते हे बहुधा पूर्वी लपंडाव खेळण्यासाठी बांधले असावेत असा कोणाचा समज होण्याची सहज शक्यता आहे. बरं, जो तो आपल्या नादात असतो. रस्त्यावर जागोजागी उभी असलेली गप्पा मारणारी टोळकी, माजघरातून दिवाणखान्यात निघाल्यासारखी रस्ता ओलांडणारी मंडळी, सुळकन् इकडून तिकडे जाणारे सायकलस्वार, भन्नाट रिक्षावाले, आपल्याच तालात मोटारी हाकणारे सारेजण रस्ता आपल्याच मालकीचा आहे असं समजतात. त्यात भर पडते बिचाऱ्या मुक्या जनावरांची. रस्ता सोडून ती जाणार तरी कोठे? कारण रस्त्याशिवाय मोकळी जागा आता शिल्लक उरलीच आहे तरी कुठे?

आकाशकंदिलसारखे टांगलेले साइनलाइटस पुण्याच्या रस्त्यांचं वैशिष्टच. दुरून व्यवस्थितपणे दिसणारे हे दिवे जवळ येताच दिसेनासे होतात. मग मांना वर करून ताटकळत हिरव्या दिव्याची वाट पहावी लागते. चौकात वर साइनलाइटस टांगणाऱ्यांची कल्पनाशक्ती भलतीच तिखट असावी. त्यात वाहतुकीचा बोजा सांभाळणाऱ्या अरुंद रस्त्यांची तारांबळ तर काही विचारूच नका. वाहतूक-अभ्यासासाठी निरनिराळे प्रयोग करण्यासाठी पुण्याच्या रस्त्यांची निवड झाली असावी असं वाटतं. त्यात कोणता रस्ता केव्हा 'वन् वे' होईल, परत खुला केव्हा होईल ते सांगता येत नाही. त्यात काही 'वन वे' पार्शियल असतात. म्हणजे फक्त ठराविक वेळीच वन वे असतात; पण एकंदरीत एकमार्गी विरोध नको असणाऱ्यांना 'वन वे'चं आकर्षण जबरदस्त असतं. पी. एम. टी. ची वाहतूक हा एक स्वतंत्रच विषय होईल; पण या सगळ्या अडचणींवर मात करणारे पी. एम. टी. चे ड्रायव्हर बाकी कमाल करतात. अडथळ्याच्या शर्यतीत पी. एम. टी. चे ड्रायव्हर विशेषतः ७ नंबर ६ नंबरचे सर्वप्रथम येतील याबद्दल अजिबात शंका वाटत नाही.

तेव्हा पुण्यातील वाहतुकीस वळण लावायचं असेल तर 'वाहतूक वर्ष'च पाळावं लागेल. ◻

## चोळीची किंमत 'फक्त' ३२ हजार रुपये !

आजकाल अमेरिकन चलनाची (डॉलर) रोजच्या रोज किंमत घसरत आहे. सोन्याचा अधिकृत भाव म्हणून जो आकडा (डॉलरच्या नाण्यात) अमेरिकन सरकारने जाहीर केला त्याच्या जवळजवळ चौपट किंमत आंतरराष्ट्रीय खुल्या सोनेबाजारात मोजावी लागते. अर्थात सोन्याचा 'अधिकृत' अमेरिकन भाव कागदावरच राहतो हे सांगणे नलगे. प्रत्यक्षात अमेरिकन सरकारची या भावाने सोने खरेदी करण्याची 'तयारी' आहे एवढाच त्याचा अर्थ. त्या भावाने सोने विकण्यास मात्र अमेरिकन सरकार मुळीच तयार नाही!

तर ते असो. व्यवहारी अमेरिकन स्त्रियांना अर्थातच डॉलरची किंमत व पत घसरल्याची पूर्ण जाणीव आहे. उलट आपले सौन्दर्य खुलवण्यासाठी 'आतील' चोळीवर (ब्रेझियर्स) वारेमाप खर्च करण्यास स्त्रिया तयार असतात ही गोष्ट अमेरिकन धंदेवाल्यांनाही ठाऊक आहे. निष्पत्ती? जगातील सर्वात मौल्यवान चोळी! ही चोळी सोन्याच्या मजबूत तंतूपासून बनवलेली असून अनेक वर्षे ती झिजणार नाही आणि झिजली तरी सोन्याची किंमत वाढत जाणार असल्याने जीर्ण झाल्यावरही तिची किंमत उलट वाढलेलीच असेल! थोडक्यात म्हणजे ही निव्वळ सुंदर फॅशनच नाही तर उत्कृष्ट व्यवहारी भांडवली गुंतवणूकही आहे!

त्याखेरीज या चोळीचा दुसराही फायदा आहे. अमेरिकेत बेकारी माजल्याने चाकू वा पिस्तूल दाखवून लुबाडण्याचे प्रकार व घरफोड्यांचे प्रकार अलीकडे प्रचंड प्रमाणावर होऊ लागले आहेत; पण स्त्रियांच्या या चोळ्यांपर्यंत तपास करण्याइतका वेळ रस्त्यावरील समाजकंटकांना सहसा मिळत नाही आणि सतत ही मौल्यवान चोळी अंगात बाळगल्याने घरफोडी झाली तरी ती सुरक्षित राहते.

या बहुगुणी चोळीची किंमत फक्त चार हजार डॉलर्स (३२ हजार रुपये) एवढी आहे! ◻

# इस्लामिक संस्कृती परिचय लेखमाला

## लेखांक एक । इस्लामची सारतत्वे

**रझिया वझिफ्दार**

बांगला देशात नुकत्याच झालेल्या लष्करी क्रांतीमुळे व हालचालींमुळे या विषयाला एक वेगळेच महत्त्व आलेले आहे.

इस्लामचे वास्तव स्वरूप पुष्कळांना परिचित असते; पण इस्लामचे आदर्श स्वरूप कोणते, इस्लामच्या मूलभूत श्रद्धा कोणत्या, इस्लामधर्माची सारतत्त्वे काय आहेत यासंबंधी बऱ्याच प्रमाणात अज्ञान आहे, पूर्वग्रह आहेत. या परिचयलेखमालेमुळे पूर्वग्रह तपासून घेण्यास थोडीफार मदत झाली तरी तिचा कार्यभाग साधला असे म्हणता येईल.

विषयाच्या गाभ्याला हात घालण्यापूर्वी, सारांशाने जर ‘संस्कृती’ म्हणजे काय त्याचा थोडा विचार केला तर ते अस्थायी ठरणार नाही. त्यामुळे इस्लाम काय किंवा दुसऱ्या कुठल्याही संस्कृतीचा अधिक चांगला अभ्यास होऊ शकेल असं मला वाटतं.

संस्कृती ही तशी एक दीर्घकालीन प्रक्रिया आहे. सामाजिक चालीरीती, चांगलेवाईट रिवाज यांचं ते एक फळ आहे. विविध व्यक्तींनी किंवा समाजांनी वर्षानुवर्षे, केलेल्या श्रमतनं समाजजीवनाला घातलेल्या खतपाण्यानं संस्कृती फुलते, वहरते. ह्या समाजपुरुषांनी, तत्त्वज्ञांनी घालून दिलेल्या आदर्शांचं, दाखवून दिलेल्या चांगल्या-वाइटातल्या फरकाचं, परस्परांशी वागण्यासाठी आखून दिलेल्या संकेतांचं एक सुरेख मिश्रण म्हणजे संस्कृती ! ह्या आदर्शांचा, संकेतांचा मानवानं स्वतःसाठी उपयोग करून घ्यायला हवा. त्यांच्या आधारे चांगल्या गुणांची निवड करून आत्मसात करायला त्यानं शिकलं पाहिजे. आपल्या समाजाला शिक्षित करायला शिकलं पाहिजे. इतरांशी प्रेमानं वागायला शिकलं पाहिजे. अल्लाचा प्रतिनिधी, प्रामाणिक प्रतिनिधी म्हणून त्याची वागणूक चोख राहिली पाहिजे. समाज-पुरुषांनी घालून दिलेल्या आदर्शांच्या आधारे, माणूस जेव्हा ह्या स्थितीप्रत पोहोचतो, तेव्हा तो एका प्रगत संस्कृतीचा आधारस्तंभ बनतो ! आणि ह्यातच संस्कृतीचं सार आहे.

‘माणूस’ हा अशा तऱ्हेनं संस्कृतीचा आधार मानला की, आपोआपच मानवी मनाला महत्त्वाचं स्थान प्राप्त होतं. मानवी मन खऱ्या अर्थानं तयार झाल्याशिवाय किंवा मूलभूत विचार मनावर कोरले गेल्याशिवाय, स्वतःच्या वा समाजाच्या सर्वांगीण उत्क्रांतीसाठी आवश्यक अशा चांगल्या तत्त्वांचा डोळस स्वीकार मानवी मन करू शकणार नाही. चांगल्या-वाइटाचा गंभीर आणि संतुलित विचारही मन करू शकणार नाही. ह्यातूनच सामाजिक उत्क्रांतीचा मार्ग खुलू शकेल.

‘संस्कृती’ ही अशा तऱ्हेने मानवी मनाच्या चांगुलपणावर आधारित, सामाजिक उत्क्रांतीची जननी आहे. व्यक्तिगत जीवनाशी तिचा जवळचा संबंध असला तरी, मूलतः मानवी समूहांच्या, समाजाच्या पुढारल्यापणातच ‘संस्कृती’ चं श्रेष्ठत्व सामावलेलं असतं. किंबहुना, कुठलीही संस्कृति फुलत असताना ती समाजालाही प्रगतिपथावर नेत असते.

‘संस्कृती’ मध्ये काही गोष्टी अंगभूत मानल्या आहेत. उदाहरणार्थ, माणसाचा दृष्टिकोन उच्चभ्रू बनवायसाठी द्यायचं प्रशिक्षण, ज्ञात अशा सर्वोत्तम चांगल्या गोष्टींची, विचारांची, लिखाणांची ओळख वगैरे वगैरे. थोडक्यात, स्वतःच्या आणि समाजाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी व एकूणच मानवजातीच्या उत्थापनासाठी अहोरात्र, दीर्घ काळ चालत असलेली प्रक्रिया म्हणजे ‘संस्कृति’ ! भूत आणि वर्तमानातून काही चांगले व उदात्त आदर्श उचलल्याशिवाय, अंगिकारल्याशिवाय, संस्कृति ठामपणे उभी राहू शकत नाही. तद्वतच ह्या प्रक्रियेतूनच बुद्धिमान व क्रियाशील व्यक्तींचा ताफा समाजकल्याणासाठी उभा राहाणं हेही ओघानंच आलं.

प्रस्थापित संस्कृती (तीही सतत प्रक्रियेमुळे बदलत राहातेच !) काही निश्चित प्रमाणे ठरवून देते. त्यांच्या आधारे मानवी कृतींचा चांगलावाईट अर्थ लावला जातो व समाज ‘चांगल्या’ मार्गावर चालेल असं बघितलं जातं. हा फरक ओळखायला शिकवून, चांगल्याचा स्वीकार करायला लावणं हेच कुठल्याही संस्कृतीचं मूल तत्त्व मानायला हरकत नाही, असं मला वाटतं.

शुद्ध आचार, विचार आणि कृती ही सुसंस्कृत मानवी मनाची मूलतत्त्वे मानली पाहिजेत. सृष्टी आणि अर्थातच ‘माणूस’ ही परमेश्वराची (अल्लाची !) निर्मिती आहे. अल्लानिर्मित सृष्टीत ‘मनुष्यजात’ ‘पूर्ण’ मानली गेली आहे. हे ‘पूर्णत्व’ जाणून घेण्यासाठी, टिकवण्यासाठी, जोपासण्यासाठी, फुलवण्यासाठी, प्रगत

संस्कृति आवश्यक आहे; परंतु मानवी मनाला जर मार्गदर्शन नसेल, त्याची सदसद्विवेक बुद्धी जर जागवली गेली नसेल, तर तो कधी तरी चांगले विचार करू शकेल, बोलू शकेल वा चांगल्या गोष्टी करू शकेल असं वाटत नाही. (ह्याचा अधिक खोलवर विचार करताना अश्मयुगातल्या वा त्याही पूर्वीच्या मानवी जीवनाचा विचार करायला हवा!) तेव्हा मानवाच्या सुसंस्कृतिकरणाच्या प्राथमिक अवस्थेत, त्याच्या मनाला शुद्ध करणे, त्याची सदसद्विवेक बुद्धी जागृत करणे हे अतिशय महत्त्वाचे आहे.

अशा मूलभूत अवस्थेतून पार पडून, अधिक ज्ञान मिळवून सुसंस्कृत झालेला माणूस, काही तरी 'विशेष' करून दाखवायच्या जिद्दीने उभा राहतो, समाजाला आपलं ज्ञान द्यायचा प्रयत्न करतो. काही तरी चांगलं समाजात रुजवायचा प्रयत्न करतो. स्वार्थ, पूर्वग्रह, संकुचित व दुष्ट प्रवृत्तींवर त्यानं मात केलेली असते. निदान तशी अपेक्षा त्याच्याकडून असते. संस्कृति अशा व्यक्तींना फुलवत राहाते; अशा व्यक्ती त्या संस्कृतीची महती वाढवीत राहतात व त्याच वेळी अशा फुलत राहणाऱ्या संस्कृतीमुळे सर्वसामान्य जनतेचं जीवन बहरत राहातं. प्रगत संस्कृतींची ही प्रमुख लक्षणं मानायला हरकत नाही.

अशाच मानवी मनाच्या उत्थापनेतून विविध संस्कृती ह्या जगात फुलत गेल्या. स्थलकालानुसार, श्रद्धेनुसार, सामाजिक रूढींनुसार त्यांच्यात अलगत्व राहात गेलं हे निश्चित; पण सर्व संस्कृतींमध्ये काही मूलभूत तत्त्वांवर एकवाक्यताच होती हेही निश्चित ! ग्रीक संस्कृति घ्या. खिश्चन संस्कृति घ्या, हिंदू संस्कृति घ्या किंवा इस्लामिक संस्कृति घ्या, मूलतः चांगुलपणाचा स्वीकार व समाजाची सर्वांगीण उन्नति ( विशेषतः जनसामान्यांची ) ह्या बाबतीत कुठेच मतभेद नाहीत ! रूढी, चाली-रीती, श्रद्धा, तपशील ह्यांच्यात फरक आहेत. संस्कृतींमधील अलगत्व प्रायः त्यामुळेच आहे. त्याचमुळे व भौगोलिक कारणांमुळेही ह्या विविध संस्कृतींवर आपोआपच मर्यादा येत गेल्या. प्रत्येक संस्कृतीला प्रामाणिक, श्रद्धाळू पण तितकेच कडवे भक्त, पाठराखे मिळतातच. त्यांच्या कडवेपणातून, क्वचित विविध संस्कृतींमध्ये कडवटपणाही येतो व म्हणूनच सुसंस्कृत समाजानं हे जाणून घेतलं पाहिजे की, मूलतः सर्व संस्कृतींची मूलभूत शिकवण सामान्यतः एकच आहे. फरक आहे तो तपशिलात. आचारविचारांचा !

मी स्वतः इस्लामिक संस्कृतीची अभ्यासक आहे. आजच्या लिखाणाच्या संदर्भात विचारही प्रामुख्याने इस्लामिक संस्कृतीचाच करायचा आहे. हा विचार करतानाही वर उल्लेखिलेली 'संस्कृतीची' ढोबळ कल्पना अर्थातच डोळ्यांसमोर ठेवलेली आहे. संस्कृतीची वर उल्लेखिलेली प्रमाणे इस्लामिक संस्कृतीला कितपत लागू पडतात हेही पाहिलं पाहिजे. इस्लामिक संस्कृतीला जगातल्या विविध संस्कृतींमध्य एक खास स्थान आहे. अभ्यासकांच्या दृष्टीने त्याचाही सारभूत विचार झाला पाहिजे. माझ्या कुवतीने तसा थोडा प्रयत्न मी इथे करत आहे.

इस्लामिक संस्कृतीचं मूळ अर्थातच कुराणात आहे. कुराण हे निव्वळ सैद्धान्तिक-धार्मिक पुस्तक नाही हे इथे लक्षात घेतलं पाहिजे. माणसाच्या दैनंदिन जीवनाचं ते मार्गदर्शकही आहे. रोजच्या धकाधकीच्या जीवनात आवश्यक असे उपयुक्त व सहज आचरणीय उतारे कुराणात आहेत. ह्या ठिकाणी एक गोष्ट नमूद केली पाहिजे. धर्मगुरू महंमदांचं संपूर्ण जीवन कुराणाबरहुकूम आहे. आपल्या प्रत्येक कृतीतनं, प्रत्येक भाष्यातनं त्यांनी कुराणातली तत्त्वं अवलंबिली. महंमद पैगंबरांचं संपूर्ण आयुष्य कुठल्याही आदर्शानुसार उत्कृष्ट होतं ही तर वादातीत बाब आहे ! आणि त्यांचं संपूर्ण जीवन कुराणानुसार आहे. अल्लाहनी त्यांच्यावर सोपवलेली न्यायदानाची कामगिरी पार पाडतानाही हेच सूत्र आपल्याला आढळून येईल. थोडक्यात त्यांच्या दैनंदिन आयुष्यात अल्लाहच्या संदेशांचं तंतोतंत पालन झाल्याचं आपल्याला आढळून येईल व त्यामुळे जनतेचा फायदा झाल्याचं दिसून येईल.

महंमद पैगंबरांनंतर त्यांच्या शिष्यांनीही हीच परंपरा पुढे चालवली. त्यांनी महंमदांचं जीवन जवळून पाहिलं होतं. त्यांची कृति-विचार-जीवन महंमदांनी घालून दिलेल्या आदर्शानुसार होतं. साहजिकच पवित्र कुराण आणि हादित् ह्यांच्यानुसार त्यांचं वागणं-चालणं होतं. अगदी सूक्ष्म तपशिलात सुद्धा ही मंडळी कुराणापासून तसूभर देखील ढळली नाहीत–महंमदांप्रमाणेच! ह्यातूनच एका नव्या जीवनपद्धतीचा उद्गम झाला. इतिहासात आपण थोडे जरी डोकावलो, तरी असं दिसून येईल की ह्या शिष्यवरांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. रात्रंदिवस खपून आपल्याला मिळालेलं ज्ञान, चांगुलपणाची शिकवण, पवित्र कुराणाचे संदेश जनतेपर्यंत नेले. त्यांच्या मनावर बिंबवले ! महंमद व त्यांच्या शिष्यांनी अशा पद्धतीने पवित्र कुराणावर आधारित एक नवीन घडी बसवली, राबवली–यशस्वीरीत्या राबवली हीच मूळची इस्लामिक संस्कृती ! तिचा मुख्य आधार पवित्र कुराण ! ! महंमद पैगंबर व त्याच्या शिष्यांचं जीवन हे आदर्श ! !

पृष्ठ २८ वर

बॉम्बे डाइंग
एकमेव वितरक
डेक्कन जिमखाना. ● लक्ष्मी रोड, पुणे
आज आपल्यासाठीं
खास नवीन प्रकार
स्वस्त दरात
बेल बॉटम पिसेस
कुडत पिसेस

# बांगला देश

## मुजीबची आहुती

वा. दा. रानडे

" पृथ्वीवर अशी कोणतीही शक्ती नाही जी माझा आवाज बंद करू शकेल.

वंचित मानवांच्या कल्याणासाठी शोषण व वंचना यांच्याविरुद्ध संग्रामात सर्व प्रतिकूल परिस्थितीमध्ये माझी वाणी उच्चार करीतच राहील. मृत्यूच्या भीतीने मी डरत नाही. "

–शेख मुजीबुर रहमान

पंधरा ऑगस्टला बांगला देशमध्ये झालेल्या लष्करी कटात अध्यक्ष शेख मुजीबुर रहमान मारले गेले. त्यांनी स्वतःच म्हटल्या-प्रमाणे मृत्यूला भिऊन आपल्या अंगीकृत कार्यापासून ते कधी ढळले नाहीत. शोषित मानवाच्या कल्याणासाठी शेवटपर्यंत ते झगडत राहिले व त्यातच त्यांची आहुती पडली.

मुजीब यांचे जीवन म्हणजे एक अखंड संग्राम होता. फरीदपूर जिल्ह्यात गोपाळगंज येथे एका मध्यमवर्गीय कुटुंबात २२ मार्च १९२२ ला त्यांचा जन्म झाला. त्या वेळच्या पूर्व बंगालमध्ये हिंदु जमीनदारवर्ग मुस्लीम शेतकऱ्यांची पिळणूक करीत होता. त्यांना तुच्छतेने, अवहेलनेने वागवीत होता. हिंदु जमीनदाराच्या कचेरीत मुस्लीम शेतकऱ्याने केस विंचरून यायचे नाही, खाली जमिनीवर बसायचे. हिंदु शेतकऱ्याला मात्र बसायला चटई मिळे. या अवहेलनेच्या वागणुकीमुळे मुस्लीम शेतकरीवर्गात हिंदु जमीनदारांविरुद्ध नेट निर्माण झाली होती. संघर्षाचे स्वरूप मूलतः आर्थिक पण जमीनदारवर्ग हिंदु आणि बहुसंख्य शेतकरी मुसलमान, त्यामुळे या संघर्षाला हिंदु–मुस्लीम असे जातीय स्वरूप आले होते आणि दोन्ही धर्मातल्या जातीय-वाद्यांनी आपल्या हितसंबंधांचे रक्षण करण्यासाठी संघर्षाच्या या बाह्य जातीय स्वरूपावरच भर दिला होता. या अवहेलनेच्या वागणुकीचा परिणाम मुजीबवर शालेय वयातच झाला. तो आठव्या इयत्तेत असताना सुऱ्हावर्दींची व त्याची भेट झाली. या उत्साही मुलाला सुऱ्हावर्दींनी मुस्लीम लीगच्या राजकारणात ओढले. कलकत्त्यास कॉलेज–शिक्षण घेत असतानाच तो लीगच्या राजकारणात उत्साहाने भाग घेऊ लागला.

बंगाली मुस्लिमांचे हाल मुस्लीम लीग दूर करील या अपेक्षेने मुजीब तरुणपणी मुस्लीम लीगमध्ये सामील झाला होता; पण पाकिस्तानच्या स्थापनेनंतर थोड्याच दिवसांत त्याचा भ्रमनिरास झाला. पाकराज्यकर्त्यांनी चालविलेल्या बंगाली भाषेच्या पद्धतशीर गळचेपीने त्याला पहिला धक्का बसला. बंगाली भाषेला तिचे न्याय्य स्थान मिळाले पाहिजे यासाठी मुजीबने चळवळ सुरू केली.

अकरा मार्च १९४८ : पाकिस्तानच्या स्थापनेनंतर सात महिन्यांनी पाकचे संस्थापक महमद अली जिना यांनी डाक्क्याला प्रथमच भेट दिली. जाहीर सभेत भाषण करताना ते म्हणाले, ' उर्दू ही पाकिस्तानची राष्ट्रभाषा होणार आहे. याबद्दल कोणी शंका बाळगू नये. जो कोणी निराळे काही म्हणेल तो पाकिस्तानचा शत्रू आहे.' त्यांचे हे शब्द ऐकताच शंभर तरुण निदर्शकांनी बंगालीचा जयघोष व उर्दूच्या धिक्काराच्या घोषणा सुरू केल्या. पोलिसांनी लागलीच या तरुणांभोवती कडे करून त्यांना ताब्यात घेतले व दुसऱ्या दिवशी जिना कराचीस गेल्यानंतरच त्यांना सोडून दिले. या तरुण निदर्शकांचा नेता होता शेख मुजीबुर रहमान. जिनांच्या धोरणास उघड विरोध करण्याचे धैर्य दाखविणारा हा पहिला बंगाली. जिनांच्या भेटीनंतरही त्यांनी भाषिक आंदोलन चालूच ठेवले. त्यासाठी प्रथम त्यांना सात दिवसांची आणि नंतर अडीच वर्षांची शिक्षा झाली.

बंगाली भाषेला तिचे न्याय्य स्थान मिळावे यासाठी मुजीब यांनी केलेला लढा हा पाकिस्तानात पूर्व बंगालींना न्याय्य व समतेची वागणूक मिळावी यासाठी करावयाच्या व्यापक लढ्याचा एक भाग होता. मुजीब यांनी या व्यापक लढ्यात स्वतःला वाहून घेतले. सुऱ्हावर्दींनी याच उद्देशाने अवामी लीग स्थापन केली आणि मुजीबना संयुक्त चिटणीस नेमले. मुस्लीम लीगविरोधी इतर काही गटांशी सहकार्य करून फजलूल हक्क व सुऱ्हावर्दी यांनी संयुक्त आघाडी स्थापन केली आणि १९५३ साली प्रांतिक विधान-सभेच्या निवडणुकात मुस्लीम लीगचा दण-दणीत पराभव केला. विधानसभेच्या एकूण ३०० जागांपैकी मुस्लीम लीगला अवघ्या ९ मिळाल्या. फजलूल हक्क यांनी मंत्रिमंडळ बनवून मुजीबना सहकारमंत्री नेमले; पण दोन महिन्यांच्या आतच हे मंत्रिमंडळ बडतर्फ करण्यात आले व शेख मुजीबना त्याच्या दुसऱ्याच दिवशी अटक झाली. संयुक्त आघाडीची मुख्य मागणी स्वायत्ततेची होती.

मुक्ततेनंतर स्वायत्ततेचा लढा मुजीबनी पुढे चालू ठेवला. आयूबखान आणि नंतर याह्याखान या लष्करी हुकुमशहांशी निर्धाराने झुंज दिली. 'एक माणूस एक मत' म्हणजेच लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व हे तत्त्व त्यांनी याह्याखानांना मान्य करायला भाग पाडले. त्यानुसार झालेल्या निवडणुकांत मुजीब यांच्या अवामी लीगने अभूतपूर्व विजय मिळविला. नॅशनल असेंब्लीच्या एकूण ३०० जागांत पूर्व पाकसाठी असलेल्या १६१ जागांपैकी १६० जागा आणि प्रांतिक विधिमंडळाच्या ३०० पैकी २९१ जागा अवामी लीगने जिंकल्या.

निवडणुकीनंतर प्रतिनिधींच्या हाती सत्ता सोपविण्यास याह्याखानांनी विलंब लावला. नॅशनल असेंब्लीची बैठक बेमुदत पुढे ढकलली तेव्हा मुजीबनी असहकार आंदोलन १ मार्च १९७१ ला सुरू केले. या आंदोलनात कामगारांपासून हायकोर्ट-जज्जांपर्यंत सर्व थरांतील साडेसात कोटी पूर्व बंगाली जनता एकजुटीने सामील झाली. टिक्काखानांना गव्हर्नरपदाची शपथ देण्याचे हायकोर्ट-जज्जाने नाकारले. हा या आंदोलनाच्या यशाचा कळस. असहकार एवढा कडक होता की पाक सैनिकांना अन्न मिळेना. पश्चिम पाकमधून विमानांनी ते मागवावे लागले.

याह्याखानांनी मुजीबची चळवळ दडपण्यासाठी २५ मार्च १९७१ ला लष्करी मोहीम सुरू केली. मुजीबना अटक झाली तरी त्यांच्या सहकाऱ्यांनी गनिमी लढा चालू ठेवला. या संघर्षातून अखेर भारत–पाक युद्ध होऊन १६ डिसेंबर १९७१ ला बांगला देश स्वतंत्र झाला.

आता नव्या राष्ट्राच्या उभारणीचे कार्य मुजीब यांना करावयाचे होते. धर्मनिरपेक्षता, राष्ट्रवाद, लोकशाही आणि समाजवाद ही त्यांची चतुःसूत्री होती. संसदीय लोकशाहीच्या मार्गाने आपण प्रगती करू शकू असे वाटल्याने संसदीय लोकशाहीची घटना त्यांनी प्रथम मान्य केली. अवामी पक्षाने निवडणुकीत प्रचंड बहुमत मिळविले; पण केवळ विधिमंडळात आपल्यामागे मोठे बहुमत असून आपण समाजपरिवर्तन करू शकत नाही असा अनुभव त्यांना आला. आवामी लीगमधील बेशिस्त, नोकरशाहीतील भ्रष्टाचार, पाक व चिनी हस्तकांच्या दहशतवादी कारवाया या समस्या त्यांच्या पुढे होत्या. त्यांना तोंड देण्यास संसदीय लोकशाही अपुरी पडत आहे असे दिसून आल्याने गेल्या २६ जानेवारीस संसदीय लोकशाही रद्द करून त्यांनी अध्यक्षीय लोकशाही स्थापन केली. बांगला कृषक-मजदूर अवामी लीग हा एकच नवा राष्ट्रीय पक्ष सबंध देशात राहील असे जाहीर केले. या पक्षात मुलकी व लष्करी अधिकाऱ्यांनाही प्रतिनिधित्व देण्यात आले. कारभाराच्या सोयीच्या दृष्टीने छोटे जिल्हे स्थापन करण्यात आले. नोकरशाहीचा अनावश्यक फापटपसारा कमी करण्यासाठी काही अधिकारपदे रद्द करण्यात आली.

पक्षउभारणीपासून सबंध समाजाची घडीच नव्याने बसविण्याचा मुजीब यांचा प्रयत्न होता पण; नवीन समाजघडी बसविण्यासाठी निष्ठावंत कार्यकर्त्यांची संघटना आणि निर्णय निर्धाराने अंमलात आणणारे कार्यक्षम अधिकारी यांची जोड मिळायला हवी. मुजीब यांना ही जोड मिळू शकली नाही. ज्यांच्या हितसंबंधांत बाध आला त्यांनी काही लष्करी अधिकाऱ्यांशी संगनमत करून मुजीब यांचाच बळी घेतला.

बांगला देशचे राजकारण यापुढे कोणते वळण घेईल हे आताच सांगणे कठीण आहे. लोकशाही व समाजवादाच्या प्रस्थापनेसाठी तेथील जनतेला प्रखर लढा करावा लागणार आहे आणि मुजीबसारखा जनतेची मने जिंकून घेणारा नेता मात्र आता नाही, अशा स्थितीत हा लढा चालविणे फार कठीण जाणार आहे.

## नव्या राजवटीचे धोरण

बांगला देशातील लष्करी क्रांतीने सुरुवातीस बऱ्याच शंका निर्माण झाल्या होत्या; पण नव्या राजवटीच्या निवेदनांनी त्या दूर झाल्या. भारताच्या दृष्टीने सर्वांत महत्त्वाचा प्रश्न म्हणजे धर्मनिरपेक्ष राष्ट्रवाद, लोकशाही आणि समाजवाद ही मुजीब यांची पुरस्कारलेली तत्त्वे नवी राजवट पुढे अनुसरणार की नाही हा होता. बांगला देशच्या नावाने 'इस्लामी' प्रजासत्ताक हे शब्द घातल्याचे पहिल्या बातमीत म्हटले होते. बांगला देश आता इस्लामी राष्ट्र झाले, त्याने धर्मनिरपेक्ष राष्ट्रवादाची बैठक सोडली, पाकिस्तानच्या तो अधिक जवळ आला असा याचा अर्थ लावून भुट्टोंनी नव्या राजवटीला लागलीच मान्यता देऊन टाकली. एवढेच नव्हे तर धान्य व कापडाची मदत पाठविली; पण बांगला देशच्या नावात तर बदल झालेला नाहीच, त्याचा धर्मनिरपेक्ष राष्ट्रवाद यापुढेही चालू राहणार आहे असे नंतरच्या निवेदनात स्पष्ट करण्यात आल्याने भुट्टोंची निराशा झाली.

बांगला देशाच्या निर्मितीत भारताचा वाटा मोठा आहे. भारत व बांगला देशमध्ये पंचवीस वर्षांचा मैत्रीचा व सहकार्याचा करार झालेला आहे; पण नव्या राजवटीच्या पहिल्या निवेदनात भारताशी संबंध काय राहणार यावद्दल काहीही उल्लेख नव्हता. त्यामुळे नव्या राजवटीच्या धोरणाबद्दल भारताच्या मनात शंका निर्माण होणे स्वाभाविक होते; पण भारताशी मैत्री व सहकार्य चालू राहील असे आश्वासन नव्या सत्ताधाऱ्यांनी नंतर दिले आहे.

घटना व पार्लमेंट रद्द करण्यात आलेली नाही असे नव्या राजवटीने जाहीर केले; पण लोकशाहीचे स्वरूप काय राहणार, मुजीब यांनी स्थापन केलेली एकपक्षीय राजवटच पुढे चालू राहणार काय हे अजून स्पष्ट करण्यात आलेले नाही. लष्करी कायदा किती काळ जाहीर राहणार हे जाहीर झालेले नाही; पण लष्करी कायदा असेपर्यंत नव्या सरकारने घेतलेले सर्व निर्णय कोर्टाच्या कक्षेबाहेर राहतील असे जाहीर करण्यात आले आहे. याचा अर्थ बांगला देशमध्ये अनिश्चित काळपर्यंत लष्करी हुकुमशाही राहणार आहे.

## क्रांतीची कारणे

लष्करी क्रांती कशी घडून आली याचा पूर्ण तपशील समजण्यास आणखी काही काळ जावा लागेल. या क्रांतीमागे परदेशी सत्तांचा हात होता की हा केवळ अंतर्गत लष्करी उठाव होता ? क्रांतीमागे सी. आय. ए. चा हात असल्याचा आरोप हेलसिंकीहून जागतिक शांतता मंडळाने काढलेल्या पत्रकात केला आहे. जागतिक शांतता मंडळ ही कम्युनिस्ट सहप्रवाशांची संघटना. तिची प्रतिक्रिया म्हणजे रशियाच्या बाजूच्या कम्युनिस्ट राष्ट्रांची प्रतिक्रिया असे म्हणायला हरकत नाही. प्रावदातील लेखात परराष्ट्र धोरण पूर्वीचेच चालू राहील या नव्या अध्यक्षांच्या आश्वासनाचा उल्लेख केला असला तरी साम्राज्यवादी, माओवादी आणि अंतर्गत प्रतिगामी गट विरोधी हालचाली करून या धोरणाच्या अंमलबजावणीत अडथळे आणतील काय अशी शंका व्यक्त केली आहे. क्रांतीशी परदेशांचा काही संबंध नसून आर्थिक पेचप्रसंगामुळे ती झाली असा काही निरीक्षकांचा अंदाज आहे; पण नव्या राजवटीच्या निवेदनात या पेचप्रसंगाचा कोठेही उल्लेख नाही. उल्लेख आहे तो भ्रष्टाचारी राजवट नष्ट केल्याचा, आर्थिक परिस्थिती बांगलाच्या स्थापनेपासूनच बिकट होती. क्रांतीच्या वेळी ती अधिक बिकट झाली होती असे नाही. चलनवाढीला आळा घालण्यासाठी भारी नोटा रद्द करणे, अवमूल्यन करणे यासारखे उपाय मुजीबनी योजले होते व त्याचा अनुकूल परिणाम दिसू लागला होता. तेव्हा आर्थिक पेचप्रसंग हे क्रांतीचे कारण म्हणता येणार नाही. सर्व सत्ता आपल्या हाती एकवटण्याचे मुजीब यांचे धोरण त्यांच्या काही सहकाऱ्यांना व लष्करी नेत्यांना पसंत नव्हते. क्रांतीने फक्त नेतृत्वात बदल केला, धोरणात फारसा बदल झालेला नाही असे आतापर्यंतच्या निवेदनावरून तरी वाटते; पण नव्या राजवटीच्या स्वरूपाबद्दल व धोरणाबद्दल एवढ्या अल्पकाळात निश्चित काही म्हणणे धाडसाचे होईल. एकदम फार मोठे बदल केले तर त्याची उलटी प्रतिक्रिया होईल याची कल्पना असल्याने नवे सत्ताधारी धोरणाची दिशा हळूहळू बदलण्याची शक्यता आहे. नासरनंतर सादतनी इजिप्तचे धोरण बदलून टाकले तसे बांगला देशच्या बाबतीत होणार नाही असे आज तरी ठामपणे म्हणता येत नाही. □

# चंपावतची नरभक्षक वाघीण

लेखक : जिम कार्बेट

अनुवादक : का. धों. देशपांडे

## उत्तरार्ध

दुसऱ्या दिवशी सकाळी चहा आणि ऑर्चर्डच्या बागांमधून खूप हिंडलो. झऱ्यावर झक्कपैकी आंघोळ केली. दुपारी चंपावतहून तहसीलदारही परत आला. त्याला सुरक्षित पाहिल्यावर अर्थातच मला बरे वाटले.

आजूबाजूला हिरवीगार शेते व मध्ये असलेले छोटेखानी गाव पायथ्याशी लांबवर दिसत होते. त्याच्याकडे बघत मी तहसीलदाराशी बोलत होतो. एवढ्यात गावातून एक माणूस आमच्या दिशेने टेकडी चढू लागल्याचे मी पाहिले. माणूस जवळजवळ येऊ लागला आणि माझ्या लक्षात आले की तो मोठ्या घाईने काही तरी निरोप सांगावयास आला आहे. कारण तो मध्येच पळावयाचा, मध्येच चालावयाचा. तहसीलदाराला म्हटले 'जरा थांबा, थोड्या वेळातच परत येतो.' आणि मी टेकडीच्या उतारावरून त्या माणसाच्या दिशेने उतरावयास सुरुवात केली. त्याला समजले, की मी त्याच्याकडेच जात आहे. तेव्हा श्वास घेण्यासाठी तो बसला. मला ऐकू येईल एवढ्याजवळ मी जाताच तो ओरडला,

'साहेब, चला लवकर. नरभक्षकाने आताच एका मुलीला मारले आहे.'

'थांबा जरा.' मी म्हणालो व लगेच बंगल्याकडे आलो. घाईघाईने रायफल व काडतुसे घेता घेता तहसीलदाराला बातमी सांगितली व त्याला मागोमाग खेड्याकडे यावयास सांगितले.

निरोप आणणारा माणूस म्हणजे एक वल्लीच होती. त्याचे पाय आणि तोंड एकावेळी चालतच नसे. बोलावयास तोंड उघडले की चालणे बंद! पळावयास लागला की तोंड गप्प! अगदी वैताग आला त्याचा. शेवटी त्याला तोंड बंद करावयास सांगितले व मुकाट्याने आम्ही धावत टेकडी उतरलो.

गावातील पुरुष, स्त्रिया व मुलांचा घोळका आमची वाटच पहात होता. नेहमीप्रमाणे एकदम बोलावयास सुरुवात केली. कोणाचेच बोलणे कळेना. एक माणूस निष्फळपणे त्यांना गप्प करण्याचा प्रयत्न करीत होता. मी त्याला बाजूला घेतले व सर्व हकीगत विचारली. गावापासून साधारण फर्लांगावर असलेल्या तुरळक अशा ओक झाडांकडे बोट दाखवीत त्याने सांगितले की दहाबारा माणसे त्या झाडाखाली काटक्या गोळा करावयास गेली आणि तेवढ्यात वाघ आला व त्यांच्यातील एका सोळा-सतरा वर्षांच्या मुलीला त्याने पकडले. बाकीचे लोक ताबडतोब गावाकडे परतले. मी बंगल्यावर वस्तीला आहे हे समजताच त्यांनी मला सांगावा पाठवला होता.

ज्या माणसाबरोबर मी बोलत होतो त्याचीच बायको त्या काटक्या गोळा करण्यासाठी गेलेल्या माणसांमध्ये होती. टेकडीच्या उतारावर असलेल्या ज्या झाडापासून त्या मुलीला वाघाने पकडले होते ते झाड तिने दाखवले. वाघाने आपले भक्ष्य म्हणजे त्या मुलीला खरोखर उचलून नेले का? असल्यास कोठल्या दिशेला, हे त्या जमावापैकी कोणीसुद्धा पाहिले नव्हते.

मी परत येईपर्यंत लोकांनी गावातल्या गावातच रहावे, कसलाही आवाज करू नये अशा सूचना देऊन मी त्या झाडाकडे निघालो. झाडाजवळ चांगलीच मोकळी जागा होती आणि वाघासारखा प्राणी दहाबारा माणसांच्या नकळत येतो काय, मुलीला उचलतो काय व त्या मुलीच्या दबलेल्या आवाजातील अस्फुट किंकाळी येईपर्यंत त्यांना काहीच कळू नये याचे मला आश्चर्य वाटले.

मुलगी जेथे मारली होती तेथे रक्ताचे थारोळेच जमले होते. योगायोग असा विचित्र की त्या लालभडक थारोळ्याशेजारी त्या मुलीच्या गळ्यातील चकचकीत निळ्या मण्यांची माळ पडली होती. या जागेपासून, टेकडीच्या जवळून, वाघिणीचा माग गेलेला दिसत होता.

माग अगदी स्पष्ट दिसत होता. ज्या बाजूला पोरीचे डोके लोंबत होते त्या बाजूस रक्ताचा सडाच शिंपडला गेलेला होता. दुसऱ्या बाजूला पाय फरफटत गेलेले दिसत होते. टेकडीवर अर्धाएक मैल गेल्यावर पोरीची साडी व आणखी वर कड्याजवळ गेल्यावर तिचा घागरा (परकर) मला सापडला. पुन्हा एकदा वाघीण विवस्त्र स्त्रीला नेत होती; पण त्यातल्या त्यात बरी

गोष्ट एवढीच की या वेळेस ओझे मृत होते.

टेकडीच्या अगदी वरच्या बाजूला कडा होता. त्या बाजूचा वाघिणीचा माग अगदी काटेरी अशा झुडुपांतून जात होता. झुडुपात त्या पोरीचे लांबसडक काळेभोर केस अडकलेले दिसत होते. त्याच्या पलीकडे वाघीण ज्या रस्त्यावरून गेली तो भाग खाजकोयलीने भरला होता. त्याला टाळून कसे जावे याचा विचार मी करीत होतो आणि मला पाठीमागून कोणाच्या तरी पावलांचा आवाज ऐकू आला. मी मागे वळून पाहिले. एक माणूस बंदूक घेऊन माझ्याकडे येत होता.

'कोणीही गाव सोडावयाचे नाही अशी वाघाच्या मागावर निघताना मी गावकऱ्यांना सक्त ताकीद दिली असताना तुला इथे कोणी यावयास सांगितले ?' मी त्याला विचारले.

'मी तहसीलदाराच्या सांगण्यावरूनच आलो आहे.' तो म्हणाला.

तहसीलदाराची आज्ञा मोडावयाची त्याला भीती वाटत होती. कसेही करून तो आलाच होता. त्याच्याशी वादविवाद घालणे म्हणजे बहुमूल्य वेळ दवडण्यासारखे होते. म्हणून मी त्याला पायातले जड बूट काढावयास सांगितले. त्याने ते झुडपात दडवून ठेवले. नंतर 'सगळीकडे तीक्ष्ण नजर ठेवीत माझ्यापाठीमागे ये' असे मी त्याला सांगितले.

मी अगदी पातळ असे मोजे, त्यांवर रबरसोल असलेले बूट व अर्धी पँट घातली होती. खाजकोयलीचा त्रास होणार होता. कारण ती टाळून जाण्याजोगा रस्ता सापडला नाही. शेवटी त्या वाघिणीच्याच रस्त्याने गेलो. फार त्रास झाला.

तो भाग ओलांडला व रक्ताचा माग एकदम डावीकडे वळून खाली खोल टेकडीच्या पायथ्याशी गेलेला दिसला. पायथ्याचा हा भाग दाट बांबूच्या बनांनी भरला होता. शंभर यार्डपर्यंत रक्ताचा माग एका अरुंद व एकदम ताठ उतार असलेल्या ओढ्यात गेला होता. या मार्गाने वाघीण चांगलीच धडपडत गेली होती. कारण उचकटून गेलेले दगड व माती जागजागी दिसत होती. या ओढ्यातून मी चांगला पाच-सहाशे यार्डपर्यंत गेलो. तोपावेतो माझ्या सोबत्याचा धीर सुटू लागला होता. अनेक वेळा अगदी काकुळतीला येऊन अक्षरशः माझी बाही धरून त्याने दबल्या आवाजात माझी विनवणी चालू ठेवली. तो सांगत होता, की उजव्याडाव्या बाजूस, मागे कोठे तरी आपल्याला वाघाची चाहूल लागते आहे. मधेच आम्हाला तीस फूट उंचीचा प्रचंड खडकाचा एक सुळका लागला. सोबत्याचा धीर आता पार खचला होता. एक पाऊलदेखील पुढे येणे त्याला शक्य नव्हते. शेवटी मी परत येईपर्यंत त्या उंच खडकावर बसण्यास मी त्याला सांगितले. मोठ्या आनंदाने तो भराभर चढून गेला. वर पोचल्यावर आपण ठीक असल्याची खूण त्याने मला केली व मी मग एकटाच ओढ्यातून आणखी खाली गेलो. खडकाला वळसा घेऊन पुन्हा शंभर यार्ड गेल्यावर, डाव्या बाजूने त्या ओढ्याला आणखी एक नाला येऊन मिळत असल्याचे दिसले. त्याच्या संगमावर पाण्याचे एक डबके होते. त्याच्या शेजारी मोठ्या प्रमाणावर रक्त सांडलेले दिसले.

वाघिणीने पोरीला सरळ याच ठिकाणी आणले असले पाहिजे. माझ्या येण्याने तिच्या मेजवानीत अडथळा निर्माण झाला असावा. अत्यंत ठसठशीत असे पावलांचे ठसे व त्याभोवती हाडांचे तुकडे पडलेले दिसत होते. त्या ठशांवरून विचित्र रंगाचे पाणी झिरपत होते. वरून खाली येत असता त्या डबक्याच्या शेजारी एक विचित्र पदार्थ दिसून मी बुचकळ्यात पडलो. जवळ आल्यावर तो पदार्थ पाहिला. माणसाचा पाय होता तो. गुडघ्यापासून कुऱ्हाडीने व्यवस्थित तोडावा असा तो तुटला होता आणि तुटलेल्या जागेतून गरम गरम रक्त ठिपकत होते. नंतर अनेक वर्षे मी नरभक्षकाच्या शिकारी केल्या, पण तो सुकुमार यौवनपूर्ण असा पाय तशा अवस्थेत पडल्याचे करुण असे दृश्य मी पाहिले नाही.

त्या पायाकडे बघत बसलो व वाघिणीचे सर्व विचार मी विसरूनच गेलो आणि एकदम मला जाणवले की मी फार धोक्यात आहे. घाईघाईने बंदूक उचलली व नळी वर करून ट्रिगरवर बोट ठेवून तोंड वर केले तेव्हा समोरच्या पंधरा फूट उंचीच्या दरडीवरून हळूहळू मातीची बारीक ढेकळे गडगडत येऊन त्या डबक्यात पडत होती. नरभक्षकवाघिणीच्या या सगळ्या हालचाली मला नव्या होत्या. मला अनुभव नव्हता, नाही तर अशा तऱ्हेने वाघाला हल्ला करण्यासाठी मी कधीच संधी दिली नसती. वाघीण बहुधा माझ्यावर झेप घ्यावयाच्या बेतात होती; पण मी बंदुकीची नळी वर केली व त्या कृतीनेच मला वाचवले. नळी बघितल्यावर झेप घ्यावयाची ती थांबली असावी किंवा वळून ती परत निघाली असावी. हे करत असताना दरडीवरची मातीची ढेकळे उसकटून तीच माझ्यासमोर खाली पडत होती.

ती दरड इतकी उभट होती की सरपटत जाऊन चढणे अशक्यच होते. एकच मार्ग म्हणजे जरा गती घेऊन एकदम धावत जाऊन चढणे. गती घेण्यासाठी दरडीच्या विरुद्ध बाजूला ओढ्यातच मी जरा मागे गेलो. व जोरात धावत आलो. धावताना त्या डबक्यावरून उडी मारली. एका दमात दरड चढलो. वरच्या बाजूला एक झुडूप पकडून थोडी धडपड करूनच वर आलो. वाघिणीच्या हालचाली इतक्या ताज्या होत्या की जमिनीवरील गवत, लहान लहान वनस्पती तिच्या वजनामुळे दबल्या होत्या. त्या नुकत्याच आपापल्या मूळच्या अवस्थेत येत होत्या. त्यावरून वाघीण कशी व कुठल्या मार्गाने गेली हे दिसत होते. जरा पुढे गेल्यावर एका खडकाच्या खाली आपले भक्ष्य ठेवून ती मला पाहावयास कशी आली हे पण माझ्या लक्षात आले.

मुलीला घेऊन वाघीण ज्या रस्त्याने गेली तो मार्ग येथून पुढे अनेक एकर पसरलेल्या ओसाड अशा प्रचंड खडकांमधून जात होता. त्या मार्गाने जाणे जेवढे कठीण तेवढेच जिवावरचे पण होते. खडकांना बऱ्याच ठिकाणी रुंद अशी भगदाडे पडलेली होती, तर काही ठिकाणी खोलवर घळी तयार झाल्या होत्या. ही भगदाडे व घळी या सर्वत्र फर्न व ब्लॅकबरी या झुडपांनी पार झाकल्या गेल्या होत्या. एखादे पाऊल जरा चुकले की खलासच. अशा परिस्थितीत वाघिणीच्या मागे साहजिकच भराभर जाता येत नव्हते. याचा फायदा घेऊन ती आपले जेवण उरकत होती. ज्या ठिकाणी ती थांबून थांबून खात होती अशा दहाबारा तरी जागा मला सापडल्या. या प्रत्येक ठिकाणी रक्ताचा माग ठळक व स्पष्ट दिसत होता.

वाघिणीने मारलेला हा चारशेछत्तिसावा दुर्दैवी मानव. इतकी माणसे मारल्यामुळे भक्ष्य खात असताना सोडवणुकीला आलेल्या माणसां-

कडून खाण्यात व्यत्यय येणे हे तिच्या परिचयाचेच झाले होते; परंतु इतका लांब सातत्याने तिचा पाठलाग होण्याची, मला वाटते ही पहिलीच वेळ असावी. आणि आपली ही नापसंती ती गुरगुरून व्यक्त करावयास लागली. त्या गुरगुरण्याचा अर्थ जर शंभर टक्के समजावयाचा असेल तर मी ज्या परिस्थितीत तेथे होतो तशा परिस्थितीतच असावयास हवे. चोहोबाजूंना काळेकभिन्न प्रचंड खडक, त्यांच्या आवतीभोवती दाट झुडपे आणि घळीत पडू नये म्हणून प्रत्येक पाऊल टाकताना घ्याव्या लागणाऱ्या काळजीचे दडपण.

शेकोटीभोवती आरामात वसून वाचणाऱ्या वाचकांना माझ्या त्या वेळच्या भावना समजाण्यात ही अर्थातच माझी अपेक्षा नाही. हल्ला करण्याच्या उद्देशाने वाघिणीने केलेली गुरगूर, एकाच वेळी माझ्या मनात भयाने थरकाप उत्पन्न करीत होती; पण त्याच वेळेस मनात आशाही निर्माण करीत होती. पाठलाग केल्यामुळे रागाने बेभान होऊन वाघिणीने जर हल्ला केला तर ज्यासाठी मी आलो तो हेतू साध्य तर होईलच; पण तिने जी दुःखद संकटे निर्माण केली त्यांचाही अंत अशा तऱ्हेने झाला असता.

पण गुरगुरण्यापलीकडे तिच्या मनात काहीच करावयाचे नव्हते. उलट तिच्या त्या गुरगुरण्याच्या आवाजामुळे मी घाबरून परत न जाता, त्याच आवाजामुळे मला तिचा पाठलाग करता येतो हे समल्यावर तिने गुरगुरणेच सोडून दिले.

गेले चार तास मी हिच्या पाठलागावर होतो. मला तिच्या प्रत्येक हालचालीचा पत्ता लागत होता; पण त्या वाघिणीचे मला अंशमात्रही दर्शन झाले नव्हते. समोरच्या टेकडीवरील सावल्या लांब लांब होत चालल्या. त्याकडे बघताच माझ्या लक्षात आले की अंधारावयाच्या आत खेड्यात परतावयाचे असेल, तर आता मागे फिरावे हे उत्तम.

मगाशी जो तुटलेला पाय सापडला होता, त्याची मालकीण हिंदू होती. दहनासाठी तिच्या शरीराचा काही भाग मिळाला तर तो आवश्यकच होता. तेव्हा परत येताना त्या डबक्याजवळ मी एक खड्डा खणला व तेथेच तो पाय पुरला. त्यामुळे वाघिणीपासून तो सुरक्षित राहून जेव्हा गरज लागेल तेव्हा सापडला असता!

मला परतलेला बघून खडकावर बसलेल्या माझ्या सोबत्याने सुटकेचा एक निश्वास टाकला. मला जाऊन बराच वेळ झाला होता. वाघिणीची गुरगुर तो पण ऐकतच होता. या दोहोंवरून त्याने निष्कर्ष काढला की वाघिणीला आणखी एक भक्ष्य मिळाले असावे आणि त्याची अडचण मोठ्या मोकळ्या मनाने त्याने मान्य केली ती म्हणजे आता परत एकटे खेडेगावात कसे जावयाचे ही.

बरोबर घाबरलेला माणूस, त्याच्या हातात भरलेली बंदूक. काय होते ? खरोखर हा असा माणूस येताना माझ्यामागून येतच होता; पण त्यात काही धोका आहे असे मला वाटले नव्हते; पण परत जाताना तो घसरून पडला व त्याच्या बंदुकीच्या नळीची दिशा मी पाहिली व माझे मत एकदम बदलले. तेथून पुढे कानाला खडा लावला की यापुढे नरभक्षकाच्या पाठलागावर कधीही कोणालाही घेऊन जावयाचे नाही. नेहमी एकट्यानेच जावयाचे. निःशस्त्र माणसाचे रक्षण करणे कठीण तर खरेच; परंतु तोच जर सशस्त्र असेल तर स्वतःचे संरक्षण करणे यापेक्षा अवघड जाते.

ज्या ठिकाणी त्या माणसाने आपले बूट लपवून ठेवले होते त्या टेकाडाच्या शिखरावर आलो. तेथे जरा बसून धूम्रपान करीत उद्या पुढे काय करावे याचा विचार करीत बसलो.

आज रात्री वाघीण उरल्यासुरल्या भक्ष्याचा चट्टामट्टा करील व उद्या निवांतपणे दिवसभर या खडकात लोळत पडेल यात शंकाच नव्हती. त्या ठिकाणी जाऊन तशा मोकळ्या जागेत तिला ठोकण्याची मला फारशी आशा नव्हती. उलट अशा प्रयत्नात बार जर हुकला तर ती सावध होऊन ही वस्तीच सोडण्याची शक्यता होती आणि मग शिकार म्हणजे पुन्हा पहिल्यापासून सुरुवात. तेव्हा जर पुरेशी माणसे मिळाली तर हाका घालून तिला उठवणे हाच एक मार्ग होता.

समोर पसरलेली पर्वतराजी एका अतिभव्य रंगमंचासारखी माझ्यापुढे दिसत होती. त्या मंचकाच्या समोर दक्षिण दिशेला मी बसलो होतो. पश्चिमेकडून पाण्याचा एक प्रवाह धडपडत जात असल्यामुळे एक खोल दरी निर्माण झाली होती. या दरीमुळेच या भव्य नाट्यगृहाचे दोन भाग पडल्यासारखे वाटत होते. पूर्वेला या प्रवाहाच्या आड एक टेकडी येत होती त्यामुळे तो पुन्हा उत्तरेकडे वाहत होता व त्यामुळे ईशान्येला एक अरुंद खिंड निर्माण झाली होती.

हाका घालून वाघिणीला बाहेर काढण्याचा कार्यक्रम खरोखर कठीणच होता. कारण ज्या टेकडीत वाघीण जाऊन बसली होती तो भाग चांगला पाऊण मैल लांब, अर्धा मैल रुंद व घनदाट जंगलांनी भरलेला होता. तरी पण हाका घालणारांनी माझ्या सूचना जर बरोबर पाळल्या तर वाघीण मिळण्याची शक्यता होती.

गावात तहसीलदार माझी वाटच पहात होता. त्याला मी सर्व परिस्थिती समजावून सांगितली व मिळतील तितकी जास्तीत जास्त माणसे जमवून दुसऱ्या दिवशी सकाळी दहा वाजता ती मुलगी जेथे मारली गेली तेथे मला भेटण्यास सांगितले. शक्य तितके करण्याचे वचन देऊन तो चपापतला परत गेला व मी बंगल्यावर येण्यासाठी पुन्हा टेकडी चढू लागलो.



पहाटे तांबडे फुटताच मी जागा झालो. भरगच्च खाऊन घेतले व सगळे सामान आवरून चंपावतला माझी वाट बघावी असे मी माझ्या माणसांना सांगितले. नंतर जेथे हाका घालावयाच्या ती जागा पहाण्यास पुन्हा एकदा गेलो. माझ्या योजनेत काही दोष नव्हता याची खात्री करून घेतली आणि तहसीलदाराला जी जागा सांगितली होती तेथे उरलेल्या वेळेच्या अगोदर एक तास मी पोहोचलो.

माणसे जमविणे तहसीलदाराला काही सोपे गेले नव्हते हे उघडच आहे. नरभक्षकाच्या भीतीचा पगडा या लोकांवर जबरदस्त होता. तेव्हा या लोकांनी आपापली सुरक्षित घरे सोडावीत यासाठी तहसीलदाराला थोडे निराळे उपाय योजावे लागले असणार यात संशय नाही. बरोबर दहा वाजता तहसीलदार व एक माणूस आला. मग दोघे-दोघे, तिघे-तिघे, दहा-दहाजण अशी गट्ठ्याने माणसे आली. दुपारपर्यंत बरोबर २९८ माणसे जमली.

तहसीलदाराने जाहीर केले की कोणाकडे विनापरवाना बंदूक वगैरे असेल तर त्याकडे दुर्लक्ष केले जाईल; एवढेच नव्हे तर जेथे जरूर लागेल तेथे काडतुसे, गोळ्या वगैरे पण पुरविल्या जातील. शिकारीसाठी जी हत्यारे वापरली जातील ती सरकारला दिली तर सरकार ती वस्तुसंग्रहालयात ठेवील, असेही मधाचे बोट त्यांना लावले.

सर्व माणसे जमली. त्यांना आवश्यक ती काडतुसे व गोळ्या वाटून झाल्यावर मी त्यांना त्या टेकडीच्या टोकावर नेले. तेथेच त्या पोरीचा घागरा पडला होता. समोरच्या टेकडीवर वीज पडून जळलेल्या एका पाइनच्या उघडयाबोडक्या बुंध्याकडे बोट दाखवून, त्यांना सांगितले की त्यांनी सबंध टेकडीवर रांग धरून उभे राहावयाचे. मी त्या जळक्या पाइन वृक्षाजवळून रुमाल हालविताच त्यांच्यापैकी ज्यांच्याजवळ बंदुका वगैरे असतील त्यांनी भराभर बार काढावयाचे आणि बाकीच्यांनी ढोलकी, ड्रम्स वगैरे बडवून मोठा आरडाओरडा करायचा आणि मोठमोठे दगड खाली ढकलावयाचे; परंतु मी परत येऊन त्यांना घेऊन जाईपर्यंत कोणीही आपापली जागा सोडावयाची नाही अशी सक्त सूचना त्यांना दिली. सर्व सूचना सर्वांना समजल्याचे त्यांनी ओरडून सांगितले. तहसीलदार माझ्याबरोबर येण्याचा आग्रह करू लागला. कारण गर्दीतील बंदुका वगैरेंनी अपघात होण्याची शक्यता होती. त्याला तो घाबरत होता. मी त्याला येऊ दिले.

खूप लांबचा वळसा घेऊन मी दरी वरच्या बाजूने ओलांडली. तेथून समोरच्या टेकाडावर गेलो व खाली त्या बोडक्या पाइन वृक्षाकडे जाण्यास निघालो; पण उतार फार असल्याने पायात साधे बूट घातलेला तहसीलदार खाली येण्यास तयार होईना. त्याच्या पायांना फोड आले होते व त्यांना आराम द्यावा म्हणून तो बूट काढीत होता. तेवढ्यात वरच्या डोंगरावरील माणसांनी, मी पूर्वी ठरवलेली रुमालाची खूण करण्यास विसरलो या कल्पनेने, भराभर बंदुकी झाडल्या व प्रचंड आवाजात हाका देण्यास सुरुवात केली. खिंडीपासून मी अजून एकशेपन्नास यार्ड लांब होतो आणि मग तेवढे अंतर काटताना मी असा धावलो की विचारू नका. उतारावरून धावताना माझी मान दहा बारा वेळा तरी साफ मोडली असती; पण मी त्या पर्वतमय प्रदेशातच वाढलो होतो. माझी पावले एखाद्या बकऱ्यासारखी पक्की पडत असत.

टेकडीवरून मी भरारा धावत खाली आलो. जागा शोधावयास आता वेळ नव्हता. खिंडीच्या तोंडाशीच एक गवताळ अशी जागा होती. तेथे मी ज्या टेकडीवरून उतरलो होतो तिकडे पाठ करून बसलो. गवत चांगले दोन फूट उंच होते आणि त्यात माझे अर्धे शरीर झाकले जात होते. मी हाललो नसतो तर कोणाच्याच लक्षात आले नसते. माझ्या समोरच्या टेकडीवरून हाका घातल्या जात होत्या. ज्या खिंडीतून वाघीण जाईल असे मला वाटत होते ती डाव्या पिछाडीस मागच्या बाजूस होती.

टेकडीवरील दंगा आता वाढत चालला होता. बंदुकीचे धडाधड आवाज, ढोलक्यांचे बडवणे व शेकडो लोकांचे गगनभेदी ओरडणे अगदी कळसास गेले व समोरून गवताळ अशा उतारावरून आलेली वाघीण मी पाहिली. माझ्यापासून ती साधारण ३०० यार्ड असावी. थोडे अंतर ती अशीच गेली. एवढ्यात वर पाइन झाडाजवळ बसलेल्या तहसीलदाराने आपल्या शॉटगनमधून दोन्ही गोळ्या फटाफट झाडल्या. आवाज ऐकल्यावर वाघिणीने ताडकन एक उंच उडी घेतली व वळून ती सरळ आल्या रस्त्याने परत गेली. आता दाट झुडपात ती नाहीशी होणार म्हणून निराशेनेच काय होईल ते होईल असे समजून मी नेम धरला व वाघिणीच्या पाठोपाठ गोळी सोडली.

वरच्या लोकांनी बंदुकीचे तीन आवाज ऐकले व साहजिकच त्यांना वाटले की वाघीण ठार झाली. त्यांनी राहिलेल्या गोळ्या भराभर झाडून आपल्या बंदुका रिकाम्या केल्या व शेवटचा प्रचंड जयघोष केला. मी इकडे श्वास रोखून वाट बघत होतो. वाघीण आता तिकडे परत जाणार व लोकांच्या भयानक किंकाळ्या ऐकू येणार असे मला वाटत होते. पण एवढ्यात ती समोरून आली. पाण्याचा प्रवाह तिने एका झेपेत ओलांडला व ती सरळ अरुंद खिंडीकडे निघाली. मी सहजपणे नेम धरून एक गोळी झाडली. वाघिण एकदम स्तब्ध झाली. थांबली. तेव्हा मला वाटले की गोळी तिच्या पाठीवरून गेली असावी व आपला मार्ग अडविला गेल्याने ती थांबली असावी; पण तसे काही झाले नव्हते. माझी गोळी तिला लागली होती; पण ती वर्मी न लागता, जरा मागच्या बाजूला लागली होती. आपली गर्दन तिने खाली झुकवली व ती अर्धवट माझ्या बाजूला वळली. त्यामुळे अवघ्या ३० फुटांवरून तिच्या खांद्यावर गोळी घालण्याची तिने मला मस्त संधी दिली. या दुसऱ्या गोळीपुढे तिने माघार घेतली. आपले कान खाली पाडले. दात हिंडिसपणे दाखवीत ती तशीच उभी होती. त्यामुळे खांद्यावर बंदूक ठेवून मी विचार करू लागलो की आता जर तिने हल्ला केला तर काय करावे ? कारण आता माझी बंदूक रिकामी होती आणि जवळ काडतुसे पण नव्हती. येताना मी फक्त तीनच काडतुसे घेतली होती. दोनापेक्षा जास्त बार टाकण्याची मला संधी मिळेल असे वाटलेच नव्हते. तिसरे घेतले ते आणिबाणीसाठी असावे म्हणून.

नशीब माझे, त्या जखमी जनावराने हल्ला करावयाचा विचार सोडून दिला. हळूहळू ती वळली. उजव्या बाजूचा तो पाण्याचा प्रवाह तिने ओलांडला. काही दगडधोंडे घरंगळत खाली आले होते. त्यामधून धडपडत ती वर चढू लागली. वरती अत्यंत उभट अशा त्या टेकडीला जोडणारा एक सपाट मोठा खडक होता. हा खडक व टेक-



**आपली गर्दन तिने खाली झुकवली व ती अर्धवट माझ्या बाजूला वळली.**

डीचा कडा जेथे जोडला जात होता तेथे एक लहानसे झुडुप पक्के रोवून बसले होते. वाघिणीने तेथे जाऊन ते झुडुपच ओरबडण्यास सुरुवात केली. मी तहसीलदाराच्या दिशेने मोठ्याने ओरडून बंदूक आणावयास सांगितले. त्याने ओरडून बरेच लांबलचक उत्तर दिले. मला शेवटचा 'पाय' एवढाच शब्द ऐकावयास आला. माझी रायफल मी खाली ठेवली व भराभर पळत टेकडी चढलो. तहसीलदाराच्या हातून बंदूक हिसकावून घेतली आणि पुन्हा परत आलो.

पुन्हा आलो तो वाघिणीने झुडुप सोडले होते. ती सपाट खडकावर माझ्याच दिशेने फक्त वीस फुटांवर आली होती. नेम धरण्यासाठी बंदूक उचलली आणि माझ्या पोटात गोळा उठला. बंदुकीची बॅरेल व ब्रीचलॉक यांच्यामध्ये सुमारे ३।८ इंचाची फट पडली होती. म्हणूनच पूर्वी जेव्हा तहसीलदाराने बार काढले तेव्हा नुसता आवाज होत होता. गोळ्या फुटल्याच नव्हत्या. आता तसे झाले तर? शिवाय गोळ्या न सुटता, आवाजाच्या धक्क्याने डोळे दिपण्याची शक्यता होती; पण आता माघार घेता येणार नव्हती. तशीच गोळी झाडली. कदाचित मला बसलेल्या धक्क्याने असेल किंवा सदोष बंदुकीमुळे असेल, कसेही असो, पण नेम चुकून गोळी तोंडाऐवजी वाघिणीच्या डाव्या पंजावर बसली.

नंतर हीच गोळी मी माझ्या हाताने तेथून काढली. सुदैवाने वाघीण अगोदरच्या गोळीनेच प्राणांतिक अवस्थेला आली होती. पंजावरचा तो प्रहार तिला असह्य झाला. तिने एक मोठी झोकांडी खाल्ली व प्राण सोडला!

सुरुवातीस हाका घालणारे वाघिणीचे तुकडे तुकडे करावयाचे म्हणत होते. कारण त्यांपैकी प्रत्येकाचे कोणी ना कोणी तरी या वाघिणीने मारले होते; पण थोड्याच वेळात त्यांचा हा आवेग ओसरला. खडकावरून वाघिणीला आणण्याचा मार्ग मी त्यांना दाखवला. अतिशय हळुवारपणे त्यांनी तिला खाली मोकळ्या मैदानावर आणली. व सर्वजण तिला गर्दी करून बघत होते.

खडकावर उभी राहून ज्या वेळेस वाघीण माझ्याकडे बघत होती तेव्हाच मी ओळखले होते की तिच्या तोंडाला काही तरी झाले आहे. आता नीट तपासल्यावर असे दिसून आले की तिच्या तोंडातील डाव्या बाजूचे वरील व खालील सुळ्यांचे दात तुटले होते. वरील दात अर्धे व खालील पार अगदी मुळापासून. बंदुकीच्याच गोळीचा तो प्रताप होता. या जखमेमुळेच तिला आपले नैसर्गिक भक्ष्य पकडता येत नव्हते: परिणामी ती नरभक्षक झाली होती.

माणसांनी फार आर्जवे केली, की वाघिणीचे कातडे येथेच काढू नये. गावात नेऊन त्या क्रूर कर्दनकाळ राक्षसीचा मुडदा घरातील बायालेकरांना दाखवावा, त्याशिवाय या शिकारीवर त्यांचा विश्वासच बसला नसता. तेव्हा हे धूड गावात नेण्याची परवानगी गावकऱ्यांनी माझ्याकडे मागितली.

झाडाच्या दोन चांगल्या जाडजूड फांद्या काढण्यात आल्या व वाघिणीच्या दोन्ही बाजूंना फेटे, पागोटी जे मिळेल त्यांनी या मृत नरभक्षिकेचे प्रेत बांधण्यात आले. सगळी तयारी झाल्यावर ते धूड त्या माणसांनी खांद्यावर उचलले.

घरी परत जाताना गावकऱ्यांना त्या दुर्दैवी पोरीचे डोके सापडले. खिडीतून बारीकसा धुराचा लोट शांत हवेत हळूहळू वर जात असलेला दिसत होता. त्या मुलीचे नातेवाईक मिळालेल्या अवशेषांचे शास्त्रशुद्ध दहन करीत होते त्याचाच हा धूर! योगायोगाची गोष्ट अशी की जेथे या नरभक्षक वाघिणीचा मृत्यू घडला होता, तेथेच तिच्या शेवटच्या भक्ष्याचे और्ध्वदेहिक कर्म पार पाडले जात होते.

दुसऱ्या दिवशी मी वाघिणीचे कातडे वगैरे काढण्यात मग्न होतो व तिकडे तहसीलदार व त्यांच्या नोकरवर्गाने गावकऱ्यांच्या सहाय्याने नाचगाण्याचा जंगी कार्यक्रम योजला होता. या कार्यक्रमाचा अध्यक्ष मी होणार होतो. वाघिणीच्या शरीराची व्यवस्था लावण्याचे काम झाले. मांसाचे तुकडे तुकडे

**पृष्ठ २७ वर**

## : १ :

बर्फाच्या तडाख्यातून बचावलेल्या एकोणीसजणांना, आठ साथीदारांच्या मृत्यूमुळं म्हणावं तितकं दुःख झालं नाही. उलट आपल्यालाही त्या वेळी मुक्ती मिळाली असती तर बरं झालं असतं, असं काहींना वाटू लागलं. शारीरिक आणि मानसिक त्रास असाच जर कायम राहणार असेल तर नको ते जिणे. ही त्यांची इच्छाही पुरी होण्याच्या बेतात होती; कारण सुमारे तासाभरानं पुन्हा एक बर्फाचा कडा कोसळला. परंतु दरवाजा आणि आतील बराचसा भाग आधीच बंद झाल्यामुळं, छतावरच उंची वाढली. आता फेअरचाइल्ड बर्फामधे पूर्णपणे बुडून गेलं होतं. बर्फसमाधि.

रात्र झाली. सर्वच्या सर्वजण ओलेचिंब होऊन कुडकुडत बसले. कडक थंडीपासून बचाव होण्यासाठी गाद्या, उशा किंवा बूट काहीच हाताशी नव्हतं. आतमधे बसून राहण्याइतकी जेमतेम जागा होती. एकमेकांच्या अंगावर रेलून कसंबसं कलंडून ते पडले. रक्तप्रवाह चालू रहावा, म्हणून शेजारच्याचं शरीर हातानं दाबत संकटाला तोंड देत होते. कोण कुठं आहे, याचंही भान त्यांना राहिलं नव्हतं. जागा वाढवण्यासाठी फिटो आणि रॉय, दोघांनी विमानाच्या मधे साचलेला बर्फ दोन्ही कडांना ढकलला. एकाला उभं राहण्याइतकी जागा निर्माण झाली. पाय गोठून जाऊ नयेत म्हणून दुसऱ्याच्या पायांवर पाय ठेवून तिथं एकजण उभा राहिला.

मूळ लेखक : पियर्स पॉल रीड

अनुवाद : रवींद्र गुर्जर

लेखांक : पाच

रात्र संपता संपेना. कार्लिटस फक्त झोपू शकला; तेही अधूनमधून. बाकीचे सगळेजण, हातापायांची बोटं दाबत आणि शरीर घासत रात्रभर जागे होते. काही तास गेल्यानंतर नवीन संकट उभं राहिलं. विमानात शिल्लक असलेल्या मोकळ्या जागेतील हवा कोंदट आणि अशुद्ध बनली. अपुऱ्या ऑक्सिजनमुळं काही मुलं गुदमरू लागली. दाराशी जाऊन रॉय हवेसाठी भोक पाडण्याचा प्रयत्न करू लागला; पण तिथं इतका बर्फ साठला—शिवाय घट्ट झाला—होता की नुसत्या हातानं काहीच करता येईना. त्यातून हात गोठलेले. मग विछान्यासाठी उपयोगात आणलेली एक सळई त्यानं छतात खुपसायला सुरुवात केली. चारपाचजण त्याला लायटरनं प्रकाश दाखवत होते. डोक्यावर एक फूट बर्फ साचलाय् का बारा फूट, याची एका-



चिलीच्या लोकांनी विमानाचा शोध थांबवलेला पाहून पालकांना खूप राग आला. त्यांना खात्री वाटत होती की आपली मुलं जिवंत असणारच. म्हणून दैवी उपायांकडे ते वळले. जिरार्ड नावाच्या, अंतर्दृष्टी असलेल्या गृहस्थानं विमानाचा ठावठिकाणा सांगितला. त्यानुसार शोध सुरू झाला; पण यश आलंच नाही. श्री. पेझ यांनी पायी तपास सुरू केला. आणखी दोन जण लवकरच त्यांना सामील झाले; पण व्यर्थ ! निराश होऊन तिघंही मॉन्टेव्हिडिओला परतले. इकडे विमानात अडकलेल्या मुलांचे हाल चालूच होते. त्यात भर म्हणून प्रचंड हिमवादळ सुरू झालं. बर्फाचे कडे आत कोसळून त्याखाली अनेक मुलं गाडली गेली. सुदैवानं रॉय जागा होता. तो, फिटो आणि एडच्युअर्डोनं मुलांच्या सुटकेसाठी अखंड परिश्रम घेतले. तरीही सत्ताविसातील आठजण ठार झालेच. दुर्दैव त्यांची पाठ सोडायला तयार नव्हतं. . . . . . . . . . .

लाही कल्पना नव्हती. श्वास रोखून सगळे नुसतं बघत बसले. अखेरीस पेरॅडोला फिकट चंद्रप्रकाश आणि एक-दोन तारे दिसू लागले. त्याबरोबर शुद्ध हवा विमानात खेळू लागली.

सकाळ लवकर व्हावी या आशेनं बिचारी मुलं त्या भोकातून बाहेर बघत बसली. सूर्योदय झाल्यावर आतल्या ओल्या अंधारानं, प्रकाशाला आत यायला हळूहळू वाट करून दिली. बर्फामुळं प्रकाश फाकू लागला. जेव्हा नीट दिसायला लागलं तेव्हा त्या कबरीतून बाहेर कसं पडायचं, यावर विचार सुरू झाला. वैमानिकाच्या केबिन-बाहेर बर्फ कमी साठला होता. दारातून तर बाहेर पडणं शक्यच नव्हतं. केबिनच्या खिडकीतून कॅनेसा, सॅबेला, इन्शार्ते, फिटो, रॉय आणि पेरॅडो या मुलांनी, क्रमाक्रमानं 'बोगदा' खणायला सुरुवात केली. उघड्या हातानं काम करणं अवघड जात होतं. दुसऱ्या बाजूच्या खिडकीबाहेर उजेड दिसत होता. विरळ बर्फातून प्रकाश गाळून आत येत होता. दोघा-तिघांनी खिडकीच्या काचेवर जोरजोरात धक्के मारल्यावर, अखेरीस काच फुटली. पुढचा बर्फ बाजूला लोटला गेला. दिवसाचा प्रकाश मुक्तपणे आत शिरला.

रॉयनं त्यातून डोकं बाहेर काढलं. सकाळचे आठ वाजले होते. त्या मानानं प्रकाश कमी होता. बर्फाचं आच्छादन अजूनही आकाशात होतं.–ढगच म्हणा ना ते. गरम टोपी आणि वॉटरप्रूफ जाकिट घालूनही बाहेरच्या वेगवान वाऱ्याबरोबर आत येणाऱ्या बर्फाचा त्याच्या चेहेऱ्यावर आणि हातावर मार बसत होता. त्या जागी चुरचुरत होतं.

पुन्हा मागं वळून आणि सहकाऱ्यांकडे बघून तो ओरडला, 'छे ! काहीच उपयोग नाही. बाहेर बर्फाचं प्रचंड वादळ चालू आहे.'

'निदान सगळ्या खिडक्या तरी उघडता येतायत का ते पाहा.' कोणी तरी बोललं.

खिडकीच्या वर घट्ट हात पकडून रॉयनं पाय बाहेर टेकले. विमानाची बाहेरची बाजू अजिबात दिसतच नव्हती; मग खिडक्या कुठून दिसणार ? घसरून खाली पडलं, तर बर्फात बुडून जाऊ या भीतीनं तो पुन्हा आत वळला.

दोन्ही वैमानिकांची प्रेतं अजूनही त्यांच्या जागांवरच पडली होती. बर्फाचं वादळ दिवसभर चालू राहिलं. तहान भागवण्यासाठी मुलांना साठलेल्या बर्फाचाच वापर करावा लागला.

३० ऑक्टोबर. आज न्यूमा तुर्केटीचा पंचविसावा वाढदिवस होता. मुलांनी त्याला आपल्या वाट्याच्या सिगारेट्स दिल्या. बर्फाचाच 'केक' बनवला. न्यूमा 'ओल्ड ख्रिश्चन' पैकी नव्हता; पण त्याची भारदस्त आकृती आणि शांत स्वभाव मुलांना फार आवडे. खरं तर आज त्याचंच अभिनंदन करायचं; पण उलट चेहेरे टाकलेल्या मुलांना त्यानंच धीर दिला. 'आपण जास्तीत जास्त वाईट काळात टिकाव धरला आहे. यापेक्षा अधिक वाईट ते काय होणार ! यापुढं परिस्थितीत फक्त सुधारणाच होणार.'

दिवसभर ते काहीच करू शकले नाहीत. वादळ शांत होण्याची लक्षणं नव्हती. बर्फ चघळण्याखेरीज दुसरा पर्याय नव्हता. आदल्या रात्रीच्या संकटाबद्दल सर्वजण बोलत राहिले. इन्शार्ते म्हणाला, 'आपले काही चांगले मित्र काल देवाघरी गेले. कारण देवाचं त्यांच्यावरच जास्त प्रेम होतं.' इतरांना त्यात काहीच तथ्य वाटलं नाही. पेरॅडो म्हणाला, 'हिमवर्षाव थांबला की मी लगेच इथून निघणार आहे. यापुढं आपण इथंच थांबून राहिलो, तर पुढच्या वादळात काही जिवंत राहत नाही.'

'मला नाही तसं वाटत.' फिटो ठामपणे म्हणाला, 'विमान सध्या आच्छादून गेलंय्. दुसरा वर्षाव झाला, तेव्हा वरच्यावर बर्फ अडकून पडलं. तूर्त आपण इथंच सुरक्षित राहू. तेच बाहेर पडून आपण जर चालायला लागलो तर सगळ्या बाजूंनी संकटाला तोंड द्यावं लागेल.'

सगळेजण त्याच्याकडे आदरानं पाहू लागले. तोच एकटा मुलगा सर्वांत शांत राहू शकला होता. बऱ्याच मुलांची अवस्था तर वेड लागल्यासारखी झाली होती.

''हवामान सुधारेपर्यंत इथंच थांबण्यास काय हरकत आहे ? सांगा ना !' फिटो स्ट्राउच म्हणाला.

'अरे, पण किती काळ ?' व्हिझिंटिननं चिडून विचारलं. तोही पेरॅडोच्याच मताचा होता.

'मला आठवतंय्.' अल्गोर्ता म्हणाला, 'एका टॅक्सीड्रायव्हरनं,

सँटियागोमधे, सांगितलं होतं की १५ नोव्हेंबरला हिमवर्षाव थांबून उन्हाळा सुरू होतो.'

'पंधरा नोव्हेंबर; म्हणजे आता काय फक्त दोन आठवड्यांचाच प्रश्न. तोपर्यंत थांबल्यामुळं आपल्या सुटकेची शक्यता उलट वाढेलच.' फिटो म्हणाला. त्यावर कोणीच काही बोललं नाही.

'शिवाय, त्या सुमारास पौर्णिमा येईल.' तो पुढे म्हणाला, 'म्हणजे रात्री, त्या प्रकाशात, टणक बर्फावरून आपल्याला चालत जाता येईल आणि दिवसा हवेत ऊब असताना आपण झोप काढू शकू.'

त्या दिवशी त्यांनी काहीच खाल्लं नाही. रात्र झाल्यावर कार्लिटसच्या प्रार्थनेत सर्वजण सहभागी झाले. दुसऱ्या दिवशी ३१ ऑक्टोबरला, त्याचा एकोणिसावा वाढदिवस होता. इतर कोणत्याही वाढदिवसापेक्षा, हवेत जरी सुधारणा झाली तरी त्याला सगळं काही मिळाल्यासारखं होतं. तथापि, सकाळी जेव्हा त्यानं 'बोगद्या'तून बाहेर डोकावून पाहिलं, तेव्हा वर्षाव तेवढाच जोरात चालू होता. परत येऊन त्यानं अंदाज वर्तवला, 'आणखी तीन दिवस हवा अशीच खराब राहील. पुढचे तीन दिवस मात्र उघडीप होईल. भरपूर ऊन पडेल.'

कडक थंडी आणि त्यात ओले कपडे; यामुळे त्यांच्या शक्तीचा ऱ्हास होत चालला होता. दोन दिवस काहीही न खाल्ल्यामुळं आता त्यांना प्रचंड भूक लागली. अपघातात ठार झालेल्यांची शरीरं बाहेर बर्फात होती म्हणून बर्फाच्या तडाख्यामुळं मेलेल्या मित्रांपैकी एकाचं प्रेत दोन मुलांनी सर्वांच्या समोर फाडलं. आतापर्यंत ते मांस भाजून किंवा उन्हात वाळवून खात असत. या खेपेला, दुसरा इलाजच नसल्यामुळं, कच्चं मांस तसंच खायला त्यांनी सुरुवात केली. भूक इतकी असह्य झाली होती की नेहमीपेक्षा मोठे तुकडे चावून चावून त्यांनी फस्त केले. दोन दिवसांपूर्वी त्यांच्या जिवंतपणे वावरणाऱ्या मित्रांचंच मांस खाणं ही भयानक गोष्ट होती. काही काही जणांच्या घशाखाली ते उतरेना. मळमळू लागलं.

कॅनेसा आणि फिटो या दोघांनी अशा मुलांना जामलं; एडचुअर्डोला तर त्यांनी बळंच खायला लावलं. 'तुला खाल्लंच पाहिजे. नाही तर तू मरशील आणि आम्हाला तू जिवंत राहायला हवा आहेस.' तरीही कोणत्याच युक्तिवादाला बळी न पडता एडचुअर्डो, इन्सार्ते आणि तुर्केटी या तिघांनी त्या मांसाला स्पर्श केला नाही. अर्थातच त्यांची प्रकृती पार खालावली.

एक नोव्हेंबरला पॅंकोचा वाढदिवस होता. कार्लिटसच्या भविष्याप्रमाणं हिमवृष्टी थांबली. त्यांच्यातले सहाजण, उन्हात बसून ऊब मिळण्यासाठी बाहेर पडून विमानाच्या छतावर जाऊन बसले. त्याच दिवशी कार्लिटसच्या वडिलांचा आणि बहिणीचाही नेमका वाढदिवस होता. तो धूम्रपान करत घराबद्दल विचार करू लागला. कॅनेसा-झेर्बिनो या जोडीनं खिडक्यांवरचा बर्फ बाजूला सारला. त्यामुळं विमानात भरपूर प्रकाश शिरला. दोघं-तिघंजण पाणी पिण्यासाठी बर्फ वितळवण्याच्या उद्योगाला लागले. बर्फाचे कडे कोसळूनही त्यातून आपण वचावलो याचा अर्थ, एक ना एक दिवस आईवडिलांपाशी आपण जाणारच; असा विश्वास पेड्रला वाटू लागला. पुन्हा आपलं जीवन पहिल्यासारखं सुरळीतपणे सुरू होणारच. त्या रौद्र निसर्गसान्निध्यात ईश्वर आपल्या जवळ आहे असं त्याला जाणवलं.

सूर्य ढगाआड गेल्यावर पुन्हा खूप थंडी वाजू लागली. मग छतावरचे सहाजण फेअरचाइल्डमध्ये शिरले. त्यांच्या हातात फक्त एकच गोष्ट होती : वाट बघणं.

□

## : २ :

पुढच्या दिवसांमधे हवा स्वच्छच राहिली. जोरदार हिमवर्षाव केव्हाच झाला नाही. थोडीफार शक्ती टिकून असलेल्या उत्साही मुलांनी मागच्या बाजूला, कडक बर्फातून, दुसरा बोगदा खणला. बर्फाच्या थरातून अदृश्य झालेल्या एक एक वस्तू मिळवायला सुरुवात केली.

बोगदा एकदा वाढवला की केबिनमधून बर्फ पूर्णपणे बाहेर टाकणं आणि त्याखाली पुरलेल्या प्रेतांची व्यवस्था करणं सोपं जाणार होतं; पण बर्फ खडकासारखा कठीण बनला होता. विमानाच्या मोडलेल्या पत्र्यापासून बनवलेली हत्यारं त्या कामी उपयुक्त होत नव्हती. स्वतःचा बचाव करण्याच्या अखेरच्या प्रयत्नात उंचावलेले मेलेल्या मित्रांचे हात आणि चेहेऱ्यावरचे भाव तसेच कायम होते. त्यांची शरीरंही हलवता येत नव्हती. पुढं जर पुन्हा वादळाला तोंड देण्याची पाळी आली तर त्या प्रेतांचा उपयोग मात्र होणार होता. कारण विमानाबाहेरचा 'साठा' बर्फामधे केव्हाच बुडून गेला होता. दोन बाजूंना उभ्या असलेल्या बर्फाच्या भिंतीच त्यांना संरक्षण देणार होत्या.

आठ दिवस तसेच गेले. कडा कोसळण्यापूर्वीचे दिवस आठवून बचावलेल्या लोकांना खूपच खेद झाला; 'त्या वेळी आपण वाईट परिस्थितीला दोष देत होतो; पण आताच्या तुलनेत तेव्हा आपण फारच सुखात आणि आरामात होतो असं म्हणावं लागेल!' या वेळी फायदा फक्त एकाच गोष्टीचा झाला होता. मेलेल्या आठ जणांचे कपडे त्यांच्या उपयोगी आले. आपण स्वतः काही प्रयत्न केले तरच ईश्वर पुढचो मदत करील; या भावनेमुळं त्या प्रतिकूल काळातही त्यांचा धीर टिकून राहिला. एवढंच नाही, तर सुटकेसाठी योजना ते तयार करू शकले.

त्या हिम-संकटापूर्वी त्यांनी असं ठरवलं होतं की त्यांच्यातल्या उत्तम प्रकृतीच्या मुलांनी चिलीकडे रवाना व्हायचं. त्यातही दुमत होतंच. मोठ्या संख्येनं गट बाहेर पडला, तरच टिकाव लागेल असं काहींना वाटत होतं, तर बाकीच्यांना, तीन-चारजणांच्या गटांवरच भर द्यावा असं वाटत होतं. अपघातानंतरचा एकूण अनुभव आणि वादळी हवामान विचारात घेता दुसऱ्या मताचाच विजय झाला. मोहिमेसाठी चार ते पाचजण निवडायचं ठरलं. अशा मुलांना मांसाचे मोठे तुकडे देऊन, कामात सूट द्यायची. झोपायलाही उत्तम जागा राखून ठेवायची. म्हणजे नोव्हेंबरअखेर बर्फ वितळू लागेल, तोपर्यंत ते सशक्त, सुदृढ बनतील आणि चिलीच्या भूमीपर्यंत त्यांना पायी जाता येईल.

शारीरिक पात्रता हा निवड करताना प्रमुख भाग होता. अपघाताचे वेळी जखमी न झालेल्या बऱ्याच मुलांची प्रकृती नंतर

ढासळली होती. झेबिनोचे डोळे अद्याप पर्वत चढण्याइतके सुधारले नव्हते. एडचुअर्डो बळकट असूनही, नरमांस खाण्यामुळं मानसिकदृष्ट्या खचला होता. इन्सार्तेच्या पायांत जोर राहिला नव्हता. एक-एकजण बाद करून शेवटी पेरॅडो, कॅनेसा, हार्ले, पेझ, तुर्कीटी, व्हिजिंटिन आणि फिटो या मुलांची निवड झाली. पेरॅडोची निवड केली नसती तर तो एकटाच निघून गेला असता इतकी त्याच्या मनाची तयारी झाली होती. तुर्कीटीला मागच्या दोन मोहिमांचा अनुभव होता. त्यात त्याची लायकी सिद्ध झाली होती. तो गेला तर मोहीम यशस्वी होईलच, असा तरुण मुलांना विश्वास वाटत होता.

कॅनेसा कल्पक होता. प्रसंगाला तोंड देऊन, त्यातून मार्ग काढण्याचा तल्लखपणा त्याच्यात होता. शिवाय शारीरिक बळही. फिटोची वास्तविक मनापासून जायची इच्छा नव्हती. कर्तव्यभावनेतून त्यानं मान्य केलं; पण पुढच्या आठ दिवसांत त्याचं रक्ताभिसरण बिघडल्यामुळं त्याला वगळण्यात आलं. पेझ, हार्ले आणि व्हिजिंटिन हे जरी सुदृढ असले तरी त्यांची मानसिक तयारी आणि परिपक्वता याविषयी शंका होती. म्हणून असं ठरलं की त्या तिघांनी एका दिवसाच्या 'चाचणी मोहिमे'वर जावं. आधीसुद्धा काहीजणांनी जवळपास जाऊन येण्याचा पराक्रम केलाच होता. फ्रँकॉइस आणि इन्सार्ते दर दहा पावलांवर थांबत, तीनशे यार्ड अंतर कापून आले होते. तुर्कीटीनं अल्गोर्तासह त्याच्याही पुढं मजल मारली होती; पण कच्च्या मांसामुळं तोही अशक्त बनला होता—त्याला ते मनापासून आवडत नव्हतं.

पेझ, हार्ले आणि व्हिजिंटिन सकाळी अकरा वाजता बाहेर पडले. त्यांना आता आपली 'लायकी' सिद्ध करायची होती. दरीतून खाली उतरून पलीकडच्या पर्वतापर्यंत मार्ग आक्रमायचा त्यांचा विचार होता. एक दिवसाच्या कार्यक्रमात हे नीट बसत होतं.

प्रत्येकानं दोन स्वेटर्स आणि दोन विजारी चढवल्या. बर्फाचा पृष्ठभाग गोठलेला असल्यामुळं वेडीवाकडी वळणं घेत खाली दरीत उतरताना अडचण येत नव्हती. चालताना त्रास होऊ नये म्हणून बरोबर त्यांनी काहीच घेतलं नाही. याप्रमाणे एक तास गेल्यानंतर त्यांना विमानाचं पिछाडीचं दार सापडलं. आसपास इतरही काही वस्तू पडल्या होत्या. दोन ॲल्युमिनियमची भांडी, कॉफीचा डबा—रिकामाच पण तळाशी थोडी पावडर शिल्लक होती. त्यांनी लगेच निथळ्याच भांड्यात बर्फ त्यातल्या त्यात वितळवून थंड 'नेस' कॉफी करून घेतली. बर्फावर बसून कॉफी पिताना, काही काळ तरी त्यांना परिस्थितीचा विसर पडला. मोठ्या खुपीत होते तिघंही. आणखी शोध घेतल्यावर एक गॅससिलिंडर, मोडका थर्मास आणि सटरफटर वस्तू सापडल्या.

पुन्हा दोन तास खाली उतरल्यानंतर त्यांच्या लक्षात आलं की, बर्फामध्ये अंतर फसवं असतं. निघताना पर्वतापर्यंतच्या अंतराबद्दल त्यांची जी कल्पना होती, ती चुकीची ठरली. तो अजून खूपच दूर होता. शिवाय सूर्य डोक्यावर आल्यामुळं पृष्ठभागही वितळू लागला होता. त्यामुळं त्यांना गुडघे टेकून राहावं लागलं. तीन वाजता तिघांनी परतायचा निर्णय घेतला. मागं वळल्यावर, पर्वत उतरण्यापेक्षा चढणं किती अवघड असतं, याचा अनुभव येऊ लागला. त्यात भर म्हणून आकाश ढगाळलं, बारीक बारीक हिमवृष्टी होऊ लागली. वाऱ्यामुळं भिरभिरत ते बर्फ अंगावर कोसळू लागलं.

कॉफी घेतली ते ठिकाण गाठल्यावर, त्यांनी पुन्हा कॉफी-मिश्रित पाणी बनवलं. तेवढीच हुषारी वाटली, विश्रांतीही झाली. उलटा प्रवास चांगलाच अवघड होऊ लागला होता. अजूनही पाय गुडघ्यापर्यंत बर्फामधे बुडत होते. चढ फारच होता. हिमवर्षावाचा जोर वाढू लागला. तिघंजण पार दमून गेले. रॉय आणि कार्लिटस या दोघांनी तर धसकाच घेतला. बर्फाच्छादित प्रदेशामधे अंतराचा काहीच अंदाज करता येत नव्हता. फेअरचाइल्ड जवळ आलं का अद्याप बरंच दूर आहे हे कळेना. चढउतार खूपच होते. एखादा मोठा चढ ओलांडला की आता विमान दिसेल, मग दिसेल, म्हणून बघावं तर त्याचा पत्ताच लागत नव्हता. त्यांच्यातला जोरच यामुळं संपला. रॉयला रडू फुटलं. कार्लिटसनं बर्फात बसकणच मारली. 'तुम्ही जा. मला नाही जमणार पुढं येणं,' तो म्हणाला, 'शक्यच नाही, खरंच तुम्ही जा. मला इथंच सोडा. मी या ठिकाणीच मरणार.'

'कार्लिटस, वेड्यासारखं करू नकोस. चल बघू.' अश्रू आवरत रॉय म्हणाला, 'कृपा कर बाबा. तुझ्या घरादाराचा विचार कर... तुझी आई...तुझे वडील...'

'पण मला एक पाऊलदेखील टाकता येणार नाही...'

'चल ऊठ बघू. मूर्ख कुठला,' व्हिजिंटिन त्रासिकपणे म्हणाला, 'इथंच थांबलं तर आपलं गोठून लाकूड होईल.'

'मी मूर्ख आहे, कबूल. भित्राही आहे, मान्य; पण तुम्ही चालायला लागा ना.'

तरीही कोणीच हललं नाही. त्याला नाना प्रकारे समजावलं.अगदी शिव्यांचा भडिमार ऐकल्यावर कसाबसा तो उभा राहिला. थोडं पुढं गेल्यावर एक उंचवटा लागला. अजूनही विमान टप्प्यात आलं नव्हतं.

'अजून किती अंतर असेल?' कार्लिटसनं विचारलं. 'किती दूर जायचंय?'

काही वेळानंतर पुन्हा तो खाली कोसळला.

'तुम्ही पुढं व्हा,' तो म्हणाला, 'एका मिनिटातच मी तुमच्या मागोमाग येतो.'

पण रॉय आणि व्हिजिंटिननं त्याला सोडलं नाही. त्याचा अपमान करून, चुचकारून पुन्हा त्याला उठायला लावलं. बर्फावरून चालणं अत्यंत त्रासदायक होत होतं.

सूर्यास्तानंतर कसेबसे ते विमानापर्यंत पोचले. आत बाकीची मुलं मोठ्या काळजीत पडली होती. तिघं जेव्हा बोगद्यातून आत शिरले तेव्हा त्यांच्यात थोडंदेखील त्राण उरलं नव्हतं. रॉय आणि पेझचं रडणं पाहून 'परीक्षा' अवघड आणि कडक होती, हे सर्वांच्या तात्काळ ध्यानात आलं. त्या तिघांना तरी अपयश आलं.

'छे, अगदीच अशक्य.' कार्लिटस म्हणाला, 'काही अर्थच नाही. मी तर आडवाच झालो. त्या क्षणी मला मरावसं वाटलं. एखाद्या मुलासारखा मी रडत होतो.'

रॉय थरथर कापत रडत होता. तो काहीच बोलला नाही.

व्हिजिंटिनचे अर्धवट मिटलेले लहानसर डोळे मात्र पूर्ण कोरडे होते. 'प्रवास कठीण नक्कीच होता.' तो म्हणाला, 'पण तो शक्य आहे.'

त्यामुळं चौथ्या खेपेलाही त्याची निवड झाली. कार्लिटसनं आपलं नाव मागं घेतलं. पेरेंडोनं रॉयलाही वगळलं. कारण त्यानं फारच रडारड केली होती. फिटो जात असल्यामुळं त्याला विशेष वाईट वाटलं. तो त्याचा लहानपणापासूनचा दोस्त होता. तो जवळ असला की त्याला सुरक्षित वाटे. ऐन वेळी फिटो आजारी पडल्यामुळं त्याचं जाणं रद्द झालं. तो आपल्याबरोबर मागं विमानात राहणार हे निश्चित झाल्यावर रॉयला अत्यंत आनंद झाला.

चौघांची निवड झाल्यावर त्यांना खास सवलती मिळू लागल्या. विजयी योद्धयाप्रमाणे त्यांची बडदास्त ठेवली जाऊ लागली. त्यांच्या शारीरिक आणि मानसिक उभारीसाठी आवश्यक त्या सर्व गोष्टींना परवानगी होती. इतरांपेक्षा त्यांना जास्त मांस मिळे, तेही हवे ते तुकडे निवडून. ते ठरवतील त्या जागी झोप. विमान स्वच्छ करणं किंवा पाणी बनवणं असल्या कामात त्यांना सूट होती. तरीही पेरेंडो आणि कॅनेसा हातभार लावतच. रात्री त्यांच्यासाठी प्रार्थना होऊ लागल्या. त्यामुळं चौघांच्या मनाचं सामर्थ्य दुप्पट झालं. सर्वांच्या बोलण्यात आशावादी सूरच फक्त ऐकू येई. नव्या गिर्यारोहकांचं मनोधैर्य खचेल, अशा पद्धतीनं उघडपणे बोलण्यास–नियम न करता–मनाई होती. 'चिली काय फार तर पर्वतापलीकडं एक-दोन मैलांवर असेल,' अशा स्वरूपाची चर्चा चाले.

चौघांनी या सुखकर परिस्थितीचा फायदा उठवणं स्वाभाविकच होतं. त्यामुळं काहीजणांना त्याचा राग येऊ लागला. गैरसमज वाढू लागले. 'सॅबेला'ला आपली दुसरी विजार कॅनेसाला देणं भाग पडलं. फ्रँकॉईसजवळ एकच पायमोज्यांचा जोड तर व्हिजिटिनला सहा मिळाले. एखाद्या भुकेल्या मुलानं मृत शरीरातला बऱ्यापैकी मांसल भाग काढून घेतला, तर कॅनेसा तो काढून घेऊन म्हणे, 'तुझ्यापेक्षा मलाच त्याची जास्त गरज आहे. माझी शक्ती वाढली नाही तर तुम्हाला कोणालाच इथून बाहेर पडता येणार नाही.' पेरेंडो आणि तुर्कोटीनं मात्र कधीच परिस्थितीचा फायदा उठवला नाही. दोघंही पूर्वीसारखंच काम करीत. तेही शांत, प्रेमळ आणि आशावादी राहून.

पूर्वीचे गट केव्हाच विस्कळित झाले होते. फक्त एकच टिकून होता. सर्वांत लहान मुलांच्या गटातील निकोलिश आणि स्टॉर्म वर निघून गेले होते. कॅनेसानं मास्पॉन्स गमावला, नोगायरानं प्लेटरो: जेव्हियरची तर पत्नीच सोडून गेली आणि सर्वांना एका चांगल्या नेत्याची–मार्सेलोची–अनुपस्थिती क्लेशकर ठरली होती.

फिटो, एड्युअर्डो आणि डॅनियलची मैत्री विशेषत्वानं प्रभाव पाडत होती. पर्वतावर अडकून पडल्यानंतर त्यांचं मनोधैर्य वाखाणण्यासारखं होतं. वळकट शरीरापेक्षाही त्याचीच खरी गरज होती. जिवंत सत्याची आणि वस्तुस्थितीची जाणीव इतरांपेक्षा त्यांना अधिक होती. सध्या भोगत असलेल्या रानटी जीवनामधे पँकोच्या प्रभावी वक्तृत्वाचा किंवा कोचच्या सभ्यपणाचा काडीइतका उपयोग नव्हता. विशेषतः फिटोनं जो आदर संपादन केला होता तो मोलाचा होता. संकटाच्या पहिल्या आठवड्यात त्यानं ठामपणानं घेतलेल्या 'दुःखद' निर्णयांमुळं कित्येकांचे प्राण वाचले होते; सर्वांना कटु सत्याची जाणीवही झाली होती. हिम-संकटाच्या वेळीही बर्फात बुडालेल्या मुलांना थंड डोक्यानं सोडवण्यात त्यानं फार मोलाची कामगिरी केली होती. इतर सगळे पार गोंधळून गेले होते. त्याची वस्तुनिष्ठा, स्थिर स्वभाव आणि अंतिम सुटकेबद्दलची अढळ श्रद्धा या गोष्टींमुळे रॉय–कार्लिटसनं सुचवलं की मार्सेलोच्या जागी त्यालाच नेता करावं; पण फिटोनं त्याला नकार दिला. अर्थातच मुद्दाम तो शिक्कामोर्तब करण्याचं प्रयोजनही नव्हतंच म्हणा.

सगळ्या कामात मांस कापणं फार अवघड आणि नकोसं वाटायचं. ते काम पेरेंडो किंवा व्हिजिटिनसुद्धा करू धजत नसत; पण फिटो, एड्युअर्डो आणि डॅनियल हे त्रिकूट शांतपणे ते करी. थंड हवामानामुळं प्रेतं जशीच्या तशी टिकून होती, हे त्यातल्या त्यात बरं! तिघांना झेर्बिनो मदत करायचा. आधी ते मोठे तुकडे कापत आणि दुसरा गट त्यांची रेझरनं छोट्या तुकड्यात विभागणी करी. हे पुढचं काम त्या मानानं सोपं होतं. कारण निदान दृष्टीसमोर तरी मित्रांची मृत शरीरं येत नसत.

मांसाचं वाटप काटेकोरपणे होत असे. त्यातही शिस्त ठेवलेली होती. दुपारी प्रत्येकाला साधारण दोनशे ग्रॅमचा तुकडा देण्यात येई. जास्त काम करणाऱ्यांना मात्र त्यांची शक्ती टिकून राहावी म्हणून अधिक वाटा देण्यात येई. मोहिमेवर जाणारांना तर लागेल तितकं मिळे. एक प्रेत पूर्णपणे संपल्यावरच दुसऱ्याकडे वळण्यात येई.

गरजेमुळं शरीराचा कोणताही भाग वाया जाऊ देत नसत. लिव्हरमधे व्हिटॅमिन्स भरपूर असतात म्हणून कॅनेसा त्याचा फडशा पाडी आणि इतरांनाही आग्रह करी. नरमांस खाण्याविषयीची शिसारी जसजशी दूर होत गेली तसे लिव्हर, हृदय, आतडी आणि मूत्राशय हे अवयव क्रमाक्रमानं उपयोगात आणणं सोपं जाऊ लागलं. उन्हात सुकवून त्यावर सुरकुत्या पडल्या की सर्वजण ते मांसाचे तुकडे खात. आधीच्या सांगाड्यात काही शिल्लक मांस मिळालं तर ते कोणालाही घ्यायला परवानगी होती. रेशनमुळं मुलं बिचारी सदैव भुकेलीच असत. मोहिमेतले चौघंजण फक्त पोटभर खात असत. अर्थात रेशनचं महत्त्व सर्वांना पटलेलं होतं. काम झाल्यावर प्रेताचं डोकं, त्वचा, फुप्फुसं आणि जननेंद्रिय–हे भाग बाजूला फेकण्यात येत.

मांस कापताना गुपचुप एखादा तुकडा मुलं तोंडात टाकतही. जोंवर त्यांचं प्रमाण मर्यादित होतं तोवर इतरजण गप्प बसत; पण पेझ जेव्हा तीन तुकडे कापण्यामागं एक उडवायला लागला, तेव्हा मात्र मुलांनी ओरडा-ओरड केली. अशा काही गोष्टी स्वाभाविक होत्या.

पण जे काम करू शकत नसत, त्यांच्यावर अन्याय होऊ लागला. इचॅव्हेरन आणि नोगायरा या दोघांच्या जखमा आणि सूज अजूनही कायम होती. बिछान्यावरून खाली उतरणंही त्यांना कठीण जाई, तर मांस कापण्याचा प्रश्न तर दूरच. डेलगॅडो आणि इन्सार्तेचे पाय मोडले होते. जेव्हियर मिथॉल यांचं उंचीवरील दुखणं अजून कायम होतं. फ्रँकॉइस आणि रॉय हे सुद्धा पंगू झाल्यासारखे होते; शारीरिक नव्हे तर मानसिक दृष्ट्या. अपघात, हिमसंकट आणि मागाहून दोन मोहिमांतलं अपयश : या धक्क्यांमधून अजूनही ते सावरले नव्हते. दोघंही उन्हात नुसते बसून राहत.

काम न करता स्वस्थ बसून राहिल्यामुळं या मंडळींबद्दल इतरांना फारशी दया येत नसे. व्हिजिटिन तर म्हणायचा, 'ते कामाला लागत नाहीत, तोपर्यंत एक तुकडासुद्धा त्यांना दाखवू नका.' इतरांना त्यांचे

साथी जिवंत राहावेत असं वाटे; पण त्यांच्यासाठी खास काही करायच्या भानगडीत ते पडत नसत. कामापासून सुटका मिळावी म्हणून ते नाटक करतात, असं काही जणांना वाटलं तरी त्यात काहीच आश्चर्य नव्हतं. काल्पनिक वेदनांनी मुलं विव्हळतात किंवा भ्रम झाल्याप्रमाणे खोटे हावभाव करतात असं काहीजण म्हणत. नुसत्या अशक्तपणाचं तर विलकुल कौतुक नव्हतं. त्यामुळं त्या दुर्दैवी मुलांना बसल्या जागी वाटचाला येणाऱ्या मांसाव्यतिरिक्त कणभरही अधिक मिळत नसे. शेवटी त्यांच्या अंगातल्याच पेशी अपुऱ्या अन्नाची तूट भरून काढत. ती मुलं वाळू लागली.

काही मुलांना कच्चं मास खाणं अजूनही जड जात होतं. त्याचा लालसर रंग पाहून रॉय, इन्शार्ते आणि तुर्केटी यांच्या अंगावर शहारे येत. जेव्हा मांस शिजवलं जाई, त्या वेळी त्यांना खाण्याचं खरंखुरं समाधान मिळे. रोज सकाळी इन्शार्ते पेझकडे पाहून आशेनं विचारायचा, 'आज तरी आपण शिजवायचं का ?' पेझ त्या विभागाचा मुख्य होता. तो मग म्हणे, 'काही सांगता येत नाही. वाऱ्यावर सगळं अवलंबून आहे.' हवा चांगली असली तरच विस्तव पेटवता येई.

पण हवेखेरीज इतरही कारणं होतीच. लाकडाचा साठा अत्यंत अपुरा होता; कोका–कोलाची खोकी केव्हाच संपली होती. विमानाच्या भिंतीसाठी वापरलेली काही कमी जाडीची फळकुटं शिल्लक होती. कॅनेसाच्या मते मांस भाजल्यावर त्यातली प्रोटीन्स् मरतात. फर्नांडेझची तक्रार होती की भाजताना ते सुरकुतल्यामुळं आकार कमी होतो, खायला कमी मिळतं. म्हणून आठवड्यातून एक–दोन वेळा हवेचा रागरंग पाहून शिजवण्याचा कार्यक्रम होई. अशा वेळी असंतुष्ट मंडळींना नेहमीपेक्षा जास्त खायला मिळे. इतरजण तेवढं औदार्य दाखवत.

## : ३ :

चौघांची निवड झाल्यावर, सर्वजण १५ नोव्हेंबरची वाट बघत राहिले. थंडी कमी झाल्यावर हालचाल सुरू करायची होती. त्या दहा दिवसांत वैयक्तिकरीत्या आणि सांघिक दृष्ट्याही खूपच सुधारणा झाल्या.

उदाहरणार्थ, पेरॅडो हा आधी भित्रा, लाजरा आणि भावी प्लेबॉय होता. त्याचा कायापालट झाला. आता तो 'हीरो' बनला. त्यानं धैर्य, ताकद आणि निःस्वार्थी वृत्तीच्या जोरावर सर्वांची मनं जिंकली. पर्वत आणि थंडीवर मात करून पुन्हा आपल्या जगात परत जायचा त्यानं निश्चयच केला होता. यामुळंच त्याच्याहून लहान, अशक्त आणि निश्चय डळमळीत असलेल्या मुलांची त्याच्यावर श्रद्धा बसली. मुलांना तो सांत्वना देई. मोहिमेत सहभागी होणार असल्यामुळं त्याला कामात सूट होती. तरीही तो इतरांच्या बरोबरीनं काम करी. एका रात्री त्यांनी उभारलेली, कृत्रिम भिंत वादळामुळं पडल्यानंतर तो कडाक्याच्या थंडीत विमानातून खाली उतरला आणि पुन्हा ती उभी केली. तो जेव्हा जागेवर येऊन पडला तेव्हा पार गोठून गेला होता. त्याचा रक्तप्रवाह चालू ठेवण्यासाठी शेजारच्या मुलांना खूप चोळावं लागलं. तरी अर्ध्या तासानंतर परत भिंत कोसळली तेव्हा हा आपला पुन्हा उठलाच.

दोन गोष्टींत तो फक्त कमी पडला. बाहेर पडायच्या निश्चयामुळं, पुरेशी तयारी न करता तो काही दिवसांपूर्वी एकटाच जायला निघाला होता. सर्वांना तो धीर देई; पण परिस्थितीबाबत मात्र फार उतावीळ झाला होता. फिटोजवळ जी निर्णयशक्ती होती, ती याच्याकडे नव्हती. तो म्हणाला त्या वेळी जाऊ दिलं असतं, तर काही तो बचावला नसता.

त्याच्या साध्या–सरळ प्रेमळ, आशावादी आणि प्रसन्न व्यक्तिमत्त्वामुळं मुलांचं दुःख दूर होई. रात्री तो आपल्या शेजारी निजावा म्हणून सगळी मुलं धडपड करीत. पेरॅडोखालोखाल न्यूमा तुर्केटी मुलांना आवडे. तो लहानसर पण बांधेसूद होता. आधीच्या मोहिमेत त्याला बराच अशक्तपणा आला होता; पण पेरॅडो आणि तुर्केटी यांनी नेतृत्व केलं तर मोहीम नक्कीच यशस्वी होईल. असा मुलांना विश्वास वाटे.

इतर दोघांनी मात्र इतकं प्रेम संपादन केलं नव्हतं. कॅनेसा तल्लख होता. त्याच्या कल्पना चांगल्या असायच्या. ब्लँकेट आणि विछाने त्यानंच तयार केले. शिवाय त्याची वैद्यकीय माहिती आणि नरमांस खाण्याबाबतचं समर्थन; पण तो फार धसमुसळा होता. स्वतःवर त्याचा ताबा नव्हता.

त्याचा स्वभाव होताच तसा विचित्र. क्षुल्लक कारणावरून तो भडकत असे. अत्यंत वरच्या पट्टीत आरडाओरडी करी. क्वचित प्रसंगी शौर्य आणि औदार्यही दाखवी. त्याचं मन कठोर होतं. शरीर कमावलेलं. रग्बी खेळात ते ठीक होतं; पण इथं विमानात मित्रांनाच त्रास सोसावा लागे. त्याच्या मनात येई तेव्हा रात्री सर्वांना तुडवतही जायला कमी करायचा नाही. त्याला रोखण्याचं सामर्थ्य कोणातच नव्हतं. फक्त पेरॅडोचा त्याच्यावर थोडा प्रभाव होता. मोहिमेतला एक घटक म्हणून फिटो त्याला कधीच दुखवत नसे.

व्हिजिटिन कॅनेसाप्रमाणं त्रासदायक नव्हता; पण त्याच्यात खास गुणांचा अभावच होता. तो स्वयंकेंद्रित होता. त्याच्यात धैर्य होतं; पण अलीकडे त्याची वागणूक बिघडली होती. काही काही वेळा लहान मुलासारखा असमंजसपणा तो दाखवी. प्रत्येकाशी भांडत बसे. विशेष करून इन्शार्ते आणि अल्गोर्ताबरोबर स्वतःसाठी पाणी वितळवणे आणि लहर लागेल तेव्हा आवडीची किरकोळ कामं करणं यापलीकडे त्याचा उपयोग नव्हता. सीटकव्हरपासून त्यानं चौघांसाठी हातमोजे तयार केले होते. शिवाय कित्येक गॉगल्स–उन्हापासून बचाव करण्यासाठी. रात्री आईच्या नावानं तो टाहो फोडत बसे. फक्त कॅनेसा त्याच्यावर नियंत्रण ठेवू शके. तो, कॅनेसा आणि मँगिनो असा एक गट तयार झाला होता. ते एकमेकांना सांभाळून घेत.

बॉबी फ्रँकॉइसही कामाला हात लावत नसे. अपघात झाल्यापासून तो स्वस्थ बसून होता. जगण्याची आशा त्यानं सोडून दिली होती. इतरांनी काहीही हालचाल केली नसती तर तो नक्कीच मेला असता. त्याच्यावर सक्ती केली, तरच तो पाणी बनवायचा. इतर वेळी गोठलेले पाय घासत उन्हामधे नुसता बसायचा. रात्री अंगावरचं पांघरूण बाजूला गेलं तर उठून पुन्हा ते अंगावर घेण्याइतकं त्राणही त्याच्यात शिल्लक नव्हतं. दुसऱ्या कोणाला तरी मग ते घालावं लागे. आळस पक्का मुरला होता त्याच्या अंगात. 'काम केलं नाही तर खायला मिळणार नाही' या धमकीचाही उपयोग झाला नाही. त्यानं

फक्त खांदे उडवले आणि ' जशी आपली मर्जी ' असा चेहेऱ्यावर भाव दाखवला. दुपारी खाण्यासाठी ओळीतही उभा राहिला नाही. शेवटी मुलांनाच पडतं घेऊन त्याला तुकडा द्यावा लागला. अशी त्याची एकूण तऱ्हा.

एड्युअर्डो हाही पेरॅडोसारखाच कनवाळू होता. लहान आणि अशक्त मुलांवर तो खूप प्रेम करी. माँको जखमी झाला नसला तरी खूपच अशक्त बनला होता. इच्छा असूनही त्याला जास्त काम जमत नसे. म्हणून उन्हात बसून तो पाण्याच्या गटात हातभार लावी. जेव्हियर त्यांच्यातच जमा होता. त्याच्या दुखण्याला उतार नव्हता. तो बोलायचा खूप प्रयत्न करी; पण वाक्य पूर्णपणे ऐकूच यायचं नाही, इतका जोर त्यात नसे. त्याच्यापेक्षा दहा वर्षांनी लहान असलेली मुलं मग टिंगल करत. तोही स्वतःवर विनोद करून मुलांची करमणूक करायचा. तेवढंच वातावरण हलकं राहायचं.

त्याचं खास वैशिष्ट्य होतं चरबीपासून तेल काढून जमा करायचं. त्याचा सौम्य रेचक म्हणून उपयोग व्हायचा. शिवाय चाकूंना धार लावण्यात तो पटाईत होता. दगडावर किंवा इतर चाकूंवर हे काम चाले. वैमानिकाच्या केबिनमधून मिळालेल्या प्लॅस्टिकपासून त्यानं आधी कॅनेसाकरता आणि मग स्वतःसाठी गॉगल्स तयार केले. त्यानं स्वतःच्या चष्म्याला एकच ' भिंग ' लावलं, तेव्हा प्रथमच मुलांना कळलं की त्याला फक्त एकाच डोळ्यानं दिसू शकतं.

मुलं दुःखी झाली की तो सगळ्यांना धीर देई. कोच इन्शार्तेही जोडीला ते काम जबाबदारीनं पार पाडी. पेरॅडो आणि तुर्केटी या दोघांमधे ज्या गोष्टीची कमतरता होती, ती उणीव इन्शार्ते भरून काढी. कच्च्या मांसाबद्दल त्याला फारसं प्रेम नसल्यामुळं, कमी मिळालं तरी चाले. मॉन्टेव्हिडिओमधल्या आयुष्याबद्दल विचार करत, तो दंग राही. पायाच्या दुखापतीमुळं त्याला काम करता येत नसे; पण मुलं त्याच्यावर रागवत नसत. तो सरळ आणि प्रामाणिक होता. हळुवार, दयाळू आणि हुषारही. त्याचे बोलके, भावस्पर्शी डोळे पाहून मुलं प्रभावित होत.

पँको कामाला पुरेसा हातभार लावत असे, तरीही त्याला मुलांचा आदर संपादन करता आला नाही. फिटो त्याचा खास दोस्त असूनही आपल्या बुद्धीच्या जोरावर त्यानं आतापर्यंतच्या आयुष्यात बरंच काही संपादन केलं होतं; पण एकूण तो दुसऱ्या फळीचा वीर होता. खरं म्हणजे सगळ्यात तो मोठा होता. त्यानंच सर्वांना हसतमुखानं धीर द्यायला हवा; पण ते काम त्याला नीट जमत नसे. म्हणूनच त्याची पायाची तक्रार मुलांना खोटी वाटायची, काम टाळायची सबब ते समजत. कुठल्याही एका बाबतीत—काम किंवा सांत्वन करणं—जी मुलं कमी पडत, त्यांची अशीच उपेक्षा होई. अनेक गोष्टीवरचा राग त्यांच्यावर काढला जाई, त्यांनाच जबाबदार धरलं जाई. ही परिस्थिती खरं तर वाईट होती. डेलगॅडो तशी ' शिकार ' बनला होता. आपण कमी पडतो हे ओळखून, त्यानुसार वागायचं सोडून तो ताठ्यात राही. एकोणीस जणात तो एकटा पडल्यासारखा झाला. स्वतंत्र अस्तित्व नाही की मित्रांचा पाठिंबा नाही. भूक आणि अशक्तपणा जोडीला त्रास द्यायला. त्याची केविलवाणी अवस्था झाली.

छोट्या मोहिमेनंतर रॉय आणि पेझ यांची प्रवृत्तीही बदलली. रॉय मनातून खचला. मोहिमेतून बाद केल्यामुळं त्याची मानसिक अवस्था विचित्र झाली. मित्रांनी आपल्याला निरुपयोगी ठरवलं, ही जाणीव त्याला टोचत राहिली. तो कमकुवत बनला. त्याला उद्देशून कोणी खोचून बोललं, तर एकदम रडायलाच लागायचा किंवा लहान मुलासारखं मोठमोठ्या आवाजात समर्थन करायचा. तो पक्का आळशी आणि स्वार्थी बनला. खूप शिव्या दिल्या किंवा शपथा घातल्या तरच मामुली काम तो करीत असे.

याउलट, कार्लिटस जास्त जबाबदारीनं वागू लागला. आपल्याला पुन्हा मोहिमेवर जाता येणार नाही हे लक्षात घेऊन, भरपूर काम करू लागला. मांस तर रोज कापत असायचाच, पण रात्री दरवाजाची ' भिंत 'ही उभी करायचा; पण त्याच्यात काही दुर्गुणही होते. ' साहेब 'गिरी करण्यात तो तयार होता. भांडकुदळपणाही खूप. मुलांची तो करमणूक करायचा, त्यामुळं त्याचे दोष झाकले जात. मुलांना त्याचं अस्तित्व सुखकर वाटायचं.

कॅनेसाप्रमाणे झेबिनोदेखील थोडासा तापट होता. मोठ्या मुलांवर वचक ठेवणं आणि लहान मुलांना सांभाळून घेण्याचं काम तो चांगलं करी. तो होता एकोणीसच वर्षांचा. फर्नांडिझवर त्याचा विशेष जीव होता. त्याच्या मदतीनं झेबिनो मेलेल्या मुलांचे पैसे आणि इतर कागदपत्र सांभाळून होता. रात्री झोपेत चालायची सवय कोणाला आहे, यावर तो लक्ष ठेवून असे; पण मुळात स्वभाव चांगला असल्यामुळं, बाकीची मुलं त्याची थट्टामस्करीही करीत. संध्याकाळ होऊन गेल्यानंतर किंवा पहाट झाल्यावर चंद्र आणि सूर्य यांच्यातला फरक त्याला कळत नसे. हा एक रोजच्या विनोदाचा भाग झाला. तो निराशावादी होता. ' हवा कशी आहे ते बघून ये ' असं फिटोनं त्याला सांगितलं की एका मिनिटाच्या आत परत येऊन तो म्हणायचा, ' प्रचंड थंडी आहे आणि लवकरच हिमवादळ होणार अशी चिन्हं आहेत. '

तेच कार्लिटसला पुन्हा पाठवलं की तो परत आल्यावर सांगायचा, ' थोडा हिमवर्षाव होतोय्, पण तो काही फार वेळ टिकणारा नाही. अर्ध्या तासाच्या आत निळं आकाश स्वच्छ दिसायला लागेल. '

पेद्रो अल्गोर्ता हा सुद्धा एक वेगळाच प्राणी होता. बऱ्याचशा मुलांना तो आधी ओळखत नव्हता. अर्थात दुसऱ्या शाळेत शिक्षण झाल्यामुळं. त्याच्या दोन मित्रांपैकी एकजण अपघातात ठार झाला आणि दुसरा ' नोगायरा ' पंगू होऊन पडला होता. काहीसा लाजरा, मितभाषी आणि समाजवादी विचारांचा तो असल्यामुळं इतरांपासून वेगळा पडला होता. बाकीची मुलं जुन्या विचारांची होती. नवं काही चटकन स्वीकारायला त्यांची तयारी नसे. पेद्रो भ्रम झाल्यासारखा वागे. अपघातापूर्वीचे दिवस त्याला नीट आठवत नव्हते. काही काळ त्याचं शिक्षण अर्जेंटिनामधील ' ब्यूनोस आयर्स ' इथं झालं होतं. एकदा गंमत म्हणून इन्शार्ते त्याला म्हणाला की रग्बीमधे अर्जेंटिनाला अजिंक्यपद मिळालं; तेव्हा हा आनंदानं नाचला आणि विमानाभोवती तशीच चक्कर मारली. मुख्य म्हणजे आपण चिलीला कशासाठी निघालो होतो, तीच गोष्ट तो विसरून गेला होता. एका मुलीला लग्नाची मागणी घालायला तो चालला होता. ती त्याची जुनी मैत्रीण होती; पण आता तो तिला पार विसरूनच गेला होता. माँटेव्हिडिओत परतल्यावर ' गर्लफ्रेंड ' शोधली पाहिजे, असं त्याच्या

बोलण्यात येत होतं. ही मात्र गंभीर बाब होती.

जगण्यासाठी धडपड केलीच पाहिजे, ही जागरूकता त्याच्या ठिकाणी होती, एवढं तरी बरं! कामात पुढं असल्यामुळं फिटो त्याच्यावर खूष होता. काही काही वेळा त्याला एकटं पडल्यासारखं वाटे; पण अगदी क्वचित.

या छोट्या जगात फिटो, एड्युअर्डो आणि डॅनियल या तिघांचं काळजीवाहू सरकार राज्यावर होतं. इतरांपेक्षा ही मुलं फार वेगळी होती असं नाही; पण त्यांनी जे धैर्य निर्माण केलं आणि योग्य निर्णयांमुळं परिस्थिती सुसह्य केली त्यामुळं आपोआपच त्यांचं सुखद वर्चस्व स्थापन झालं.

मिथॉलच्या खालोखाल डॅनियल वयानं मोठा होता. त्याच्यावरील जबाबदारीची जाणीव तो कधीच विसरला नाही. सव्विसाव्या वर्षी त्याला आलेली परिपक्वता कौतुकास्पद होती. कामाला तर तो वाघ होता. केबिन स्वच्छ ठेवणं, कागदपत्रांची सुरक्षा, चाकू आणि लायटर-वाटप, जखमींची सेवा वगैरे. गप्पागोष्टीत तो मुलांना गुंतवून ठेवी. स्वभावानं अगदी शांत. शारीरिक आणि हुकुमी व्यक्तिमत्त्व या दोन गोष्टींचीच काय ती उणीव त्याच्यात होती.

एड्युअर्डो फिटो स्ट्राउचपेक्षा लहानसर होता. दोघंही चुलत भाऊ. आकर्षक व्यक्तिमत्त्व आणि सुसह्य वागणूक. पूर्वी खूप प्रवास केल्यामुळं उमदा आणि मोकळा स्वभाव. एकोणीस जगांत एड्युअर्डोचं वेगळंपण लक्षात येई. सर्वसाधारण शांत, पण आवश्यकतेनुसार रागवायलाही कमी करायचा नाही. त्रास देणाऱ्या मुलांना तो सांभाळून घेई.

फिटोला संताप लवकर येई; पण सर्व मुलांना त्यानं विश्वास दिला हेच त्याचं महत्त्वाचं काम. आशावादी, खंबीर विचारसरणी आणि ठाम निर्णय यामुळं त्यानं आदर संपादन केला. गॉगल्सची निर्मिती ही आणखी त्याची जमेची बाजू. बर्फावरून परावर्तित होणाऱ्या उन्हापासून बचाव होणं फारच जरुरीचं होतं. पायलटच्या केबिनमधे मिळालेल्या रंगीत प्लॅस्टिकचे गोल गोल तुकडे पाडून, ते त्यानं उपयोगात आणले.

फिटोमधेही काही दोष होतेच. तो मॅंगिनोवर नेहमीच भडके. रात्री झोपताना एड्युअर्डोबरोबर त्याचं भांडण हे ठरलेलं. एकदा निष्काळजीपणामुळं अल्गोर्टाचा पाय फिटोच्या अंगावर पडला. तेव्हा तो वसकन ओरडला, 'मला मारायचा तुझा बेत आहे, दुसरं काही नाही!'

अल्गोर्टानं हळूच डोळे उघडले. म्हणाला, 'ओह, फिटो; तूही असं म्हणावंस?' आणि पाठ वळवून पुन्हा झोपेच्या आधीन झाला.

[ क्रमशः ]

# चंपावतची नरभक्षक वाघीण : पृष्ठ १९ वरून

केले व जमलेल्या लोकांना वाटले. याचा उपयोग लॉकेटमध्ये करतात. जंगलातील मुलांनी अशी लॉकेटस् घातली की वाघ किंवा इतर रानटी जनावरांपासून भीती रहात नाही. अंगात अमाप धैर्य येते अशी समजूत आहे. मुलीची बोटे वाघिणीने गिळली ती जशीच्या तशी मिळाली. ती तहसीलदाराने माझ्याकडे पाठविली. मी मोठ्या श्रद्धेने ती नंदादेवीच्या देवळाजवळील नैनिताल सरोवरामध्ये विसर्जित केली.

रात्रीच्या वेळी लोकांच्या आरडाओरड्याला ऊत आला होता. चार वर्षांनंतर गावातील रस्ते त्यांच्यासाठी मोकळे झाले होते. ती माणसे गेल्यावर तहसीलदाराबरोबर मी शेवटची सिगरेट ओढली. त्याला मी सांगितले की आता मला जास्त वेळ थांबता येणार नाही. दुसऱ्या दिवशीच मी जाणार.

सूर्य उगवल्याबरोबर मी बरोबरच्या माणसांना मागे टाकले. घोड्यावर वाघिणीचे कातडे बांधून मी मुद्दामच पुढे दाबेधुण्याला आलो. कारण ते कातडे धुण्यासाठी मला काही तासांचा अवधी हवा होता. ती रात्र मी तेथेच काढणार होतो. पालीजवळील त्या टेकडीशेजारील झोपडीवरून मी जात असता मला त्या मुक्ताबाईची आठवण झाली. तिच्या बहिणीच्या मृत्यूचा सूड घेतला गेला हे तिला कळले तर बरे होईल या हेतूने घोडा चरावयास तेथेच सोडला, कातडे घेतले. टेकडी चढून झोपडीत गेलो व वाघिणीच्या तोंडाचा आधार देऊन ते दरवाजात अंथरले. झोपडीतील मुले मोठाले डोळे करून ही गंमत बघत होती. त्यांच्याशी होत असलेले माझे बोलणे ऐकून त्यांची आई आत स्वैपाक करीत होती ती बाहेर आली.

मानसिक धक्क्यास प्रतिधक्का देण्याने काही होते की नाही याबाबत मला काहीच माहीत नाही. मला एवढेच माहीत आहे की, ही बाई गेले वर्षभर मुकी होती व चार दिवसांपूर्वी मी येथे आलो तर माझ्या प्रश्नाला उत्तरे देण्याचा प्रयत्न देखील तिने केला नव्हता. तीच बाई कातडे पाहिल्याबरोबर आता झोपडीच्या अवतीभोवती, रस्त्यापर्यंत सैरावैरा धावत होती. नवऱ्याला व इतरांना साहेबाने काय आणले आहे हे बघण्यास बोलवीत होती. आपल्या आईला वाचा फुटली यावर तिच्या चिमुरड्यांचा विश्वास बसत नव्हता. ती मुले आईकडे अगदी एकटक बघत होती. क्षणभरदेखील त्यांची नजर दुसरीकडे वळत नव्हती.

चहा होत होता तोपर्यंत गावात मी विश्रांती घेतली. लोकांनी घोळका केला. वाघिणीला कसे ठोकले हे त्यांना मी सांगितले. एक तासानंतर परत मी माझ्या प्रवासाला निघालो. जवळजवळ अर्धा मैलापर्यंत गावकऱ्यांनी केलेला माझ्या नावाचा जयजयकार कानी पडत होता.

समाप्त

# इस्लामची सारतत्त्वे

पृष्ठ १२ वरून

इस्लामिक संस्कृति अर्थातच इस्लामिक धर्मापासून वेगळी राहूच शकत नाही हे एक निर्विवाद सत्य आहे आणि हे असं लिहीत असताना, मनात थोडीही संकुचितपणाची भावना नाही हेही स्पष्ट केलं पाहिजे. इस्लामिक धर्मसंस्था ही एक शाश्वत, सर्वसमावेशक संस्था आहे. मनुष्यजातीचं एकूण सर्वांगीण हीत हे तिचं ध्येय आहे. पवित्र कुराणाची शिकवण मानवी जीवनाच्या सर्व अंगांना स्पर्शून जाते– धार्मिक, आध्यात्मिक, भौतिक, सामाजिक वगैरे वगैरे. इस्लामिक धर्माच्या ह्या सर्वव्यापकतेमुळे, संकुचितपणाचा प्रश्नच उद्भवत नाही. त्याच्याच आधारावर उभ्या असलेल्या इस्लामिक संस्कृतीचंही साहजिक हेच वैशिष्टच आहे. ह्या वैशिष्टचामुळेच, भौगोलिक मर्यादा ओलांडून, इस्लामिक धर्म जगभर पसरला आहे. इस्लामिक धर्म म्हणूनच एक जागतिक धर्म आहे. इस्लामिक संस्कृतीही अर्थातच जागतिक संस्कृति आहे !!

'इस्लाम' हा अरेबिक भाषेतनं घेतलेला शब्द आहे. 'इस्लाम'चा शब्दशः अर्थ 'शांतता' आणि अल्लाहपाशी लीनता असा आहे. अल्लाहच्या आज्ञांचं पालन त्यात अंतर्भूत आहे. अल्लाहच्या आज्ञांचं पालन करून व त्याच्यापाशी लीन होऊन जीवन "कुराणा" प्रमाणे जगताना, असीम मानसिक शांति मिळू शकते. 'माणूस' पूर्णत्वास पोहोचू शकतो. ह्या मानसिक (किंवा आध्यात्मिक म्हणू या !) समाधानातूनच सामाजिक समतेची, सामाजिक शांततेची वाट मोकळी होते. इस्लाम हा त्यामुळे खरोखरच एक शांतता-धर्म आहे. मानवी जीवनाला त्यामुळे एक सखोल अर्थ प्राप्त झाला आहे. दैनंदिन आचार-विचारांसाठी ठोस मार्गदर्शन त्यामुळेच कुराणातून, 'इस्लाम' मधून मिळतं.

प्रेषित महंमद पैगंबर हे अल्लाहचे सर्वात अखेरचे दूत. त्यांच्या पूर्वी अल्लाहनी अनेक प्रतिनिधी भूतलावर पाठवले. अब्राहम, मोझेस, येशू वगैरे. ह्यांही सर्वांना खरा मुस्लिम मानतोच. किंबहुना अल्लाहनी पाठवलेल्या प्रत्येक प्रतिनिधीला, त्यांच्या कृतींना, त्यांच्या लिखाणांना मुसलमान मानतो; परंतु त्याचबरोबर हेही निश्चित की, महंमद पैगंबर हे अल्लाहनी पाठवलेले अखेरचे प्रतिनिधी आहेत. त्यांच्याबरोबर पाठवलेल्या (मुस्लिम समाज तरी निदान तसं मानतो !) कुराणात अल्लाहनी, धर्म परिपूर्णावस्थेला नेलेला आहे. भूतलावरचं मानवी जीवन सुखकर व्हावं म्हणून अब्राहम, येशू आदी प्रतिनिधींबरोबर पाठवलेले संदेश काही काही बाबतीत अपुरे होते. त्या त्रुटी दूर करून, 'पूर्ण' संदेश 'कुराणा'द्वारे अल्लाहनी प्रेषित महंमदांबरोबर पाठवला आणि मानवजातीच्या आपल्या मार्गदर्शनाचं काम अल्लाहनी पूर्ण केलं. "तुमच्यासाठी 'परिपूर्ण धर्म' आज मी पाठवीत आहे. 'इस्लाम' हा तुमच्यासाठी मी निवडलेला परिपूर्ण धर्म आहे." असं पवित्र कुराणात खुद्द अल्लाहनी म्हटलेलं आढळून येईल.

पवित्र कुराणात इस्लामची सारतत्त्वं दिली आहेत. ती मुळात सात आहेत.

१. अल्लाह एकच एक आहे. द्वैतसिद्धांताला तिथे अजिबात वाव नाही. अल्लाह इस्लाममध्ये सर्वव्यापी मानला गेला आहे. जगाचा (विश्वाचा) कर्ता-करविता तोच आहे. साहजिकच, संपूर्ण जगावर, तिथल्या मानवी जीवनावर त्याची सतत नजर असते. 'अल्लाह'च्या अशा सर्वसमावेशक जाणिवेतून, माणसाच्या जीवनाला एक निश्चित अर्थ प्राप्त होतो. 'अल्लाह'ला तो मानीत असेल तर, आपोआपच चांगल्या–वाईट गोष्टीची योग्य जाणीव त्याला होते.

२. पवित्र कुराणाने अल्लाहाच्या प्रेषितांच्या अस्तित्वावरही विश्वास ठेवायला सांगितलं आहे. हे प्रेषित म्हणजे 'अल्लाह' नाही, त्यांची पूजा करण्याची आवश्यकता नाही असं सांगत असतानाच, पवित्र कुराणानं हेही सांगून टाकलं आहे की, हे प्रेषित म्हणजे 'अल्लाह'नी स्वतः निवडलेले 'अल्लाह'चे प्रतिनिधी आहेत. 'अल्लाह'च्या आज्ञांचं पालन करून त्याचा संदेश जगभर पसरविणं हे ह्या प्रेषितांचं काम आहे. ओघानंच, हे प्रेषित पाप–पुण्यांच्या पलीकडे आहेत ! त्यांच्या आदेशानुसार वागणं म्हणजे 'अल्लाह'च्या संदेशानुसार वागणं ! खरा मुसलमान म्हणूनच त्यांच्या आज्ञेबाहेर जात नाही.

३. प्रेषितांमार्फत अल्लाहनी मानवजातीच्या कल्याणासाठी वेळोवेळी जी पुस्तकं धाडली आहेत, त्यांचाही उल्लेख कुराणानं केला आहे. ह्या सर्व धर्मग्रंथांना प्रमाण मानण्याचा संदेशही दिला आहे. ह्या पुस्तकांमधले संदेश आचरणात आणूनच मानवी जीवन सुखकर होऊ शकेल. मात्र ह्या सर्व ग्रंथांमध्ये, 'कुराण' सर्वश्रेष्ठ आहे. पवित्र कुराणाचा शब्द हा अखेरचा शब्द आहे.

४. इस्लामी धर्मानुसार, मृत्यू हा आत्म्याचा शेवट नाही वा आत्म्याचं नवीन आयुष्यही तिथून सुरू होत नाही. त्या अर्थानं, मृत्यूनंतरही आयुष्यपट चालूच राहतो. उलट ह्या क्षणापासून (म्हणजे ऐहिक मृत्यूपासून) खऱ्या उत्कर्षाकडे माणसाची वाटचाल सुरू होते त्या वेळी त्याचे सुप्त गुणावगुण दिसून येतात व त्यावरच त्याची पुढची वाटचाल अवलंबून राहाते. ह्या वाटचालीत, चांगल्या कृत्यांनी, स्वभावदर्शनानं जे प्रगति करतात त्यांना स्वर्गात स्थान मिळतं, तर दुष्कृत्यांमुळे ज्यांची वाटचाल वेडीवाकडी ठरते त्यांना पाताळात जावं लागतं. तिथे त्यांना काहीसं कुचेष्टेचं, हलाखीचं जीवन जगावं लागतं; पण त्याचबरोबर त्यांच्या मानसिक शुद्धीकरणालाही सुरुवात होते आणि कालांतराने पुन्हा ह्या शुद्ध व्यक्ती स्वर्गात जातात. ही पापपुण्याची मोजदाद व स्वर्ग–पाताळाची वाटणी अर्थातच 'अल्लाह' स्वतः करीत असतो.

५. अल्लाहनिर्मित प्रत्येक वस्तू ही त्या त्या परिस्थितीत व तिच्या अपेक्षित उपयोगानुसार चांगली आहे व तिचा विनातक्रार उपयोग झाला पाहिजे. 'अल्लाह' निर्मित कुठल्याही वस्तूची अवहेलना हा 'अल्लाह'चा अपमान आहे. एक मोठं दुष्कृत्य आहे.

६. मानवजातीचा एक अंतिम दिवस यायचा आहे हे निश्चित. ऐहिक मृत्यूनंतर ह्या दिवसापर्यंतच्या 'आयुष्यात' केलेल्या पापपुण्यांचा सर्वंकष विचार अल्लाह ह्या दिवशी करेल. त्या दिवशी ऐहिकदृष्टचा जीवित असलेल्यांच्याही पापपुण्यांचा विचार ह्याच दिवशी होईल. ह्या अंतिम दिवशी न्यायाधीशाच्या खुर्चीत स्वतः ,अल्लाह' असेल. सर्वांच्या पापपुण्यांचा विचार त्या दिवशी होईल.

चांगल्या वर्तणुकीच्या लोकांना चांगलं बक्षीस व वाइटांना शिक्षा त्या दिवशी ' अल्लाह ' देईल. ह्या ' अंतिम दिवसाची ' जाणीव प्रत्येकानं ठेवली पाहिजे असं पवित्र कुराण म्हणतो; प्रेषित महंमदही म्हणतात ! ह्या अंतिम दिवसाची जाणीव ठेवून, माणूस वागला तर तो आपो-आपच चांगल्या मार्गावरच चालत राहील. ही अर्थातच इस्लामची धारणा आहे !

इस्लामची ही मूलतत्त्वं साररूपानं मी वर मांडली आहेत. धर्माच्या ह्या सात मूलभूत तत्त्वांप्रमाणेच, धर्मपालनासाठी काही ठोस आधारही नमूद केले आहेत. इस्लामिक संस्कृति प्रामुख्यानं इस्लामिक धर्मावरच आधारलेली असल्याने, ह्या प्रमुख प्रमाणांचाही त्रोटक अभ्यास आवश्यक आहे. इस्लामचे पायाभूत असे हे पाच खांब पुढीलप्रमाणे आहेत—अल्लाहच्या एकात्मतेवर दृढ श्रद्धा, त्याची प्रार्थना, उपास, दातृत्व आणि मक्केची यात्रा. हे पाच प्रमुख आधारस्तंभ ! ह्यांचा आणखी थोडचा साकल्याने आपण विचार करू.

अल्लाहची एकात्मता हे इस्लामच्या मूलभूत तत्त्वांपैकी एक तत्त्व आहे. तो सर्वसमावेशक आहे; सर्वज्ञ आहे; सर्वश्रेष्ठ आहे आणि असा सृष्टीचा निर्माता अल्लाह एकच एक आहे. अल्लाहखेरीज बाकी सगळे परस्परासमान आहेत. केवळ ' माणूस ' आहेत. त्यांच्यात इतर कुठल्याही कारणास्तव कसल्याही प्रकारचे भेदभाव अल्लाहला मान्य नाहीत. केवळ प्रेषित महंमदालाच इस्लामनी इतर सर्व लोकांपासून थोडं वेगळं मानलं आहे; कारण महंमदांच्या तर्फेच पवित्र कुराण अल्लाहनी भूतलावर पाठवलं आहे व त्यांच्यामार्फतच इस्लामची तत्त्वे इथे रुजवली गेली आहेत; पण तरीही इस्लामनी महंमदांना ' अल्लाह 'च्या जोडीला कधीही नेऊन बसवलं नाही ! इस्लामच्या ह्या मूलभूत तत्त्वातच, समतेची महान कल्पना सामावलेली आहे व इस्लामची ती महत्त्वाची शक्ती आहे.

इस्लाममध्ये सामुदायिक प्रार्थनेची-नमाजाची कल्पना आहे. ह्या-मध्येही समानतेच्या तत्त्वावर भर आहे. ' अल्लाह ' पुढे प्रार्थनेसाठी-नमाजासाठी जमताना गरीब-श्रीमंत, लहान-मोठा, श्रेष्ठ-कनिष्ठ, उच्च-नीच वगैरे सर्व कल्पनांना मूठमाती देण्यात आलेली आहे. स्वतःचं व्यक्तिगत स्थान विसरून सर्वांना एकत्रित यावं लागतं. सर्व समानतेची, बंधुत्वाची भावना अशा एकत्रित नमाजामध्ये जनतेत रुजवली जाते. ह्या दृष्टीनं इस्लामच्या दृष्टीने नमाजाला फार मोठं स्थान आहे.

उपास हाही इस्लामचा आधारभूत स्थायीभाव आहे. रमझान-मधल्या महिनाभराच्या उपवासांनी, व्यक्तिशः फायदा तर होतोच, पण त्याचबरोबर समाजाच्या दृष्टीनेही अशा उपासांचा चांगलाच फायदा होऊ शकतो. उपासामुळे त्याला भुकेची किंमत कळून येते, अन्नान्नदशा असलेल्यांची जाणीव होऊ शकते. साहजिकच, अशा जाणिवेतून गोर-गरिबांकडे बघण्याची त्याची दृष्टी सहानुभूतीची होऊ शकते ह्यात वाद नसावा. व्यक्तिगत विचार करता, उपासामुळे वक्तशीरपणा, साधेपणा, सहनशीलता, संयम, मानसिक शांती वगैरे फायदेही मिळू शकतात.

जकात हा इस्लामचा आणखी एक विशेष आहे. प्रत्येक मुस्लिमानं आपल्या मिळकतीच्या २½% रक्कम ' सामाजिक उत्कर्षासाठी, गोरगरिबांच्या उत्कर्षासाठी स्वखुषीनं दान करावी '. हे जकातीचं तत्त्व आहे. समाजकल्याणाचं हे तत्त्व आहे आणि मला वाटतं इस्लामशिवाय ते इतरत्र कुठे, इतक्या स्पष्टपणे सांगितलं गेलं नसावं. सर्वसामान्यांच्या उत्कर्षाविषयी, उन्नतीविषयी इस्लाम बारीक-सारीक बाबतीतही किती जागरूक आहे, त्याचंच हे उदाहरण आहे. सामाजिक ट्रस्टीशिप, समानता, समाजवाद, लोकशाही वगैरेविषयी आज आपण तावातावानं बोलतो; पण सुसंस्कृत मानवी जीवनाची ही अंगं इस्लामनं हजारो वर्षांपूर्वी पुरस्कारली होती; अंगिकारली होती. इस्लाम जागतिक धर्म का, मानवतेचा अंतिम शब्द का ह्याची उत्तरं इस्लामच्या वरील भावनेत आढळून येतील.

जागतिक संदर्भात देखील इस्लाम राष्ट्राराष्ट्रातील भेदाभेद अनिष्ट मानतो. मक्केला सर्वांनी येऊन हे राष्ट्रा-राष्ट्रातले मतभेद मिटवून टाकावेत, जगभरच्या माणसा-माणसात बंधुत्वाचं नातं निर्माण व्हावं असंच इस्लाम मानतो आणि म्हणूनच इस्लामच्या प्रमुख कलमांमध्ये मक्केच्या यात्रेचाही समावेश आहे. प्रेषित पैगंबरांनी जिथे प्रथम अल्लाहचा संदेश घोषित केला त्या ठिकाणाला भेट देऊन, आत्मिक-आध्यात्मिक उन्नती माणसानं साधावी हा जसा हेतू, त्याहूनही अधिक महत्त्व आहे जगभरच्या यात्रेकरूंनी देश-धर्म, जात-पात विसरून समतेच्या, बंधुत्वाच्या भावनेनं एकत्रित यावं ह्या प्रधान हेतूला !

इस्लामची सारभूत मूल तत्त्वे आणि वर उल्लेखिलेले पाच मार्ग-दीप, ह्यांनी इस्लामिक संस्कृतीवर जबरदस्त छाप पाडलेली आहे. इस्लामच्या ह्या मूलभूत तत्त्वांतून जन्माला आलेली इस्लामिक संस्कृती, इस्लामिक तत्त्वज्ञान ह्यांचा आणखी विचार पुढील लेखात करू... ☐ ☐

---

या मालिकेतील पुढील लेखांक—

- ☐ **इस्लामिक संस्कृती व तत्त्वज्ञान**
- ☐ **इस्लामिक संस्कृती व भारत**
- ☐ **अरब जगत व भारत**
- ☐ **इस्लामचे भारतीय संस्कृतीवरील परिणाम**
- ☐ **उर्दू साहित्याचे भारतीय संस्कृतीवरील परिणाम**

## साप्ताहिक भविष्य

**कृष्ण माईणकर**

**३०-८-७५ ते ५-९-७५**

### राजकीय बदलाचे विचारमंथन होणार आहे

मकरराशीच्या पंचमस्थानी वृषभ राशीत आज चंद्र असून भारताच्या व त्याचबरोबर पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या मूळ चंद्राबरोबर उत्तम योग जमून येत आहे मंगळ हा शेती व रासायनिक केमिकल्सचा कारक ग्रह असल्यामुळे तोही भारताला वरदान ठरणारे प्रगतीचे टप्पे गाठायला मदत करणार आहे. देशांत राजकीय पक्षांत उदारमतवाद मोठ्या प्रमाणात प्रभावित होणार असून विचारवंत, पत्रकार, लेखक, राजकारणी, मुत्सद्दी, कलावंत इत्यादींना सर्वच बाबतीत अवसर देण्याची योजना आखली जाण्याची शक्यता आहे. अमेरिका, ब्रिटन, फ्रान्स व चीन या देशांत भारताबद्दलच्या विचारात महत्त्वाचा अनुकूल बदल होण्याची शक्यता आहे. आर्थिक क्षेत्रात काही खळबळजनक असे स्थित्यंतर घडून येणारा निर्णय घेतला जाण्याचा संभव आहे. मध्यवर्ती मंत्रिमंडळात व महाराष्ट्र मंत्रिमंडळात आर्थिक अंमलबजावणीच्या दृष्टीने बदल घडण्याचा विचार चालू होईल. पावसाचा लाभ उत्तम होणार असून शेती-विकास समाधानकारक राहील. बुवाबाजीच्या क्षेत्रात कायद्याचा बडगा सर्वंकष सुरू होईल.

### मेष : प्रसिद्धीचा योग

गुरुसारख्या सात्त्विक व तेजस्वी ग्रहांची तुमच्यावर भरपूर कृपा आहे. त्यामुळे तुम्हाला कोणत्याच बाबतीत अपयश येण्याची शक्यता नाही हे लक्षात ठेवावे. प्रवास, नवे वाहन, राहाती जागा, परदेशभ्रमण या बाबतीत तुमच्या आशाआकांक्षांना चालना मिळणार आहे, प्रोत्साहन मिळणार आहे. शैक्षणिक बाबतीत प्रगतिकारक पावले पडतील. अर्धवट राहिलेले शिक्षण पुरे होण्याच्या दृष्टीने पाऊले टाकता येईल. ज्यांना नोकरी करून शिकावयाचे असेल त्यांना तशी संधी मिळणार आहे. नोकरी नसणाऱ्यांना नोकरी मिळेल. ज्यांच्या नोकऱ्या कायम झाल्या नसतील त्यांच्या नोकऱ्या कायम होतील. वरिष्ठांच्या गैरमर्जीतले जे नोकर असतील ते या वेळी मर्जीतील होतील. सोमवार ते गुरुवार महत्त्वाचे काम होईल. व्यापारातील तोटा कमी होईल. नव्या कारणासाठी गुंतवणूक करण्यासाठी पैसे मिळतील. महिलांना संसारात नाविन्य आणता येईल. पतिराज खूष होतील. विवाहाचे प्रयत्न कारणी लागतील.

### वृषभ : यश दृष्टिपथात येईल.

तुमच्या काही महत्त्वाच्या योजना पडून राहिल्या आहेत. त्यात अडचणी निर्माण झाल्या आहेत; पण तेवढ्याने तुम्ही हताश व्हावे असे मात्र काही नाही. कारण गुरु, शनी, मंगळ असे अनेक बलवान ग्रह तुमच्यावर सध्या फार खूष आहेत. मुत्सद्देगिरीचा योग्य प्रकारे वापर करून जर तुम्ही थोडा आक्रमक पवित्रा घेऊन उभे राहिलात तर तुमची फत्ते होईल. रविवार नव्या गाठीभेटी व ओळखी होतील. मंगळवार मंगलकार्यात भाग घ्यावा लागेल. बुधवार वैचारिक व बौद्धिक क्षेत्रात तुमचे नाव गाजेल. शुक्रवारी एखादी महत्त्वाची घटना घडेल. व्यावसायिक क्षेत्रात नव्या योजना कार्यान्वित करायला अवसर मिळेल. अडचणी कमीकमी होऊ लागतील. पैशाची कामे थोड्याफार त्रासाने पार पडतील. कलावंतांना आळसाचे आमंत्रण आले तरी ते त्रासाचे ठरावे. हानीकारक ठरेल. गायक व वक्ते यांना नव्या संधीचे वरदान लाभेल. महिलांनी न्यूनगंड सोडून जबाबदारीने एखादे जबाबदारीचे काम स्वीकारावे. यश मिळेल.

### मिथुन : जबाबदारीने वागा

या आठवड्यात तरी तुमच्या भल्याची सूत्रे गुरूच्या हाती आहेत. त्याच्या कलाने पावले टाकलीत तर काही तरी चांगले तुमच्या हाती लागेल. नाही तर 'तेलही गेले व तूपही गेले' अशी परिस्थिती निर्माण होईल. सर्वसामान्यदृष्ट्या आठवडा अनुकूलच आहे. आर्थिक उलाढाली होतील. परिस्थितीनुरूप खूप मोठ्या रकमेच्या होतील. व्यापारात नफा घेताना फार काळजी घ्या. हिशेबाच्या कामात दक्षता घेणे आवश्यक आहे. सरकारी नोकरीत आपणांस खूप मोठे अधिकार मिळणार आहेत. मान मिळेल. लोकप्रियता मिळेल व नव्या जबाबदारीचे आव्हान स्वीकारावे लागेल. पदवीधर उमेदवारांनी हवाईदल, इनकमटॅक्स, बँकिंग, महसूल, शेती या क्षेत्रात नोकरीचे प्रयत्न करावेत. वकिलवर्गाने बौद्धिक क्षेत्रात भाग घ्यावा. लेखकांना एखादी संधी मिळून जाईल. ललितलेखनाला फार अनुकूल असा काळ आहे. सोमवार व शुक्रवार पैशाचे व्यवहार जपून करा. महिलांना लेखनात चमकण्याची संधी मिळेल. विवाहाचा प्रश्न लांबणीवर पडणार आहे.

### कर्क : व्यवसायात प्रगती

साडेसातीनेदेखील प्रगती होते हे तुमच्या बाबतीत अनुभवाने सिद्ध होईल. पहिला शनि तुमचे सारे हेतू व मनोरथ पूर्ण करणार आहे. विशेषतः तुमच्या मनातून काही व्यवसायात बदल करावयाचा असेल किंवा भागीदारीत नवा व्यवसाय सुरू करावयाचा असेल तर त्यासाठी अनुकूलता आहे. शेती असेल तर या वेळी तुमचे मन भलतेच समाधानी होणार आहे. शेतीत भरभराट होणार आहे. नोकरीच्या बाबतीत नव्या योजना यशस्वी होतील. बदली व अधिकारप्राप्ती होईल. रेस व लॉटरीत काही प्रमाणात पैसा भरून येईल. नशिबाला अनुकूल असे वळण लागेल. परदेशी प्रवासाचे प्रयत्न मूर्तरूप धारण करतील. सोमवारी डोकेदुखी निर्माण होणार आहे; पण इतर कोणताच आजार होणार नाही. व्यापार-व्यवसायातील अडचणी हळूहळू दूर होऊ लागतील. प्रश्न सुटतील. मदत व तंत्रज्ञान मिळेल. विद्यार्थ्यांचे थांबलेले शिक्षण मार्गी लागेल. महिलांना नोकरीत मान व प्रतिष्ठा मिळणार आहे. वृद्धांना तीर्थयात्रा घडेल.

### सिंह : राजकारणात प्रतिष्ठा

रवि राशीतच आहे. त्यामुळे शनीच्या साडेसातीबद्दल घाबरून जाऊ नका. खर्चाच्या बाबतीत ताळमेळ राहणार नसला किंवा अचानक एखादा खर्च उभा राहून तुम्हाला धावपळ करावी लागणार असली तरी अंती काम होईल. प्रतिष्ठेला तडा जाणार नाही.

राजकारणात व नोकरीत तुमची फार मोठी प्रतिष्ठा वाढणार आहे. राजकारणातील तुमच्या मार्गातील अनेक विरोधक व अडथळे दूर होऊन तुमचा मार्ग निष्कंटक होईल. नोकरीविषयक सवलती मिळणार नाहीत. कचेरीत कामाचा ताण व जबाबदारी फार वाढणार आहे. मनात कसली ना कसली धाकधूक राहाणार असली तरी नुकसान नाही. रविवारी आध्यात्मिक बाबतीत प्रसिद्ध व्यक्तींबरोबर संबंध येईल. मंगळवार ते गुरुवार आरोग्याला जपावे. जुना आजार उफाळून येईल. महिलांनी तब्येतीला जपावे. नोकरीत प्रमोशन व बदली मिळेल. वरिष्ठ कामावर खूष होतील.

### कन्या : आशानिराशेचा खेळ

सध्या तरी गुरुचा तुम्हाला आशीर्वाद नाही. तो आठवा झाला आहे. आर्थिकदृष्टया अनपेक्षित असे धक्के बसण्याची शक्यता आहे. देणेकऱ्यांपासून त्रास होईल. नोकरीच्या बाबतीत काही भले घडू शकेल. वरिष्ठांवर कामाचा प्रभाव पडेल. चीज ताबडतोब झाले नाही तरी विचार होऊ लागेल. बेकारांना नोकरी मिळेल. कृषिपदवीधर, कलापदवीधर, कायदापदवीधर व वाणिज्यपदवीधर यांना आश्वासने व दिलासा मिळेल. चालू नोकरीत कामाचा ताण वाढेल. दुय्यम व्यवसायात काही तरी सुखकारक असे साधन सापडेल. अनपेक्षित अर्थलाभाचे योग आहेत. रेस तुम्ही खेळू नका. खेळलात तर पैसे येतील; पण तुम्हाला ती इच्छा होणार नाही. लेखकांच्या लेखनसाहित्याला मागणी येईल. प्रसिद्ध लेखक लोकप्रिय होईल. घरात काही अडचणी तुम्ही निभावू शकाल तर काही अडचणींना तोंड द्यावे लागेल. आरोग्याचा त्रास अजून तरी काही काळ लांबणार आहे. मनःस्थिती त्रासिकच राहील. विरोधकांना संधी देऊ नका. महिलांनी संततीची काळजी घ्यावी. वारा, पाऊस व ऊन यापासून जपावे. नोकरीचा प्रयत्न यशस्वी होईल.

### तूळ : आठव्या मंगळाचा खेळ

तुम्हाला सध्या हर्शल–मंगळाचा षडाष्टक योग आहे. अद्भुत, चमत्कारिक, अनपेक्षित असे काही तरी घडणार हे ठरलेले आहे. प्रामुख्याने जवळच्या व्यक्तीचा वियोग. भांडण असे काही तरी घडावे. तरुणतरुणींनी या वेळी भावनेच्या फारसे आहारी जाण्यात काहीच अर्थ नाही. प्रेमभंगाचा धक्का बसण्याची बरीच शक्यता आहे. संसारात उणीव भासावी असेही काही घडू शकेल. गरोदर स्त्रियांनी तब्येतीची वेळीच काळजी घ्यावी हे बरे. आर्थिक बाबतीत मात्र अनपेक्षित सुखाचा अनुभव येऊ लागणार आहे. शिलकीत भर पडेल. खर्चाचे आयटम सहज भागवू शकाल. चार पैसे हाती येतील. रेसमध्ये काही भाग्यवंतांना मोठे बक्षीस लागणार आहे. व्यापारीबंधूंनी सचोटीने वागून व्यवहार करावा. मात्र त्यांची फसवणूकदेखील होण्याची शक्यता आहे. त्यांनी कोणत्याही प्रकारच्या मोहाला बळी पडू नये. नोकरीत एखादे संकट टळण्याची शक्यता आहे. महिलांनी अनाठायी खर्च करू नये. पोटाचे व डोळ्यांचे विकार उद्भवू शकतील.

### वृश्चिक : अनपेक्षित अडचणी

राशीस्वामी मंगळ जरी तुम्हाला प्रिय असला तरी तो सातवा आहे हे विसरू नका. नवविवाहितांनी भांडण होऊ देऊ नये. एकमेकांवर चुका ढकलू नयेत. संततीबाबत काही तक्रारी असू शकतील. त्यामुळे मनाला वेदना व डोक्याला त्रास होईल; पण एरवी हा आठवडा छान आहे. नोकरीत रेंगाळत राहिलेल्या मागण्या पुऱ्या होण्याची चिन्हे दिसू लागतील. तुमचे काम न करणारे अधिकारी बदलून जातील. खाजगी नोकरीत काही तरी चांगले घडेल. जबाबदारी व पगार वाढेल. बदली तहकूब करून घेऊ शकाल. या आठवड्यात तुम्ही महत्त्वाचा पत्रव्यवहार करू शकाल. तुमच्या कामाच्या बाबतीत मालक खूष होणार आहे. शनिवार ते सोमवार बेकारांच्या श्रमाचे चीज होणार आहे. स्वतंत्र धंदा करण्याची ज्यांना इच्छा असेल त्यांना पैसा व सहाय्य मिळेल. प्रवास मात्र या वेळी टाळा. कापड, भांडी व फर्निचर या वस्तू खरेदी करू नका. फसवणूक होईल. महिलांनी दागिन्यांची हौस करणे या वेळी तरी टाळावे. कारण नुकसानीचा योग आहे.

### धनु : अनपेक्षित नुकसान

धनु राशीच्या व्यक्तींनी आठव्या शनीची व सहाव्या मंगळाची दखल घेणे अतिशय आवश्यक आहे. तुम्ही कोणत्याही क्षेत्रात व्यवस्थापक असाल तर तुमच्या हातून अशा काही चुका होतील की मालकांचे गामन






भोगण्याची तुमच्यावर पाळी येईल. हाताखालच्या माणसांना विश्वासात घेणे व वरिष्ठांबरोबर नम्रतेने वागणे हे दोनच गुण या वेळी तुम्हाला वाचवू शकतील. मन आणि विचार यांच्या नियंत्रणासाठी श्रीगुरुदत्तात्रयाचा रोज जप करा. उद्योगात मात्र खंड पडणार नाही. नुकसान भरून येईल. कोर्टकचेरी, भांडणे समजुतीने मिटतील. प्रापंचिक सुख उत्तम मिळेल. पत्नी तुमच्या मनाप्रमाणे वागेल. प्रवास योजला तर तो पार पडेल. पैसा खर्च झाला तरी मिळेलही भरपूर. विवाहाला अजून तरी अनुकूलता नाही. महिलांनी नोकरीतच जास्त वेळ घालवावा. स्वतंत्र उद्योग नको. पत्रव्यवहारात यश येईल.

**मकर** : कौतुक होईल

मंगळ हा मकर राशीला पाचवा आहे व तो या राशीला फारच अनुकूल आहे. त्यामुळे या आठवड्यात अनेक क्षेत्रांत तुमच्याकडून ऐतिहासिक कामगिरी होणार आहे. मनोरथ पूर्ण होतील. धंदा, व्यवसाय, नोकरी, प्रतिष्ठा या सर्वच बाबतीत प्रगतीचा नवा टप्पा गाठणार आहात. तुमच्या स्वभावात आश्चर्यकारक असा बदल होईल. ताठा कमी होऊन शत्रू व मित्र या सर्वांबरोबरच समंजस व नम्रतेने वागण्याचे धोरण ठेवाल. वृत्तीतील हा बदल तुमच्या कौतुकाला पात्र होईल. संसारात काही तरी उणीव भासत राहील. चुकल्याचुकल्यासारखेच वाटेल. प्रवासात व रोजच्या एखाद्या व्यवहारात महत्त्वाच्या व्यक्तीचा तुमच्यावर प्रभाव पडेल. नोकरीच्या दृष्टीने बुधवार ते शुक्रवार कामाचा ताण व त्रास वाढणार आहे. महिलांना मान व प्रतिष्ठा मिळणार आहे. कुटुंबात कौतुक होईल.

**कुंभ** : सुखाचा मार्ग सापडेल

गुरु, मंगळ, शनी यांसारखे सारेच ग्रह अनुकूल आहेत. त्यामुळे या आठवड्यात तुमच्याकडून काही महत्त्वाचे घडले तर आश्चर्य मानू नका. राजकारण हा तुमचा धर्म आहे. या वेळी राजकारणात तुमचे नाव गाजणार असून तुमच्या नावाला विलक्षण महत्त्व येणार आहे. मंगळवार ते गुरुवार महत्त्वाची कामे होतील. गाठीभेटी ठरल्याप्रमाणे पार पडतील. परदेशी प्रवासाबाबतीत काही अकस्मात असा पत्रव्यवहार होईल. नोकरी-धंद्याची परिस्थिती एकंदरीत ठीक राहील. इंजिनियर, वकील, डॉक्टर, संशोधक यांच्यासाठी एखादी महत्त्वाची योजना अमलात येण्याची शक्यता आहे. व्यापारी लोकांनी गिऱ्हाइकांशी जास्त प्रेमाचे संबंध ठेवावेत. कापडव्यापार थोडाफार मंदीच्या लाटेकडे झुकेल. महिलांनी खरेदी-विक्रीच्या बाबतीत काटेकोर राहावे. व्यापार करीत असाल तर काळजी घ्या.

**मीन** : प्रगतीची पावले

दुसरा गुरु व तिसरा मंगळ तुम्हाला तसा काही वाईट नाही. अकल्पित धनलाभ होऊन श्रीमंत होण्याची स्वप्ने पाहत बसाल; पण आळसात वेळ घालवू नका. हा आठवडा प्रगतीचा आहे. मंगळवार, गुरुवार, शुक्रवार नोकरीच्या दृष्टीने काही विशेष घडवणारे आहेत. बढती, प्रमोशन, जबाबदारीची जागा, अधिकारात वाढ असे काही तरी घडेल. प्रकाशन व स्टेशनरी व्यापार जोरात चालेल. रासायनिक खते, फळे यांचा व्यवसाय करावा. नवा एखादा उद्योग सुरू करायला हरकत नाही. मात्र नोकरी सोडून धंदा करू नये. कौटुंबिक क्षेत्रात चांगले संबंध जुळून येतील. भावाभावात काही मतभेद असले तर ते समजुतीने मिटतील. विवाहाबद्दलचा विचारविनिमय होईल. जोडीदार पाहणे, ठरवणे असे घडू शकेल. प्रेमात प्रगती होईल. महिलांना नोकरीत महत्त्वाचे स्थान मिळेल. बेकार पदवीधर तरुणींना नोकरी मिळू शकेल. स्वतंत्र व्यवसायही करावा. □

दिवाळी अंकाकरता

## मागोवा लघुकथा स्पर्धा

पारितोषिके –

(१) १०० रु. (२) ६० रु. (३) ४० रु.


स्पर्धेत कोणालाही भाग घेता येईल. कथा कागदाच्या एका बाजूला सुवाच्य अक्षरात शाईने लिहिलेली असावी.

शेवटची तारीख : १५ सप्टेंबर १९७५

**संपादक**

**मागोवा** : १२५९।२ जं. म. रस्ता, पुणे ४.

झीनी बेबी देवसाहेबांचा हात धरून फिल्मी दुनियेमध्ये आली. नवीन छोकरीचा हात हातात धरला– की पुन्हा एखादे नवीन पाखरू हाती लागेपर्यंत पहिली साथ सोडायची नाही असा देवसाहेबांचा खाक्या. देव-झीनीच्या प्रेमाचे गुफ्तगु खाजगी आयुष्यामध्ये–आणि गॉसीप कॉलममध्ये कितीही गर्जत राहिले तरी धरम-हेमाची जी हवा पडद्यावर निर्माण झाली तशी देव-झीनतची होऊ शकली नाही. हरे राम हरे कृष्ण चालले खरे; पण चित्रामध्ये मुमुताज कोपरा धरून उभी होती. हीरा-पन्ना, प्रेमशास्त्र, इष्क इष्क इष्क; या चित्रांची वाताहत झाली आणि तोबा तोबा म्हणत साथ सोडण्याची पाळी एकमेकांवर आली. धर्मेंद्रपासून राजेशपर्यंत सर्वांबरोबर झीनीबेबीचा सर्व संचार सुरू झाला आहे. तारुण्याचे उसने अवसान संगती घेऊन देवसाहेब हेमामालिनीपासून परविन बाबीपर्यंत सर्वांबरोबर धावाधाव करू लागले आहेत. ' झीनी-देव '––पडद्यावर यशस्वी होतील, असे निश्चित आडाखे असताना चक्कीसाहेबांचे दिग्दर्शन असलेले ' वॉरंट ' हे चित्र सेटवर गेले. हे चित्र आता वितरणाच्या वाटेवर आहे. देव-झीनीचे हे अखेरचे चित्र ठरते का पुन्हा ही जोडगोळी सरसरून उभी राहते याची कसोटी वॉरंट लागल्यावर किती खेच मिळते यावर अवलंबून राहणार आहे. चित्र चालले तर ठीक अन्यथा रुक जाऽना नही म्हणत दोघांना निदान पडद्यावर तरी वेगळी वाटचाल करावी लागणार आहे.



'वॉरंट' मध्ये
देवआनंद
झीनत अमान

वैजयंतीमाला डॉक्टरसाहेबांचे आधीच शृंगारलेले घर सजवण्यासाठी उत्साहाने गेली आणि सिनेमावाल्यांनी तिचे नाव टाकले. तिच्या जागी हेमा अलगद येऊन उभी राहिली. इकडे खलनायिकेच्या आघाडीवर शशिकला वर्षानुवर्षे वावरली. कोणाला न सांगता तिने अकल्पितपण फिल्मी दुनियेचा निरोप घेतला आणि त्याच वेळी 'बिन्दू' उभी राहिली. वाट मोकळीच होती. सह्या करताना हात दुखून यावेत इतके करार तिच्या वाटचाला आले. याच आघाडीवरील पुरुष-विभागात प्राणने राजीखुशी 'वॉक ओव्हर' दिल्यावर आणि शत्रुघ्नला फिल्मी नायक बनण्याचे डोहाळे लागल्यामुळे अनेक नवीन मंडळींचे फावले. रणजित, मनमोहन, ही त्या-पैकीच जोडगोळी. आता बिन्दू, रणजित, मनमोहन एकत्र आल्यावर अस्सल खलनायकी कारस्थान शिजणार हे काय सांगायला पाहिजे? कुन्दनकुमारसारखा ठोस दिग्दर्शक 'आजका महात्मा'मध्ये या मंडळींकडून दुसरे काय करवून घणार? काळोख्या दुनियेमधील हे त्रिकूट कुन्दनसाहेबांना अभिप्रेत असलेल्या महात्म्याला रस्ता दाखवण्याच्या तयारीत आहे. ■



# नितू सिंग



गेल्या वर्षां-दोन वर्षांमध्ये नवीन पोरींची जी आयात झाली त्यामध्ये– नितू सिंग हे एक जबर चलनी नाणे आहे. मस्त सेक्सी फिगर, आक्रमक पद्धतीने बरोबरच्या मंडळींचा कचरा करण्याची तयारी–पडद्यामागेही चर्चिले जावे असे बेमिसाल वर्तन, तात्पर्य काय तर आज टिकून राहण्यासाठी जे लागते ते सर्व असूनहीं रिक्षावाला हे पहिले चित्र सुखडा साफ करून गेले, जहरिला इन्सानने नाक कापले तरी काल-परवाची ही बेबी सोनिया आजच्या बिनीच्या अभिनेत्याबरोबर लीलया उभी राहिली आहे. रफू चक्कर, खेल खेल मे या चित्रांच्या यशाबरोबर खाजगी प्रेमप्रकरण ( असं म्हणतात की एकतर्फीच ) आणि नवीन चित्रांचे करार यांची चलती उडाली आहे. ■

MANOOS ( Weekly ) : 100 Paise : Regd. No. PNC - 6

राज, देव, दिलीपची स्वप्ने बघत नवीन मंडळी नित्य नेमे येत असतातच : फिल्म इन्स्टिटयूटची पूर्वी सोपी असलेली वाट आता चांगलीच अवघड झाली आहे. दिग्दर्शकापासून अभिनेत्यापर्यंत सर्वांना एकाच दावणीला बांधणारा ' नवा अभ्यासक्रम ' आल्यापासून प्रखर प्रकाशझोतामध्ये जीवन उजळवून टाकण्याची महत्त्वाकांक्षा बाळगणाऱ्या मंडळींना रस्ता बदलणे सोइस्कर झाले आहे. याच अवघड वाटेने आलेल्या अमृत लखनपालला दिग्दर्शक याकुब रिझवी आपल्या प्यारा दुष्मन या चित्रामध्ये नायक म्हणून पेश करत आहेत.



' प्यारा दुष्मन ' या चित्रपटात दिग्दर्शक याकूब रिजवी अमृत लखनपालला मार्गदर्शन करित आहेत.